**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८३९/२००७**

**१) श्री राजकुमार रामविलास भट्टड**
**दिपक चौक, अकोला.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. अकोला**
**विद्युत भवन, रतनलाल प्लॉटस, अकोला-४४४००५.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., अकोला.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १.८.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.२.२००७ रोजी " वर्ष ०१ ते ०७ या कालावधीतील म.वि.वि.कं.चे बिलाबाबत सेवेबाबत ग्राहकांचे नुकसानीबाबत" अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २७.२.२००७ रोजी अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प्रशासन) यांनी तीन मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ६.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाच्या बाबतीत " त्या कार्यालयाचे माहिती अधिकारी यांनी अपणास दिनांक २७.२.२००७ नुसार कळविलेली माहिती खरी आहे." असा निर्णय दिलेला दिसून येतो व सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, मिळालेली माहिती अपूर्ण, खोटी व दिशाभूल करणारी आहे. परंतु, माहिती अपूर्ण, खोटी व दिशाभूल करणारी कशी आहे, याबध्दलचा खुलसा त्यांनी केलेला नाही. तोंडी युक्तीवादामध्ये त्यांनी असे सांगितले की, लोड शेडींग चालू असताना संपूर्ण शुल्क वसुल करणे हे योग्य आहे काय. तसेच मुद्या क्रमांक २ व ३ च्या बाबत करोडो, अरबो रुपये थकबाकीसाठी कोण जबाबदार आहे, याबाबत माहिती माहितीच्या अधिकारात विचारायची नाही तर कोठे विचारायची.

याबाबत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी मधील कलम २(च) प्रमाणे "माहिती" या संज्ञेची व्याख्या तपासून पाहाणे आवश्यक आहे. "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येमध्ये "माहिती" याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेखे, दस्तऐवज, ज्ञापन, इ-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दी पत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमूने, प्रतीमाने (model) कोणतीही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील इतर सामुग्री, याचा समावेश होतो. तसेच (अ)"माहितीचा अधिकार" या संज्ञेची व्याख्या दिलेली आहे. "माहितीचा अधिकार" याचा अर्थ कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा तीच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळविता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार असा आहे. व त्यात- i) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख याची पाहाणी करणे,

ii) दस्तऐवजाच्या किंवा अभिलेख्याची तपासणी करणे किंवा प्रमाणित प्रती घेणे,

iii) सामुग्रीचे प्रमाणित नमूने घेणे

iv) डिस्क, फ्लापी, टेप, व्हीडीओ कॅसेट या स्वरुपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रानिक प्रकारातील माहिती किंवा जेव्हा अशी माहिती संगणीकृत किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठवलेली असेल त्या बाबत मुद्रीत प्रती करुन (प्रिंट आऊट) माहिती मिळविणे याबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो. यावरुन जी उपलब्ध असते ती माहिती व माहितीचा अधिकार या संज्ञेच्या व्याखेच्या निकषाप्रमाणे उपलब्ध होऊ शकते. कोणत्याही प्रकारची काल्पनिक (hypothicated) माहिती किंवा जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय येईल अशा प्रश्नांची माहिती ही अपेक्षित नाही. कोणत्याही निर्णय प्रक्रियेतील जन माहिती अधिकारी हा अधिकारी

असेलच असे नाही. त्याचप्रमाणे निर्णय प्रक्रियेतील गुणवत्तेच्या संदर्भामध्ये या दोनही व्याख्येमध्ये कोणत्याही प्रकारची आधिकारीता आयोगास दिलेली नाही. व त्यामुळे माहिती ही उपलब्ध असलेल्या अभिलेख्याच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात अपेक्षित आहे. व त्यामुळेच अधिनियमाचे कलम ५(१) मध्ये सार्वजनिक प्राधिकरणाच्या सर्व युनिटस मध्ये त्या त्या स्तरावर माहिती ३० दिवसांचे आंत उपलब्ध व्हावी या दृष्टीने जन माहिती अधिकारी नियुक्त करण्याची तरतूद आहे. जन माहिती अधिकारी हा त्या सार्वजनिक प्राधिकरणातील माहितीचा परिरक्षक असतो. व उपलब्ध असलेली माहिती ३० दिवसांत पुरविणे एवढेच मर्यादित अधिकार जन माहिती अधिकारी यांचे आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी जी विश्लेषणात्मक स्वरुपात माहिती मागितली आहे त्याबाबतचे उत्तर किंवा विश्लेषण हे जन माहिती अधिकारी यांचेकडून अपेक्षित नाही. मात्र, त्याबाबत जे सार्वजनिक प्राधिकरणाचे अधिनियम, नियम, by laws असतील त्याच्या माहितीच्या संबंधीत छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित आहे. कोणत्याही प्रकारे माहिती तयार (generate) करुन देणे अपेक्षित नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना दिनांक २७.२.२००७ रोजी जे उत्तर दिलेले आहे ते नियम आहे त्याप्रमाणे तयार करुन दिलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान झालेले नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या १ व २ मुद्यांचे संदर्भामध्ये नियमांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक १५.२.२००७ च्या अर्जातील मुद्या क्रमांक १ व २ च्या संदर्भामध्ये वीज वितरणाच्या संदर्भामध्ये जे नियम असतील त्याच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-१.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८३६/२००७**
**अपील क्रमांक १८३७/२००७**
**अपील क्रमांक १८३८/२००७**

**१) श्री जगदिश शुभकरणसिंह सोमवंशी**
**संपादक, सा.प्रॉमिस आर.एन.आय.००९८३/९९**
**कार्यालय, वसंत नगर, पुसद, जिल्हा यवतमाळ. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार**
**तहसिल कार्यालय, पुसद.**
**३) जन माहिती अधिकारी तथा पुरवठा निरीक्षक,**
**अन्न पुरवठा विभाग, ता. कार्यालय, पुसद, जि. यवतमाळ. उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १.८.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या तीनही द्वितीय अपीलाची सुनावणी आज ठेवण्यात आली होती. अपीलकर्ता आज सकाळी १०.०० वाजता कार्यालयात हजर होते. जन माहिती अधिकारी हे गैरहजर होते व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे सुध्दा कोणीही कोणीही प्रतिनिधी हजर नव्हते. मात्र जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३.६.२००८ रोजी तीनही अपीलामध्ये कागदपत्रे दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता यांनी सुध्दा प्रतिज्ञापत्र पोस्टाने दाखल केले होते. मात्र अपीलकर्ता यांनी दिनांक २९.५.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे " मी खालील सही करणार लिहून देतो की, वरील अपीलांची मला नोटीस मिळाली. परंतु, तारखेवर उपस्थित राहू शकत नाही. मला अपील पुढे चालवायचे नाही. मला माहिती विषयी आवश्यकता नाही. मी लिहून दिले आहे." असे तीनही अपीलामध्ये त्यांनी लेखी दिलेले आहे. असे लेखी दिलेले असताना सुध्दा अपीलकर्ता आज वर नमूद केल्याप्रमाणे सुनावणीस हजर झाले. व त्यांनी आयोगाकडे असे लिहून दिले की, "तत्कालीन पुरवठा निरीक्षक श्री एस.डी. बेदरकर यांनी मला सदर दुकानाचे प्रस्ताव जिल्हा पुरवठा निरीक्षक, यवतमाळ यांचेकडे पाठविण्याकरीता १४-१५ कागदपत्रांवर (गठठा) माझी

प्रत्येक कागदावर सही घेतली. रास्तभाव दुकानाचे प्रस्ताव असे शिर्षक असलेल्या प्रथम पृष्ठा सोबत १४ ते १५ कागद होती. त्यात काही पाने कोरी सुध्दा होती. को-या कागदावरील सहया बाबत मी विचारणा केली असता त्यांनी नकाशा, घरभाडे पटटा तसेच करारनामा वगैरेसाठी असल्याचे सांगितले. रास्तभाव दुकानाचा प्रस्ताव असल्याने मी त्याच्यावर सुध्दा सहया केल्या. दि. ६.७.२००८ रोजी रविवारी आठवडी बाजारात श्री एस.डी. बेदरकर यांची भेट झाली असतांना तुम्ही नागपूर जावू नका तुमच्या नागपूरला दाखल अपील प्रकरणी तुम्हाला रास्तभाव दुकान प्रकरणी को-या कागदावरील घेतलेल्या सहयावर माझ्या हस्ताक्षरात मजकुर लिहून मी पाठविला आहे. असे बेदरकर साहेबांनी सांगीतले. त्यामुळेच हे निवेदन आपल्याकडे पाठवित आहे. त्या सहया जरी माझ्या असल्या तरीही माझी फसवणुक करुन घेतल्या आहेत. त्या कागदावरील मजकुर माझा नाही. तो बेदरकरांनी स्वतःच्या हस्ताक्षरात लिहीला आहे तो मजकुर मला मान्य नाही. तेव्हा उत्तरवादी यांनी दाखल केलेल्या फसवणुक करुन बनविलेल्या दस्तऐवजाच्या आधारे माझी अपील प्रकरणे १८३६/२००७, १८३७/२००७ व १८३८/२००७ ही खारीज करु नये. मला मी मागीतलेली माहिती देण्यात यावी ही नम्र विनंती. माझी फसवणुक करुन बनवलेले दस्ताऐवज अपील प्रकरणी दाखल करणा-यावर नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती. " असे लेखी निवेदन दिलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या म्हणण्याच्या समर्थनार्थ त्यांनी आयोगापूढे ॲफिडेव्हीट दाखल करावे असे आयोगाच्या अधिका-यांनी आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे त्यांना सांगितल्यानंतर सकाळी ११.३० वाजता ॲफिडेव्हीट करण्यास गेलेले अपीलकर्ता हे सायंकाळी ५.२० पर्यंत परत आलेले नसल्यामुळे सदरचे तीनही अपीले ही निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

१) सदरची तीनही अपीले निकाली काढण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-१.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८४७/२००७**

**१) श्री कोंडू नारायण सूर्वे**
**मु.पो.ता.मंगळूरपीर (गजानन महाराज मंदीराजव)**
**जांब रोड, जिल्हा वाशिम** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, वाशिम.**

**३) जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक,**
**मंगळूरपीर, तालुका खरेदी विक्री संघ, मंगळूरपीर,**
**जिल्हा वाशिम.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २.८.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर असून त्यांच्या कार्यालयातून कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे दाखल केलेली नाही.

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२००६ रोजी शासकिय माहीती अधिकारी म्हणून व्यवस्थापक, मंगळूरपीर तालुका खरेदी विक्री संघ, मंगळूरपीर यांचेकडे सन २००१ ते २००६ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

" मागितलेल्या माहितीचा तपशिल : १) सन २००१-२००२ मधील कापूस चेकवरील बियाणे वाटप केलेल्या बिल नं. ६५१ ते ७०० एकुण रक्कम ९९१२०/- चे पुरविलेल्या बिलांच्या झेरॉक्स प्रती.

(२) सदर बिल नं.६५१ ते ७०० मधील ज्या रकमा संस्थेने वसूल केल्या त्या संस्थेच्या जनरल खतावणीमध्ये ज्या खाती जमा केल्यास त्या लेजरच्या खात्याची प्रत व जमा झालेल्या रकमेच्या पावत्यांच्या झेरॉक्स प्रती.

(३) सन २००१-२००२ मध्ये कापूस विभागात जे रोजंदारी कर्मचारी काम करीत होते त्यांना दिलेल्या मंजूरी रकमेच्या पावत्यांच्या झेरॉक्स प्रती.

(४) डी. माणिक टोपले यांचे तपासणी यादीमधील वसूलीस पात्र दाखविलेल्या रकमेपैकी श्री रा.वा. मोकळे यांनी संस्थेत कास्तकाराचे नावांने जमा केलेल्या पावत्यांची झेरॉक्स प्रती व सदर रक्कम संस्थेने ज्या खाती जमा केली त्या खात्याची झेरॉक्स प्रत.

(५) सन २००१ ते २००३ या माझ्या प्रभार काळातील सहाय्यक निबंधक यांचे कार्यालयातील स संस्थेतील कर्मचा-यांनी तपासणी करुन दिलेल्या तपासणी अहवालावर संस्थेने नेमलेल्या चौकशी समितीच्या कामकाजासंबंधी संपुर्ण कागदपत्रास तसेच संस्थेच्या ठरावासह असलेल्या माहितीची झेरॉक्स प्रत.

(६) संस्थेने सन २००१ ते डिसेंबर २००६ पर्यंत केलेल्या विविध तपासणी संबंधाने तसेच चौकशी संबंधीचे संस्था कर्मचारी, सर्टीफाईट ऑडीटर श्री टोपले तसेच कायदेशीर सल्लागार (वकील) चौकशी अधिकारी यांना संस्थेतून दिलेल्या रकमांच्या पावत्यांच्या झेरॉक्स प्रती.

७) मार्च २००२ मधील ऑफिस खर्चात संस्थेच्या संचालक मंडळाने दिलेल्या मंजुरीच्या ठरावाची सत्यप्रत." सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले आहे.

माहितीच्या अर्जाप्रमाणे दिनांक १०.१.२००७ रोजी व्यवस्थापक यांनी अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीपैकी अनुक्रमांक १,३,४,६,७ ची माहिती आपणास देत आहे व अनुक्रमांक २ व ५ ची ची माहिती आपणास दिनांक २०.१.२००७ पर्यंत देण्यात येईल. तरी माहितीच्या एकुण प्रती मुद्या क्रमांक १ च्या ४९ प्रती, मुद्या क्रमांक ३ च्या १७ प्रती, मुद्या क्रमांक ४ च्या ५ प्रती, मुद्या क्रमांक ६ च्या २६ प्रती, व मुद्या क्रमांक ७ ची १ प्रत याप्रमाणे एकुण ९९ प्रती आपणास देत आहे. तरी माहिती मिळाल्याची पोच द्यावी, असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ७.३.२००७ रोजी मुद्या क्रमांक २ ची माहिती बिल नंबर ६५१ ते ७०० रुपये ९९,१२०/- पैकी ३३ बिलाची माहिती आपणास देत आहे व उर्वरित बिलांची माहिती आपणास लवकरात लवकर

देण्यात येईल. सोबत (१) ५ नग पावती पुस्तकाच्या झेरॉक्स प्रती, (२) बँक अनामत खाते ५ नग जनरल लेजर (३) कापूस अनामत ३ नग (४) यादया ४ अशी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. तसेच दिनांक १२.३.२००७ रोजी सुध्दा माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली दिसते. दिनांक १४.३.२००७ रोजी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु १३ जमा रकमेची माहिती मिळाली नाही असे अपीलकर्ता यांनी दिलेले दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ८.२.२००६ रोजी जिल्हा उपनिबंधक यांचेकडे अपीलीय अधिकारी म्हणून प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक २१.३.२००७ रोजी व्यवस्थापक तथा माहिती अधिकारी यांना उर्वरित बिलांची माहिती अर्जदारास पत्र मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत पाठविण्यात यावी. उपरोक्त निर्णय देवून सदर अर्ज या कार्यालयाचे स्तरावर नस्तीबध्द करण्यात येत आहे याची नोंद घ्यावी व सदरच्या पत्राची प्रतिलीपी अपीलकर्तायांना देवून अपीलकर्ता यांनी संबंधीत संस्थेचे सचिवाशी संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांना त्याप्रमाणे माहिती उपलब्ध न झाल्यामुळे दिनांक ५.४.२००७ रोजी पुन्हा जिल्हा उपनिबंधक यांचेकडे माहिती उपलब्ध झाली नाही याकरीता अर्ज दाखल केलेला दिसून येतो. त्यानंतर मात्र अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपीलामध्ये पुर्णपणे माहिती न मिळाल्यामुळे तसेच बिल नंबर ६५१ ते ७०० मधील वसुल झालेल्या रकमेच्या पावतीच्या झेरॉक्स प्रती व त्या ज्या खाती जमा झाल्या त्या खात्याच्या झेरॉक्स प्रती याची आवश्यकता असल्यामुळे, असे माहितीचे स्वरुप नमूद केले आहे.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीसाठी राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून दिनांक ४.६.२००८ रोजी कागदपत्रे दाखल करण्एयासाठी दिनांक २३.६.२००८ ही तारीख देण्यात आली होती. व त्यानंतर दिनांक २१.६.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक यांनी अपीलकर्ता यांना पुन्हा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तरी सुध्दा अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना आजही पुर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी माहितीचा अर्ज त्या वेळेस त्यांना पुर्ण माहिती उपलब्ध झाली असती तर त्यांचे विरुध्द झालेल्या कार्यवाहीमध्ये त्यांना

कागदपत्रे सादर करता आली असती. परंतु त्यांना संपुर्ण माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे विशेषत: बिल नंबर ६५१ ते ७०० मधील वसुल झालेल्या रक्कमेच्या संदर्भात ज्या ज्या खाती जमा झाल्या त्या खात्याची झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन दिली असती तर त्यांना चौकशीच्या संदर्भात ती माहिती पुरावा म्हणून सादर करता आली असती. परंतु सदरची माहिती चौकशी अधिकारी श्री टोपले, प्रभारी ऑडीटर यांचेकडे होती. त्यांना ब-याच वेळा पत्रव्यवहार करुनही माहिती दिली नसल्याने श्री सुर्वे यांना माहिती देता आली नाही. यावेळेस श्री टोपले ऑडीटर यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घेतली असून श्री सुर्वे यांना दिनांक २१.६.२००८ रोजी रजिस्टर पोस्टाने पाठविली आहे, असे प्रभारी व्यवस्थापक यांनी आयोगाकडे खुलासा केला आहे. त्या संदर्भात प्रभारी व्यवस्थापक यांना श्री टोपले, ऑडीटर यांचेशी पत्रव्यवहार केलेला असल्यास त्या पत्रव्यवहाराची माहिती आयोगाकडे द्यावी असे सांगितले असता, पत्रव्यवहार केलेला नाही किंवा पत्रव्यवहार केल्याची माहिती नाही असे ते सांगत आहे. मात्र आयोगापूढे ब-याच वेळ पत्रव्यवहार करुनही माहिती दिली नसल्याचे त्यांनी लेखी दिलेले आहे.

या एकुण सर्व कागदपत्रावरुन असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही की, अपीलकर्ता यांची चौकशी सुरु असल्याने त्यांना टप्या टप्याने कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली दिसते व संपुर्ण माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यामुळे तत्कालीन संबंधीत जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक हे दोषी आढळून येतात. व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २० प्रमाणे शास्ती लादणे हे आवश्यक आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, ही संपुर्ण माहिती त्यांना वेळीच मिळाली असती तर त्यांना चौकशी मध्ये त्यांची बाजू मांडतांना सदरची कागदपत्रे दाखल करता आली असती. व त्यामुळे त्यांचे कधीही भरुन न निघणारे नुकसान झाले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना उर्वरित जी माहिती अपेक्षित आहे ती माहिती त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१२.२००६ रोजी

माहिती मागितली होती त्यावेळेस जे संबंधीत जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक होते ते संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता दोषा आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५,०००/- (पाच हजार फक्त) शास्ती ही लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली खरेदी विक्री संघाने वसुल करुन "**००७०-इतर प्रशासाकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार(००७०-०१६-१)**" मध्ये जमा करावी. व आयोगास तसा अहवाल कळवावा.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत ही अपीलकर्ता तसेच खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष यांना स्वतंत्रपणे तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा वाशिम यांना स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) निर्णयाची एक प्रत सहकार आयुक्त, प्रशासकिय बिल्डींग, बी.जे.रोड, पुणे-१ यांना स्वतंत्रपणे कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

४) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-२.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८४५/२००७**
**अपील क्रमांक १८४६/२००७**

**अपील क्रमांक १८४५/२००७**

**१) श्री श्रीकांत भगवानदास पटेल**
**विर्ला कॅालोनी, जठार पेठ, अकोला.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. शहर विभाग, अकोला.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. शहर विभाग, अकोला.** **उत्तरवादी**

**अपील क्रमांक १८४६/२००७**

**१) श्रीमती आशा श्रीकांत पटेल**
**विर्ला कॅालोनी, जठार पेठ, अकोला-४४४००५.**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. शहर विभाग, अकोला.**

**३) जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता**
**महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. शहर विभाग, अकोला.**
**अर्बन सब डिव्हीजन नं.३, दुर्गा चौक, अकोला (रतनलाल प्लॅाट).**

**( आदेश पारित दिनांक २.८.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपीले दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

अपील क्रमांक १८४५/२००७ : मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १३.२.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी महाराष्ट्र वीज वितरण कंपनी यांचेकडे दिनांक ५.१२.२००६ ते १०.२.२००७ या कालावधीची जोडपत्रात दिलेली माहिती खालीलप्रमाणे मागितलेली दिसून येते.

" माझे खालील अर्जावर काय कार्यवाही करण्यात आले त्या संबंधी माहिती मिळण्या बाबत.

| No | Date | प्रति | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | ७.१२.०६ | उप कार्यकारी अभियंता | २२ | १८.१.०७ | Chief Engineer |
| २ | ९.१२.०६ | उप कार्यकारी अभियंता | २३ | १९.१.०७ | Chief Engineer |
| ३ | ११.१२.०६ | उप कार्यकारी अभियंता | २४ | २५.१.०७ | कार्यकारी अभियंता |
| ४ | १६.१२.०६ | कार्यकारी अभियंता | २५ | २५.१.०७ | कार्यकारी अभियंता |
| ५ | १८.१२.०६ | कार्यकारी अभियंता | २६ | २५.१.०७ | कार्यकारी अभियंता |
| ६ | १८.१२ | कार्यकारी अभियंता | २७ | २५.१.०७ | कार्यकारी अभियंता |
| ७ | १८.१२ | कार्यकारी अभियंता | २८ | ३.२.०७ | मुख्य अभियंता |
| ८ | २१.१२. | कार्यकारी अभियंता | २९ | २२.१.०७ | मुख्य अभियंता |
| ९ | २६.१२ | उप कार्यकारी अभियंता | ३० | ३.२.०७ | उप कार्यकारी अभियंता |
| १० | २६.१२ | अधीक्षक अभियंता | ३१ | २१.१.०७ | V.N.Nirmal |
| ११ | २२.१२ | अधीक्षक अभियंता | ३२ | ७.२.०७ | उपकार्यकारी अभियंता |
| १२ | १९.१२ | Exe. Engineer | ३३ | ५.२.०७ | मुख्य अभियंता. |
| १३ | २६.१२ | Dy Ex.Engineer | | | |
| १४ | २९.१२ | कार्यकारी अभियंता | | | |
| १५ | ३०.१२ | अधीक्षक अभियंता | | | |
| १६ | ३.१.०७ | उपकार्यकारी अभियंता | | | |
| १७ | ८.१.०७ | कार्यकारी अभियंता | | | |
| १८ | ८.१.०७ | कार्यकारी अभियंता | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९ | ८.१.०७ | Chief Engineers | | | |
| २० | ९.१.०७ | Tr,omfrt | | | |
| २१ | १२.१.०७ | मुख्य अभियंता | | | |

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २६.३.२००७ रोजी प्रथम अपील अपीलेट ऑफीसर, म.रा.वि.वि.कंपनी, अकोला यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अपीलाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २३.४.२००७ रोजी आपल्या विरुध्द विज चोरीचा गुन्हा नोंदविलेला आहे त्यामुळे माहितीच्या अधिकाराच्या कायद्याच्या तरतूदी नुसार आपण १३.२.२००७ च्या पत्रानुसार मागितलेली माहिती आपणास देणे शक्य नाही, करीता आपले अपील फेटाळले आहे, असे कळविलेले दिसते. परंतु सदरचे पत्र अपीलकर्ता यांना मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. उत्तरवादी यांचे तर्फे ॲड. सुनिल काटे हे हजर आहे व त्यांनी युक्तीवाद केला. त्यांच्या युक्तीवादामध्ये त्यांनी अपीलकर्त्यांनी जो दिनांक १३.२.२००७ चा अर्ज केलेला आहे तो अर्ज निश्चित अशा माहिती अधिकारी यांचेकडे केलेला नाही. तसेच अर्जासोबत सहपत्रामध्ये त्या अर्जाचा उल्लेख केलेला नाही. त्या अर्जाची तारीख ७.१२.२००७ ते ५.२.२००७ अशी असून सदरचा अर्ज उपकार्यकारी अभियंता यांचेपासून तर मुख्य अभियंता यांचेपर्यंत केलेला आहे असे नमूद केलेले असल्यामुळे अशा प्रकारची एकत्रीत माहिती ही एका कार्यालयामध्ये मिळू शकत नाही. त्यातही उप कार्यकारी अभियंता यांचे पुर्ण पदाचे विवरण नाही. तसेच कार्यकारी अभियंता किंवा मुख्य अभियंता यांचे पत्याचे विवरण नाही. अकोला शहरामध्ये अनेक उपकार्यकारी अभियंता, कार्यकारी अभियंता आहेत. व त्यामुळे कोणत्या उपकार्यकारी अभियंत्याकडे किंवा कार्यकारी अभियंत्याकडे अर्ज केलेला आहे हे एकाच अर्जाच्या माध्यमातून कळत नसल्यामुळे सदरचा अर्ज हा उपविभाग क्रमांक ३ यांचेकडे पाठविण्यात आला होता. तसेच त्याप्रमाणे दिनांक २२.३.२००७ पत्र क्रमांक १४३४ अन्वये संबंधीत उपअभियंत्याला माहिती देण्याबाबत सूचना केली होती. अपीलार्थीने उपविभाग क्रमांक ३ ला केलेले वेगवेगळे अपीलान्वये दिनांक ६.३.२००७ रोजी पत्र क्रमांक ५६० अन्वये

अपीलार्थीच्या विरुध्द वीज चोरीचा गुन्हा नोंदविलेला असल्याने माहितीच्या अधिकाराच्या तरतूदीनुसार माहिती देण्याबाबत नकार दिला आहे. अर्जदाराची माहिती ही अमरावती परिमंडळ कार्यालय, उपविभाग क्रमांक ३ यांचेकडे दिलेल्या अर्जाचे बाबतची असल्याने विभागीय कार्यालयामार्फत कोणतेही आदेश पारित झालेले नाही. अपीलीय अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, शहर उपविभाग क्रमांक ३ यांचे पत्र क्रमांक ९०५ दिनांक २३.४.२००७ अन्वये अपीलार्थीचे अपील खारीज केल्याबाबत सूचीत केले होते. परंतु अपीलकर्ता यांना सदरचे पत्र मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन घ्यावयाची असल्यास त्यांनी स्पष्टपणे उपविभाग क्रमांक , माहिती अधिकारी इ.चा त्यांच्या अर्जात स्पष्ट उल्लेख करुन अर्जाची प्रत देवून माहिती मागणे हे उचित ठरले असते व ३० माहिती उपलब्ध झाली असती. अपीलकर्ता यांचे पूर्वी सुध्दा राज्य माहिती आयोगाकडे याच संदर्भात अपीलाची सुनावणी झाली आहे. प्रकरण एकच आहे. परंतु एकाच प्रकरणात अनेक प्रकारे माहिती ते मागत आहे कारण त्यांच्या विरुध्द विज चोरीचा गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. त्यामुळे सदरची माहिती ते व्यापक जनहिताकरीता न मागता त्यांच्या स्वहिताकरीता मागत आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. असे असले तरी त्यांनी स्वतंत्ररित्या स्पष्टपणे माहितीचा उल्लेख केल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरता सदरचे अपील हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

अपील क्रमांक १८४६/२००७ : मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १७.२.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र वीज वितरण कंपनी यांचेकडे दिनांक २५.१.२००७ व ७.२.२००७ या कालावधीतील माझे पत्र दिनांक ७.२.२००७ रोजी वर काय कार्यवाही केली व त्या संबंधाने संपुर्ण माहिती देण्यात यावी.सोबत पत्राची नक्कल जोडत आहे. व्यक्तीगत माहिती असल्यास ४८ तासात माहिती देण्यात यावी. माहिती व्यक्त्ीश: घेणार असे नमूद केले आहे. अर्जदाराने दिनांक २५.१.२००७ रोजी ती व तीचे पती श्री श्रीकांत पटेल यांचे सामाईक नांवाने असलेल्या इमारतीमध्ये विद्युत पुरवठा मागितला होता. सदरहू इमारतीवर विज चोरीबाबत निर्धारण व आपसी तडजोडीची एकुण रक्कम रुपये ३,५२,३८५/- हे थकीत असल्याने अर्जदारास दिनांक २५.१.२००७ च्या पत्रान्वये सूचित केले होते. त्यावर अर्जदाराने

३,५२,३८५ रुपयाची थकबाकी कशी या बध्दलची माहिती दिनाक १७.२.२००७ च्या पत्रान्वये मागितली होती. पत्र क्रमांक ५०३ दिनांक १.३.२००७ अन्वये सूचित केले होते.

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलात आदेश पारित केला नाही. यापुर्वी सुध्दा अपील क्रमांक ८५४ अन्वये त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकरी यांचे म्हणणे आहे. व त्यामुळे या प्रकरणामध्ये सुपूर्ण माहिती अपीलकर्ता यांना वेळोवेळी देण्यात आलेली आहे. तसेच पूर्वीच्या अपीलात देण्यात आली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. वरील दोनही अपीलाच्या संदर्भामध्ये उत्तरवादी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल कला आहे.

" उत्तरवादी क्रं.१ व २ चे अनुषंगाने खुलासा : महाराष्ट्र राज्यात होत असलेले विजेचे उत्पादन व वितरण हया मधील मोठया प्रमाणातील होत असलेली हानी टाळण्या करिता वितरण कंपनीच्या कार्यालया मार्फत विविध उपाययोजना करण्यात आल्या. त्यामध्ये ग्राहकांचे इमारतीवर असलेले जुने मिटर बदली करुन त ऐवजी नविन मिटरची उभारणी करणे तसेच ग्राहकांच्या विद्युत पुरवठयाची आकस्मिक तपासणी करणे असे विविध उपाय करण्यात आले. ग्राहकांच्या विद्युत पुरवठयाची अकस्मीक तपासणी करण्या करिता विभागीय स्तरावर विशेष पथकांची निर्मितीही करण्यात आली.

२. दि ५.१२.०६ रोजी विशेष पथकाने अपीलार्थीचे पतीचे राहते घराची अकस्मीक तपासणी अपीलार्थीचे पती व पंचाचे समक्ष केली होती. सदरहू तपासणी मध्ये विज चोरी होत असल्याचे आढळून आले होते. विजेच्या चोरीच्या पुढील कार्यवाही करिता ग्राहकांचे, अपीलार्थीचे येथील मिटर व ज्या साधना द्वारे तो विजेची चोरी करीत होता ते जप्त करण्यात आले. अपीलार्थीचे पतीस निर्धारण अधिका-याने विज चोरी बाबतचे देयकाचे निर्धारण करुन अपीलार्थीचे पतीने एकूण २,९९,३८५/- रुपयाचे विज चोरी केलया बाबत निर्धारण केले तसेच विज चोरीचा गुन्हा आपसी तडजोडी बाबत विद्युत कायदा २००३ चे कलम १५२ अन्वये ४,०००/- प्रति किलो व्हॅट हया दराने १२.११४ के.डब्यू म्हणजेच १३ के.डब्ल्यू करिता आपसी तडजोडीचे (कंपाऊंडींग) ची आकारणी केली. त्याबाबतचे देयके वेळोवेळी अपीलार्थीचे पतीला देण्यात आले होते.

३. अपीलार्थीने तिचे व तीचे पतीचे नावे एकत्रात असलेल्या जेथे दि. ५.१२.०७ रोजी तपासणी केली होती त्याच इमारती मध्ये नव्याने विज पुरवठा मागितला होता. महाराष्ट्र राज्य विद्युत नियमक आयोग हयांनी निर्गमित केलेल्या नियमावलीतील नियम क्रं.१०.५ अन्वये विजेची थकित असलेली कोणतीही घेणे ही सदरहु इमारतीवर बोजा म्हणून गृहीत धरण्याचे नियम करुन दिलेले आहे. अपीलार्थीचे पती कडून विज चोरीच्या बाबत येणे असलेली सर्व रक्कम (निर्धारण व आपसी तडजोडीची रक्कम) समाविष्ट करुन त्या नुसार अपीलार्थीस उत्तरवादी हयांचे पत्र दि. २५.०१.०७ नुसार सुचित केले होते. तसेच अपीलार्थीचे पतीस दि. ०७.०२.०७ चे अर्जानुसार त्याचे विज देयकाचे खतावणीची प्रतही पुरविण्यात आली होती.

४. अपीलार्थीचे पतीने दि.०५.१२.०७ रोजी केलेल्या तपासणीचे वेळी दिलेल्या संमतीनुसार विज चोरीच्या झालेल्या नुकसानीचा भरणा उत्तरवादी हयांचें कार्यालयाला केला नाही. तसेच विज चोरी बाबत दाखल होणर असलेल्या गुन्हयाची आपसी तडजोडीच्या रकमेचाही भरणा केला नव्हता. म्हणून उत्तरवादी  हयांचे काया्रलया मार्फत अपीलार्थीचे पती विरुध्द विद्युत कायदा २००३ चे कलम १३५ (अ) व (ब) अन्वये विज चोरी बाबत रामदास पेठ पो.स्टे. अकोला येथे दिनांक १६.१२.०६ रोजी पो.स्टे.मध्ये फिर्याद नोंदविण्यात आली त्या नुसार रामदास पो.स्टे.यांनी अपीलार्थीचे पती विरुध्द प्रथमवर्दी क/गुन्हा क्रं.३१५०/०६ अन्वये विज चोरीच्या गुन्हयाची नोंद अपीलार्थीचे पती विरुध्द घेतली व पुढे तपास करुन वि.जिल्हा व स९१ तथा विशेष न्यायाधिश अकोला यांचे कोर्टात विशेष फौ.प्रक.कं. ४३/०७ अन्वये प्रकरण दाखल केले आहे.

५. अपीलार्थीने तिचे दि. १७.२.२००७ चे अर्जान्वये तिचे ०७.०२.०७ चे पत्राचे अनुषंगान्वये माहिती मागितली होती. अपीलार्थीचे पतीचे नांवे उत्तरवादी हयांचे कार्यालया मार्फत विज चोरीचे प्रकरण न्याय प्रविष्ठ असल्याने माहिती अधिकारी यांनी माहितीच्या अधिकाराचे कायदयाचे कलम ७ जे अन्वये नाकारले होते.

६. सहरहू स्पष्टीकरण हे अपीलार्थीचे पती विरुध्द दाखल असलेले विज चोरीच्या गुन्हयांमध्ये बचाव म्हणून वापरण्याची शक्यता असल्याने अशा प्रकारचे स्पष्टीकरण देणे माहितीचे अधिकाराचे कलम ७ जे अन्वये नाकारण्याचे अधिकार माहिती अधिका-याला देण्यात

आलेले आहे. माहितीचे अधिकाराच्या कायदयाचे तरतूदी अंतर्गत अर्जदारांना माहिती विचारण्याचा अधिकार दिलेला आहे परंतू संबंधित माहिती ही व्यापक जनहिता करीता अपीलार्थीने मागितलेली नसून ती माहिती स्वहिताचे दृष्टीने मागितलेली आहे. अपीलार्थी व तीचे पती हे दोघेही आपल्या वेगवेगळया नावाने तीच ती माहिती वेगवेगळया अर्जाद्वारे उत्तरवादी १ व २ तसेच उत्तरवादीचे वरिष्ठ कार्यालय हयांच्या कडुनही वारंवार अर्ज करुन उत्तरवादी व त्यांचे अधिनस्त व वरिष्ठ हयांचेवर दडपण येण्याचे हेतूने वारंवार अर्ज करीत आहेत. माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी हयांनी अपीलार्थीचा अर्ज कायदयाच्या योग्य त्या तरतूदी अंतर्गतच नामंजूर केलेला आहे.

७. अपीलार्थीचे अपीलात कोणत्याही कायदयाचा मुददा नसून तिने मागितलेली माहिती ही स्वहिता करीता असून त्या मध्ये व्यापक जनहिता करीता मागितलेली नाही, करिता अपीलार्थीचे अपील खारीज करावे.

८. वरील विधानास बाधा न येता उत्तरवादी सविनय कळवितो की, अपीलार्थीचे पती श्रीकांत भगवानदास पटेल हयांनी वि. राज्य आयोगाकडे दूसरे अपील क्रं. १५९७/२००७ अन्वये दुसरे अपील उत्तरवादीचे विरुध्द दाखल केले होते. वि.राज्य आयोगाने दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकून दि. ०७.०६.०६ रोजी सदरहू प्रकरणात आदेश केला असून अपीलार्थीचे अपील अंशतः मंजूर केले होते व त्यास विज चोरी बाबत आकारण्यात आलेले २,९९,३८५/- रुपयाचे निर्धारणाचा विवरण पुरविण्याचा आदेश केला होता. त्यानुसार सदरहू विवरण दि. २१.०६.०८ रोजी अपीलार्थीचे पतीस देण्यास गेले असता ते घरी उपस्थित नसल्याने ती माहिती अपीलार्थीने स्विकारलेली आहे. त्यामुळेही अपीलार्थीस तिने मागितलेली माहिती ही मिळालेली आहे. सबब, अपीलार्थीचे अपील खारीज करावे."

वरील खुलाशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना पुर्वी

माहिती मिळाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १८४५/२००७ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत त्यांचे ज्या ज्या अधिका-याकडे अर्ज केलेले असतील त्या संबंधीत माहिती अधिका-याकडे पत्राची प्रत देवून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपील क्रमांक १८४६/२००७ हे खारीज करण्यात येत आहे.

३) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-२.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८५१/२००७**
**अपील क्रमांक १८५२/२००७**

**अपील क्रमांक १८५१/२००७**

**१) श्री भानुदास भिमराव पातोडे**
**मु. तामशी, पो. बटवाडी, ता.बाळापूर, जि. अकोला. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.**
**३) जन माहिती अधिकारी तथा**
**अप्पर जिल्हाधिकारी तथा भ्रष्टाचार समिती अध्यक्ष,**
**अकोला. — उत्तरवादी**

**अपील क्रमांक १८५२/२००७**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, अकोला**
**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, बाळापूर,**
**ता. बाळापूर, जिल्हा अकोला. — उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक ४.८.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हजर आहे.

अपील क्रमांक १८५१/२००७ : मध्ये अपीलकर्ता यांनी आवश्यक असलेली त्यासंबंधा बध्दलची माहित मिळाल्यामुळे मी दाखल केलेले अपील परत घेत असून माझा अपील अर्ज खारीज करण्यात यावी ही विनंती, असे निमूद केलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

अपील क्रमांक १८५२/२००७ : मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१.२००७ रोजी तहसिलदार, बाळापूर यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून (१) पूर पिडीत व नैसर्गिक आप्पतीमुळे किती लोकांना मदत देण्यात आली.

(२) किती देण्यात आली.

(३) मुल्यांकन कोणी केले

(४) कोषागारातून काढलेल्या रकमांच्या नोंदी

(५) वाटप करण्यात आलेल्या नोंदी

(६) शिल्लक रक्कम किती

(७) मदत मिळालेल्या लोकांची यादी (गांव निहाय)

माहितीचा कालावधी २००६-०७. माहिती टपालाद्वारे घेणार. सोबत दारिद्रय रेषेखालील कार्ड जोडले आहे, असे नमूद केले आहे.

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२००७ रोजी तहसिलदार, बाळापूर यांनी " बाळापूर तालुक्यात माहे ऑगष्ट, २००६ मध्ये अतिवृष्टीमुळे व महापुरामुळे झालेल्या नुकसानीबाबत सर्व्हे करण्यात आला. सर्व्हेक्षणानुसार निराधार झालेले कुटूंबाना शासनाचे आदेशानुसार पात्र लाभार्थ्यांना सानुग्रह अनुदान देण्यांत आले. तसेच घरांचे नुकसान झालेबाबत सर्व्हे करुन अभियंताकडून मुल्यांकन अहवाल प्राप्त करुन शासनाचे आदेशानुसार पात्र लाभार्थ्यांना घर दुरुस्तीकरीता मदत देण्यांत आली. तसेच शेती पिकांचे, शेत जमितीने झालेले नुकसानीबाबत आपदग्रस्त शेतक-यांना शासन तर्फे तालुका कृषि अधिकारी, बाळापूर यांचे मार्फत मदत वाटप करण्यांत आली आहे. सदर माहिती फार मोठया प्रमाणात असल्यामुळे आपले अवलोकनार्थ या कार्यालयात ठेवण्यांत येईल, माहितीकरीता अग्रेषित." असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांना सदरचे पत्र मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे व त्यामुळे त्यांनी दिनांक २१.३.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक ३.४.२००७ रोजी, तहसिलदार, बाळापूर यांचेकडून माहितीशी संबंधीत मुळ रेकार्ड मागविण्यात आला असता त्यांनी त्यांचे पत्र दिनांक ४.३.२००७ अन्वये आपणास पाहिजे असलेली माहिती फार मोठया

प्रमाणात असल्यामुळे ती आपल्या अवलोकनाकरीता कार्यालयात ठेवण्यात आली आहे असे आपणास देखील कळविले आहे. तरी आपणास पाहिजे असलेली माहिती तहसिलदार, बाळापूर यांचे कार्यालयात जावून पाहावी. करीता आपण या कार्यालयास दिनांक २४.३.२००७ रोजी केलेले अपील अर्ज खारीज करण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. सदरच्या पत्राची प्रतीलिपी तहसिलदार बाळापूर यांना अग्रेषित केलेली दिसून येते. परंतु त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना तहसिलदार बाळापूर यांचेकडे जावून माहितीची तपासणी किंवा पाहाणी केली नाही व राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१.२००७ रोजीच्या अर्जात मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी संपुर्ण तालूक्यामध्ये जी गांवे आहेत त्या सर्व गावातील मदतीची माहिती मागीतलेली दिसून येते. ती अतिशय व्यापक प्रमाणात आहे असे जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचे म्हणणे आहे. सदरची माहिती अंदाजे ६,००० ते ७,००० पृष्ठांची होईल, असे त्यांचे म्हणण् आहे. व तसेच अपीलकर्ता यांनी दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र सादर केलेले असल्यामुळे सदरची माहिती त्यांना विनामुल्य द्यावयाची झाल्यास त्याकरीता येणा-या खर्चाचा विचार केला असता दिनांक ५.३.२००७ च्या पत्राप्रमाणे माहितीचे अवलोकन करण्याकरीता कळविलेले दिसून येते. आजही अपीलकर्ता यांचे निदर्शनास सदरच्या माहितीची व्यापकता आणून दिली असता त्यांनीही मान्य केले. व त्यांना गांवनिहाय माहिती उपलब्ध करुन पाहिजे व त्याकरीता सुध्दा जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, बाळापूर तालुक्यामध्ये ८८ गांवे आहेत. व त्या ८८ गावाच्या सुध्दा माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्याचा खर्चाचा पुन्हा प्रश्न उपस्थित होतो. त्याकरीता अपीलकर्ता यांनी स्वत: कार्यालयात जन माहिती अधिकारी यांचेकडे जावून माहिती मधून नोंदी काढून घेणे संयुक्तिक होईल. तसेच अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, सदरचे दिनांक ५.३.२००७ चे पत्र त्यांना जरी मिळाले नाही पण पाठविलेले आहे हे खरे मानल्यास विलंबाने पाठविण्यात आलेले आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. व त्याकरीता संबंधीत तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २० (२) प्रमाणे शिस्तभंगाच्या

कार्यवाहीची शिफारस करणे हे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १८५१/२००७ हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १८५२/००७ हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक २४.१.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती करीता जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत स्वत: उपस्थित होऊन माहितीचे अवलोकन करुन आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन घ्यावी. त्याकरीता त्यांनी तहसिलदार बाळापूर यांना तारीख व वेळ कळवावी व त्या वेळेत अपीलकर्ता यांनी अवलोकन करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

३) संबंधीत जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी विलंबाने दिनांक ५.३.२००७ चे पत्र पाठविलेले असल्यामुळे ते दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २० (२) अन्वये शिस्तभंगाची शिफारस करण्यात येत आहे.

४) जिल्हाधिकारी, अकोला यांनी सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाहीची अंमलबजावणी करुन आयोगाकडे तसा अहवाल सादर करावा. त्याकरीता स्वतंत्रपणे निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी, अकोला यांचेकडे पाठविण्यात यावी.

५) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-४.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८५३/२००७**

**१) श्री भानुदास भिमराव पातोडे**
**मु. तामशी, पो. बटवाडी, ता.बाळापूर, जि. अकोला. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा संस्थपक संचालक**
**किसान समृध्दी ॲग्रो ॲन्ड बायोटेक प्रा.लि.**
**बुलढाणा जिल्ह केंद्रिय सहकार बँक जवळ, पहिला मजला**
**शनिवार पेठ, देऊळगांव राजा, जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ४.८.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. संस्थपक संचालक कि सान समृध्दी ॲग्रो ॲन्ड बायोटेक प्रा.लि.बुलढाणा जिल्हा केंद्रिय सहकार बँक जवळ, पहिला मजला शनिवार पेठ, देऊळगांव राजा, जिल्हा बुलढाणा यांचे अधिकारी श्री शिवाजी विठोबा निखाडे हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२००६ रोजी शासकिय माहिती अधिकारी म्हणून संस्थपक संचालक कि सान समृध्दी ॲग्रो ॲन्ड बायोटेक प्रा.लि. बुलढाणा जिल्ह केंद्रिय सहकार बँक जवळ, पहिला मजला शनिवार पेठ, देऊळगांव राजा, जिल्हा बुलढाणा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन** : " (१) आपल्या के.मार्फत जट्रोफा लागवडीसाठी किती शेतक-यांनी अर्ज करुन किती एकर शेतीचे सातबारे व इतर आवश्यक कागदपत्रे दिली. (२) कंपनीत चानल परिणाम किती काम करतात (गांवनिहाय) (३) सभासद फीच्या साक्षांकित सत्यप्रती (४) किती शेतक-यांना लाभ ट्रेडींग योजनेचा लाभ देण्यात आला. (५) कंपनीला किती

अनुदान प्राप्त झालेत, किती शेतक-यांना किती टप्यात देण्यात आले. (६) मार्गदर्शन करुन पाहणीचा अहवाल (सर्व माहितीच्या व नोंदीच्या सांक्षांकित सत्यप्रती )."

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला दिसून येतो.

" बायोडिझेल निर्मीतीसाठी कच्चामाल म्हणून अखाद्य तेलबिया वर्गातील जट्रोफा या वाणाची निवड केंद्र सरकारच्या नोव्होड बोर्डाने सुचवली त्यानुसार कंपनीला कच्चा माल म्हणून जट्रोफाच्या बियांचा आवश्यक साठा मिळविण्याच्या मुळ हेतुने व शेतक-यांच्या ज्या जमिनीत ५००० किंवा त्यापेक्षा कमी उत्त्पन्न मिळते अशा पडीत जमिनित किंवा बांधावर लावण्याची शिफारस शेतक-यांना केली त्यानुसार

सन २००५-२००६ मध्ये ५००० एकर

सन २००६-२००७ मध्ये ४७२८३ एक एवढया क्षेत्रावर लागवड केल्या गेली.

१) कंपनीचे शासनाकडे लागवडधारक शेतक-यांची बाजु लावून धरली व जट्रोाचा समावेश रोजगार हमी फळबाग योजनेमध्ये शासन निर्णय क्रं.जट्रोफा-२००५/प्र.क्र.२५३/९-अे दिनांक २६ एप्रिल, २००६ मध्ये केला गेला व त्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे सातबारा, एकुण जमिनीचा दाखल (८-अ) इ. सर्व शेतक-यांचे प्रस्तावाबरोबर तालुका कृषी अधिकारी यांचे कार्यालयात जमा केले व जे शेतकरी स्वत: प्रस्ताव तयार करणार होते त्यांना ते कंपनीने त्यांचेकडे परत केले.

२) कंपनीत चॅनल पार्टनर म्हणून कुणीही काम करीत नसून सर्वजण कृषीमित्र म्हणून काम करत होते व ते मर्यादित कालावधीसाठी कार्यरत होते. कारण आमची कंपनी ही सिडस कंपनी नसून बायोडिझेल उत्पादक कंपनी आहे व जट्रोफाची लागवउ बांधावर किंवा पडीत जमिनीवर केल्यावर जट्रोफा ही जंगली वनस्पती असल्याने जास्त काळजी घेण्याची गरज नाही असे समजून कंपनीला कृषीमित्रांना कायमस्वरुपात ठेवणे परवडणारे नाही.

३) सभासद फी ही कंपनी व शेतकरी यांच्यामध्ये बिया खरेदीसाठी करार करण्याकरीता घेण्यात आली आहे व त्या प्रतीवर कंपनीने तसा स्पष्ट उल्लेख केलेला आहे.

४) कार्बनट्रेडींगचा अर्थ (थोडक्यात) जट्रोफाच्या झाडांपासून बिया मिळाल्यावर त्यापासून बायोडिझेल निर्मीती सुरु झाल्यावर झाडापासून बिया, बियापासून बायोडिझल निर्मीती, बायोडि -झेलचा प्रत्यक्ष वापर, वाहनातून कार्बन मोनाक्साईडच्या ऐवजी कार्बनडायऑक्साईड (Co२) सोडेल, सोडलेला Co२ हा जट्रोफा व इतर झाडे शोष्ज्ञन करतील. असे हे cycle पूर्ण झाल्यानंतर आपण पर्यावरणातील किती प्रदुषन कमी करतो त्याचे Carbon point कंपनीस मिळतात ही प्रक्रीया कंपनी सुरु झाल्यावर २-३ वर्षाची आहे.

५) कंपनीला समुचीत शासनाकडून निधीद्वारे जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो अशा अशासकिय संघटनेचीच माहितीच्या अधिकारातून माहिती मिळविल्या जाते. आमच्या कंपनीला कुठल्याही प्रकारचा निधी किंवा वित्तपुरवठा मिळालेला नाही किंवा अनुदान मिळालेले नही शेतक-यांना कंपनी मार्फत अनुदान नसून ते शासनातर्फे ३ वर्षात दिले जाते त्याचा G.R. क्रमांक दिलेला आहे. त्यामुळे अनुदानाबध्दलची विचारणा किंवा माहिती कृषी कार्यालयामार्फत मिळविता येईल. याचा कंपनीशी कुठलाही संबंध नाही. म्हणून कंपनी ही खाजगी स्वरुपाची असल्यामुळे माहितीच्या अधिकारातून माहिती देणे कंपनीला बंधनकारक नाही असे कंपनी समजते. - डॉ.रामप्रसाद रंगनाथराव शेळके, संस्थापक संचालक, किसान समृध्दी ॲग्रो ॲण्ड बायोटेक प्रा.लि."

" अर्जदारास मुदतीच्या आत केलेल्या खुलाशाचे विवरण व बिलंबाचे कारण (१) अर्जदाराचा माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून १८/१२/०६ नंतर आम्ही दिनांक २१.१२.०६ ला आमचे जावक नोंदवही प्रमाणे ३० दिवसाचे आंत अर्जदारास कलम ६ च्या पोट कलम १ अन्वये आणि कलम ७ ची पोट कलम (१) व (५) च्या अन्वये विहित फी भरणे गरजेचे आहे हे कळविले होते.

(२) अर्जदाराने माहितीचा अधिकार २०५ च्या नियमाप्रमाणे फी भरली नाही कारण अर्जदाराचे म्हणणे असे आहे की, अर्जदाराने स्वत:चे दारिद्ररेषेचे प्रमापणत्र सोबत जोडले असल्यामुळे व कलम ६ च्या पोटल कलम (१) अन्वये आणि कलम ७ ची पोट कलम (१)(५) अन्वये विहित फी भरणे गरजेचे नाही हे खरे परंतु, अर्जदाराने सोबत जोडलेले दारिद्र्य रेषेचे प्रमाणपत्र समुचित शासनाकडून निर्धारित करण्यात आलेल्या शासकिय अधिका-यांकडून पूर्णपणे प्रमाणित झालेले दिसून येत नाही कारण त्यावर १) विस्तार अधिकारी व २) संवर्ग विकास अधिकारी यांचे

सहीविना ते प्रमाणपत्र प्रमाणितच समजले जाऊ शकत नाही त्याच कारणाने अर्जदारास कलम ६ च्या पोट कलमान्वये फी भरण्याचे आमच्या पत्र क्रमांक २९७ द्वारे कळविले होते. - डॅा.रामप्रसाद रंगनाथराव शेळके, संस्थापक संचालक, किसान समृध्दी ॲग्रो ॲण्ड बायोटेक प्रा.लि "

सदरच्या कंपनीतर्फे श्री शिवाजी विठोबा निखाडे यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, कंपनीला शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नाही. शेतकरी जरी सभासद असले तरी शेतक-यांना परस्पर शासनाकडून अनुदान मिळते. कंपनी फक्त यादी पाठविण्याचे काम करते व त्यामुळे माहितीचा अधिकार हा कायदा कंपनीस लागू नाही. कंपनी खाजगी स्वरुपाची आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे हे कंपनीवर बंधनकारक नाही. तरी सुध्दा अर्जदारास माहिती हवी असेल तर त्यांनी माहितीच्या संदर्भामध्ये फी भरावी किंवा खर्च भरावा व त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली जाईल असे दिनांक २१.१२.२००६ रोजी कळविलेले दिसून येते. त्यामुळे कंपनीस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा लागू नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

अपीलकर्ता यांना दिनांक ३.३.२००७ रोजी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, बुलढाणा यांनी सुध्दा कंपनीकडून परस्पर माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी संस्थपक संचालक कि सान समृध्दी ॲग्रो ॲन्ड बायोटेक प्रा.लि.बुलढाणा जिल्ह केंद्रिय सहकार बँक जवळ, पहिला मजला शनिवार पेठ, देऊळगांव राजा, जिल्हा बुलढाणा या कंपनीकडून माहिती मागितली होती. परंतु सदरच्या कंपनीला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा लागू नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) कंपनीस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा लागू नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-४.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८५९/२००७**

**१) श्री माधवराव ज्ञानदेवराव काळे**
**ग्रामसेवक कॅालनी, मु.पो.सिरसो**
**ता.मुर्तीजापूर, जिल्हा अकोला.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)**
**जिल्हा परिषद, अकोला.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुर्तीजापूर**
**जिल्हा अकोला.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ५.८.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१.२००७ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहीती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

" जा.क्रं./जि.प./साप्रवि/पंचायत/६१९/०६ कार्यालय, जि.प.अकोला दि.२४.११.०६

विषय :- ग्रा.पं.सिरसो वार्ड नं.१ मध्ये नवीन औ.ोगिक कारखान्यांचे इमारतींना बांधकाम करण्याची परवानगी न देण्याबाबत.

संदर्भ :- श्री माधवराव ज्ञानदेवराव काळे निमंत्रक, ग्रा.पं. सिरसो वार्ड नं.१ समस्या निवारण व संघर्ष समिती ता. मुर्तीजापूर यांची तक्रार दिनांक १३.११.०६.

वरील संदर्भीय विषयानुसार खालील प्रमाणे माहिती

१) संदर्भीय पत्रावर काय कार्यवाही करण्यांत आली.

२) कार्यवाही झाली नसल्यास व पत्रामध्ये नमूद कालावधीत अहवाल सादर केला नसल्यास त्याचे कारण.

३) कार्यवाही केली असल्यास चौकशी वा कार्यवाही अहवालाची प्रत द्यावी.

४) तक्रार कर्त्याला व ग्राम पंचायतला वरील संदर्भीय पत्राचे संबंधाने पत्रव्यवहार केला असल्यास त्याच्या प्रमाणित प्रती द्याव्यात.

५) सन २००४-२००५, २०००५-०६ व २००६-०७ या कालावधीत सिरसो ग्रा.पं.ची कितीदा तपासणी केली त्याबाबत निरीक्षण टिपणीच्या व निराकरण अहवालाच्या प्रमाणित प्रती द्याव्यात.

आवश्यकतेनुसार कागदपत्रांचे शुल्क भरण्यास मी तयार आहो. कृपया मला कळविण्यांत यावे."

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १३.२.२००७ रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक २.३.२००७ रोजी सुनावणी घेवून ७ दिवसांत माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी, असे आदेश देण्यात आलेले होते. परंतु पुन्हा दिनांक १६.३.२००७ रोजी पत्र देवून माहिती उपलब्ध करुन द्यावी, असे आदेश देण्यात आले होते असे दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

राज्य माहिती आयोगाकडे सदरच्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भात श्री अे.डब्ल्यू. राजूरकर, विस्तार अधिकारी पंचायत समिती, बालापूर यांनी खुलासा व कागदपत्रे दाखल केली आहे. सदरच्या खुलाशामध्ये श्री माधवराव काळे यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता सचिव, ग्राम पंचायत शिरपूर यांचेकडे ग्राम पंचायतीच्या संदर्भात माहिती असल्यामुळे श्री माधवराव काळे यांना सोबत घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पाठपुरावा केलेला होता व त्याचा सविस्तर अहवाल तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती मुर्तीजापूर यांना सादर केलेला होता. त्याअनुषंगाने उपलब्ध कागदपत्राच्या आधारे व

पुढील कार्यवाही करीता अहवाल सादर केला होता. सदरच्या कागदपत्रामध्ये सुनावणीस उपलब्ध राहाण्याकरीता दिलेल्या अर्जाची प्रत आहे. सचिव, ग्राम पंचायत सिरसो यांचे दिनांक १५.४.२००७ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुर्तीजापूर यांना दिलेल्या पत्राची प्रत दिसून येते. त्यात आज दिनांक १५.५.२००७ रोजी विस्तार अधिकारी (पंचायत) श्री अे.डब्ल्यू. राजूरकर, माहितीचा अधिकार व तक्रार चौकशी करीता आले असता श्री माधव काळे, ग्रामसेवक यांनी माहितीच्या अधिकाराअंतर्गत मागितलेली संपुर्ण माहिती त्यांना लेखी स्वरुपात दिलेली आहे. माहिती मिळाल्याबध्दल श्री काळे यांची पोच माझ्या जवळ आहे. श्री माधव काळे यांनी पाणी पुरवठा योजनेबाबत मागितलेली माहिती दिनांक १८.५.२००७ रोजी आपणास लेखी स्वरुपात दिली असे लेखी निवेदन दिलेले दिसून येते. विस्तार अधिकारी यांनी पुन्हा माधवराव काळे व विस्तार अधिकारी श्री राजूरकर ग्राम पंचायत मध्ये चौकशीकरीता उपस्थित झाले असता सचिव, ग्राम पंचायत श्री अे.बी. वानखेडे पूर्व सूचना देवूनही सकाळी १२ वाजतापर्यंत गैरहजर असल्यामुळे तपासणीचे काम होऊ शकले नाही. दिनांक २१.३.२००७ बुधवारला ग्रामपंचयत सकाळपासून बंद होती. विस्तार अधिकारी यांचे समक्ष ग्राम पंचायत कार्यालय उघडण्यात येवून ग्राम पंचायत कार्यालयाची तपासणी करण्यात आली. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांनी माहितीच्या अधिकाराच्या वेळेस दिलेल्या निर्देशानुसार श्री एम.बी. वानखेडे हे अधिका-यांच्या आदेशाची अवहेलना करीत असल्याचे दिसून येते. पूर्व सूचना दिल्यानंतर श्री वानखेडे यांचे मुख्यालय सिरसो व एक ग्राम पंचायत असल्यानंतरही मुख्यालयाला राहात नाही. मागिल ६ दिवसापासून कार्यरत नाही असे समजते अशी श्री माधव काळे व विस्तार अधिकारी यांची सही असलेला अहवाल दिसून येतो. त्यानंतर विस्तार अधिकारी यांनी श्री वानखेडे यांना पाठविलेल्या पत्राची प्रत दिसून येते. पुन्हा विस्तार अधिकारी यांनी गट विकास अधिकारी यांना दिलेल्या दिनांक २२.३.२००७ च्या अहवालाची प्रत दिसून येते. त्यामध्ये -

(१) दिनांक १३.११.२००६ रोजी तक्रार अर्ज माझ्याकडे प्राप्त नाही.

(२) नवीन औद्योगिक कारखान्याबाबत ग्रा.पं.सिरसो कडून प्राप्त माहितीच्या अनुषंगाने २१.३.२००७ रोजी मी स्वत: श्री माधवराव काळे यांना घेवून सिरसो ग्रा.पं.ला उपस्थित होतो.

परंतु श्री एम.बी. वानखडे सचिव सिरसो यांचे गैरहजेरी मुळे माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.

श्री एम.बी. वानखडे यांनी गट विकास अधिकारी यांचेकडे अहवाल दिलेला दिसून येतो, त्यात श्री माधव काळे यांनी आजपर्यंत मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ९.१.२००७ रोजी दिलेल्या अर्जानुसार श्री माधव काळे यांनी परस्पर स्वत: त्याचे घरी जावून गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुर्तीजापूर व विस्तार अधिकारी, पंचायत समिती मुर्तीजापूर यांचे आदेशावरुन त्यांना संपूर्ण माहिती दिलेली आहे असा अहवाल दिलेला दिसून येतो. त्यानंतर दिनांक २०.४.२००७ रोजी मागितलेली सर्व माहिती माधव काळे यांना लेखी स्वरुपात मी स्वत: दिली आहे. श्री माधव काळे यांनी मागितलेल्या माहितीच्या अधिकारातील माहिती माझेकडे प्रलंबित नाही असे गट विकास अधिकारी यांना दिनांक २०.४.२००७ रोजी लेखी दिलेले दिसते. पुन्हा दिनांक १५.५.२००७ रोजी विस्तार अधिकारी यांनी व सचिव यांनी दिनांक १५.५.२००७ सिरसो ग्राम पंचायत सकाळी ९.०० वाजता तक्रार चौकशी व माहिती बाबत व ग्राम पंचायत तपासणी बाबत भेट दिली असता ग्राम पंचायत सचिव, श्री वानखडे, व ग्राम पंचायत कर्मचारी श्री गजानन मालधुरे उपस्थित होते. श्री माधव काळे यांना माहितीच्या अधिकाराअंतर्गत माहिती दिली असल्याचे श्री वानखडे ग्राम पंचायत सचिव यांनी लेखी दिले. पाणी पुरवठाबाबत द्यावयाची माहिती दिनांक १८.५.२००७ पर्यंत देण्यात येईल अशी माहिती सचिव यांनी लेखी दिली आहे. लोकशाही दिन तक्रार व इतर तक्रारीचे अनुषंगाने अर्थिक व्यवहाराचे व इतर रेकार्ड ग्राम पंचायत कार्यालयांत उपलब्ध नसल्या कारणाने तक्रार चौकशी होऊ शकली नाही. दिनांक २१.४.२००७ रोजी संपुर्ण रेकार्ड तपासणी करीता उपलब्ध करुन देण्याबाबत सचिवांनी लेखी दिले आहे. तसेच अर्जदाराच्या तक्रारीची पूर्ण चौकशी करण्यासाठी तक्रारकर्ता यांना उपस्थित राहाण्याबाबत सचिवांनी कळवावे. खरीप हंगाम सुरु झाल्यामुळे बियाणे मुदतीच्या आंत वाटप करावे असा अहवाल दिलेला दिसून येतो. त्यानंतर पुन्हा सिरसो ग्राम पंचायतचा रेकार्ड अद्यावत नसल्या कारणाने लोकशाही दिनाची तक्रार चौकशीकरीता रेकार्ड उपलब्ध करु शकलो नाही. तसेच श्री काळे यांनी माहितीच्या अधिकारा अंतर्गत मागितलेली माहिती मी देवू शकलो नाही. सदर माहिती व लोकशाहीदिन तक्रारीच्या चौकशी करीता रेकार्ड दिनांक ३०.५.२००७ रोजी

अद्यावत करुन माहिती सादर करण्यात येईल. मला रेकार्ड अद्यावत करण्याकरीता व माहिती काढण्याकरीता वेळ द्यावा असे लेखी दिनांक २२.५.२००७ रोजी दिलेले दिसून येते. पुन्हा माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता दिनांक २२.५.२००७ रोजी विस्तार अधिकारी यांनी वानखेडे यांना पत्र दिलेले आहे. अशा प्रकारचा अहवाल दाखल केलेला असला तरी वर नमूद केल्याप्रमाणे सदरची माहिती ही गट विकास अधिकारी यांनी अपीलकर्ता यांस दिनांक १३.११.२००६ च्या अर्जाच्या तक्रारीच्या नुसार चौकशी करुन द्यावयाची आहे. व ती त्यांना विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे संबंधीत तत्कालीन गट विकास अधिकारी हे दोषी आढळून येतात. तसेच माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता ज्यांचे सहाय्य गट विकास अधिकारी यांनी घेतलेले आहे असे अधिकारी व कर्मचारी सुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ५(५) प्रमाणे माहिती अधिकारी समजण्यात येतात व तेही दोषी आढळून येतात व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच इतर जबाबदार असलेले अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २० प्रमाणे शास्ती लादणे हे आवश्यक झाले आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांचे दिनांक ९.१.२००७ च्या अर्जातील दिनांक २४.११.२००६ च्या गट विकास अधिकारी यांना दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) संबंधीत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २० (२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. तसेच जे जे अधिकारी व कर्मचारी हे माहिती उपलब्ध न करुन देण्यास जबाबदार असतील त्यांना सुध्दा अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे माहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द सुध्दा शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

३) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांनी करावयाची असून त्याप्रमाणे अहवाल आयोगास ३ महिन्याचे आंत सादर करावा.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांना स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

५) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-५.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -**

**तक्रर क्रमांक १५१/२००७**

**१) श्री विकास गणपत शेंडे,**
**रा.नागरी बँक कॅालनी, राष्ट्रभाषा प्रचार समितीचे मागे,**
**हिंदनगर, वर्धा.** **तक्रारदार**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव,**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, बांद्रे (पूर्व), मुंबई -५१.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, बांद्रे (पूर्व), मुंबई -५१.** **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक ६.८.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारदार यांनी दिनांक १७.९.२००७ रोजी अपील क्रमांक १८७/२००७ मध्ये दिलेले आदेशाप्रमाणे नागपूर गृह निर्माण क्षेत्र विकास मंडळ यांनी ४४ एमआयजी बांधकामासाठी हुडको कडून कर्ज घेतले असून हुडको नार्म नुसार त्यांची बांधकाम व क्षेत्रफळ आहे हे जोडलेल्या दस्तऐवजावरुन सिध्द होते. त्यामुळे मुद्या क्रमांक १ नुसार उत्तरवादी यांनी दिलेली माहिती चुकीची आहे. इतकेच काय मुद्या क्रमांक ६ प्रमाणे दिलेल्या माहितीप्रमाणे २८० एमआयजी भामटी परसोडी व १६४ एमआयजी प्रियदर्शनी कॅालनी यांची अतिरिक्त किंमत प्राधिकरणाच्या आदेशाप्रमाणे परत केली. म्हणजेच म्हाडा मुंबई यांनी दिलेल्या पत्राप्रमाणे सदर प्रकरण म्हाडा मुंबईच्या अखत्यारित नाही, ही बाब खोटी आहे. मा. आयुक्तांनी म्हाडा नागपूरच्या हजर असलेल्या अधिका-यांनी दिलेली माहिती चुकीची होती. वास्तविक, म्हाडा कायदा १९७६ प्रमाणे म्हाडातील सर्व कार्यालये म्हाडा प्राधिकरण मुंबई यांच्या अधिकारात येते. इतकेच काय मुद्या क्रमांक ८ प्रमाणे नागपूर सुधार प्रन्यासने म्हाडा नागपूरला अनाधिकृत बांधकामाबाबत कळविले नाही असे उत्तरवादीच म्हणणे आहे हे चुकीचे आहे. त्याबध्दल अपीलकर्ता नागपूर सुधार

प्रन्यासचे पत्र जोडत आहो. यावरुन माहिती अधिका-यानी दिलेली माहिती चुकीची आहे असे तक्रारदार यांचे म्हणणे असून त्यांनी शपथपत्र दाखल केले आहे. शपथपत्र त्यांनी श्री आर.डी.ठाकूर ॲडव्होकेट यांची साक्ष काढून व ५/- रुपयाचे स्टॅाम्प लावून केलेले आहे.सोबत दिनांक १९.१.२००४ रोजी मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर यांनी अपीलकर्ता यांनी कळविलेल्या पत्राची प्रत जोडलेली आहे. सदरच्या पत्रातील मुद्या क्रमांक ११ मध्ये या योजनेलो हुडको अर्थसहाय्य प्राप्त झाले असल्यामुळे तत्कालीन हुडको मानकानुसार गाळयांच्या विक्री किंमतीची मर्यादा १,१५,०००/-आहे व या किंमतीमध्येच योजना करण्यात आलेली आहे. त्यानंतर दिनांक २५.५.१९९६ चे विभागीय अधिकारी (द.), ना.सु.प्र. नागपूर यांनी मुख्य अधिकारी, नागपूर गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ यांना वाटप धर्तीच्या नियमांचे उल्लंघन झाल्यामुळे उचित कार्यवाही करण्यात यावी. तसेच व अशा गाळयामध्ये मंजूर नकाशाव्यतिरिक्त जी काही जास्तीची बांधकामे केलेली आहे, अशांना ना.सु.प्र. तर्फे नोटीस देण्यात आलेली आहे व अशा बांधकामावर पाडण्याची कार्यवाही करण्यांत येत असते अशा पत्रांची छायांकित प्रत जोडलेली आहे व त्यामध्ये तक्रारदार यांनी चुकीची माहिती दिली असे कळविलेले दिसून येते. याबध्दल माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे खुलासा करताना सांगितले की, ४४ एमआयजी गट मानेवाडा ही योजना हुडको कर्जाच्या निधीमधून बांधलेली नाही तर १५४ शासनाचे अर्थसहाय्य या योजनेतून राबविण्यात आलेली नाही व त्याकरीता त्यांनी आयोगाकडे प्रशासकिय मंजूरी बध्दलचे दिनांक ७.१०.१९८८ चे अदेश दाखल केले आहे. तसेच अपीलकर्ता यांनी नकाशाच्या संदर्भात सुध्दा हुडकोनी राबविलेली असल्यामुळे हुडको योजने प्रमाणे असल्याप्रमाणे त्यांना उपलब्ध झालेल्या नकाशाच्या प्रतीवर हुडको अर्थसहाय्य योजना नमूद केलेले आयोगाच्या निदर्शनास आणले. त्या संदर्भात जन माहिती अधिकरी यांनी खुलासा करतांना नकाशाची छायांकित प्रत त्यांना जी उपलब्ध करुन देण्यात आली आहे त्यावर अंतिम मान्यता असल्यामुळे अधिका-यांच्या स्वाक्ष-या दिसून येत नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. कार्यालयामध्ये प्रपोझल तयार होत असतात व त्यात कालांतराने बदल होत जातो व अंतिमत: प्रशासकिय मान्यतेचे आदेश दाखविल्याप्रमाणे प्रशासकिय मान्यतेच्या आदेशाची प्रत दिसून येते. तसेच हुडको कडून कर्ज घेतल्यास शासनाकडून मान्यतेसाठी जी यादी पाठवायची असते त्या

यादीच्या छायांकित प्रती सोबत जोडण्यात आलेल्या असून त्यामध्ये ४४ एमआयजी बांधकामा संबंधाचा प्रस्ताव नाही असे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. मुद्या क्रमांक ८ च्या संदर्भामध्ये तक्रारदार यांचे मुळात प्रश्नच मोघम आहे. म्हाडा नागपूर यांनी आम्हास सहयोग केला नाही याबध्दल आपल्या कायदयानुसार धोरण द्यावे याबध्दल गृह निर्माण मंत्रालयाचे आदेश तरी आहे काय. तसेच नागपूर सुधार प्रन्यासने अनाधिकृत याबध्दल आपल्या कायदयान्वये धोरण द्यावे याबध्दल गृह निर्माण मंत्रालयाचे आदेश तरी आहे काय. याबध्दल नागपूर सुधार प्रन्यासने म्हाडा नागपूर यांना काहीही कळविले नाही व म्हाडा कायदयाच्या तरतूदीनुसार अनाधिकृत बांधकामावर स्थानिक प्रशासनामार्फत कार्यवाही केली जाते असे उत्तर देण्यात आलेले आहे.

अपीलकर्ता यांनी जे पत्र पुरावा म्हणून दिले आहे ते १९९६ चे आहे व त्या पत्राची तारीख दिली असती तर त्याबाबतची निश्चित उत्तरे मिळाली असती. परंतु मोघम प्रश्नांना उत्तरे मोघम मिळतात व त्याप्रमाणे उत्तर दिलेले दिसून येते. तक्रारदार हे ज्या पुराव्याच्या आधारे त्यांना माहिती चुकीची मिळाली आहे असे त्यांचे म्हणणे आहे त्या पुराव्या मधील माहिती त्यांना २००४ पुर्वी मिळाली आहे. परंतु, २००६ च्या अर्जाप्रमाणे जी माहिती त्यांना दिनांक २८.१.२००६ रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे ती माहिती ही आयोगापूढे सादर केलेल्या कागदपत्रावरुन खात्री करुन घेतल्यावरुन आयोगाची तशी खात्री झाल्यामुळे खरी व योग्य असल्यामुळे तक्रारदार यांची तक्रार ही खारीज करण्यास पात्र आहे. उपलब्ध झालेल्या माहितीच्या बध्दल तक्रारदार यांनी स्वतंत्रपणे त्या कायदयाप्रमाणे तक्रार करावी.

**<u>आदेश</u>**

१) तक्रारदार यांचा दिनांक २८.१.२००६ च्या माहितीच्या अर्जाप्रमाणे जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती खरी व योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-६.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १६८४/२००७**

**१) श्री मारोतराव विश्वनाथराव मोते (पो.नि.)**
**पोलीस नियंत्रण कक्ष, नागपूर शहर, नागपूर** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त**
**परिमंडळ क्रमांक २, नागपूर शहर, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
**पाचपावली विभाग, नागपूर शहर, नागपूर.**

**४) जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त, सदर विभाग,**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ६.८.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सदर/पाचपावली, नागपूर शहर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

" १) पोलीस स्टेशन पाचपावलीची दि. ९.२.०४, १०.२.०४, ११.२.०४ व ७.१०.०४ च्या स्टेशन डायरीची सत्यप्रत.

२) पोसबई लोकनारायन पांडे (त्यावेळी पो.स्टे. पाचपावली येथे नेमणुक) च्या दि. ९.२.०४, १०.२.०४, ११.२.०४ व दि. १२.२.०४ च्या आडवडी डायरीची सत्यप्रत. "

माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. परंतु सदरचा अर्ज हा शासकिय माहिती अधिकारी (सपोआ सदर विभाग) यांचे कार्यालयातील पोलीस शिपाई शिवराज ब.नं.३९७३ यांचे

हस्ते पाठविला असता संबंधीत लिपिक श्री बोरधाटे यांनी तो परत करुन सपोआ पाचपावती यांचे कार्यालयात देण्यास तोंडी कळविले. त्याप्रमाणे तो अर्ज सपोआ पाचपावली याचे कार्यालयात पोलीस शिपाई शिवराज यांचे हस्ते पाठविला असता संबंधीत क्लर्क श्री सहारे यांनी घेण्यास नकार दिला. सपोआ सदर यांचे कार्यालयात देण्यास तोंडी सांगितले. अशा प्रकारे दोनही कार्यालयात हा अर्ज न स्विकारल्याने आपणास सादर करण्यात येत आहे. करीता संबंधीतांकडून माहिती प्राप्त करुन मिळण्याबाबत विनंती आहे, असे शासकिय माहिती अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर शहर यांचेकडे अपीलकर्ता यांनी लेखी अर्ज दिलेला दिसून येतो.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :- " खालील मुद्यांवर माहिती मिळणेस विनंती आहे.

१. पो.स्टे.पाचपावलीची दि. ०९.०२.०४, १०.०२.०४, ११.०२.०४ व ०७.१०.०४ च्या स्टेशनची डायरीची सत्यप्रत.

२. पोसबई लोकनारायन पांडे (त्यावेळी पो.स्टे.पाचपावली येथे नेमणुक ) च्या दि. ०९.०२.०४, १०.०२.०४, ११.०२.०४ व दि. १२.०२.०४ च्या आठवडी डायरीची सत्यप्रत."

सदरच्या अर्जाप्रमाणे दिनांक ७.३.२००७ रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन) व माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांचे परिपत्रक दिनांक २०.९.२००६ नुसार या कार्यालयाचे संबंधीत उपविभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त यांना माहिती अधिकारी तसेच संबंधीत उपविभागाचे पोलीस उपआयुक्त यांना अपीलीय अधिकारी म्हणून नियुक्त केलेले आहेत. करीता आपला अर्ज संबंधीत माहिती अधिकारी यांचेकडे आपणास माहिती पुरविण्यासाठी पाठविण्यात आला असून आपण परस्पर त्यांचेशी संपर्क साधून माहिती प्राप्त करावी, असे कळवून अर्जाच्या पत्राची प्रत शासकिय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सदर व पाचपावली नागपूर शहर यांना पाठवून त्या अर्जातील माहिती विहित मुदतीत पुरविण्यात यावी असे कळविण्यात आलेले दिसून येते. शासकिय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त पाचपावली यांचेकडून अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक १ ची माहिती दिनांक २०.३.२००७ रोजी उपलब्ध झाली असे त्यांनी सांगितले. परंतु मुद्या क्रमांक २ ची माहिती त्यांना उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांनी दिनांक

२०.४.२००७ रोजी अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्रमांक २ यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे दिनांक ३०.४.२००७ रोजी अमितेश कुमार, पोलीस उपआयुक्त परिमंडळ-२ यांनी पोलीस उपनिरीक्षक लोकनारायण पांडे हे पोलीस स्टेशन पाचपावली येथे तैनात होते परंतु त्यांनी साप्ताहिक डायरी पोलीस स्टेशन पाचपावली येथे दप्तरी दाखल केली नाही, असे पोलीस निरीक्षक पाचपावली यांनी सहाय्यक पोलीस आयुक्त, सदर विभाग यांना कळविले. तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त, सदर विभाग यांचे कार्यालयात सुध्दा सदर माहिती दाखल नसून त्या अभिलेख्यावर उपलब्ध नाही असे सहाय्यक पोलीस आयुक्त, सदर विभाग यांनी कळविले आहे. तरी आपण मागणी केलेला दस्तऐवज उपलब्ध नसल्यामुळे देता येणे शक्य नाही. तसेच सदर कालावधीची आठवडी डायरी पोलीस निरीक्षक लोकनारायण पांडे यांनी दाखल केली नसल्याबध्दल सहाय्यक पोलीस आयुक्त,सदर विभाग यांना योग्य कार्यवाही करण्याकरीता सूचना देण्यांत येत आहे असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे व सदरच्या निर्णयाने त्यांचे समाधान झाले नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी अपील मेमोसोबत मी या अधिनियमान्वये सादर केलेला अर्ज स्विकारण्यास नकार देण्यात आला. विहित मुदतीच्या आंत मला माहिती पुरविण्यात आली नाही किंवा त्या संदर्भात काहीही कळविण्यात आले नाही. करीता संबंधीतांना या अधिनियमाचे कलम २० प्रमाणे शास्ती करण्यात यावी. करीता अपील सादर, अशी विनंती आयोगाकडे केली आहे.

आयोगाकडील अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, पाचपावली विभाग यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

खुलासा- उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये सादर आहे की, अपीलकर्ता री मोते यांनी दि. ५.३.०७ रोजी माहिती अधिकारी व स.पो.आ. पाचपावली विभाग, यांचे नावे आाि माहिती अधिकारी व स.पो.आ. सदर विभाग यांचे नावे असे एकाच तारखेत दोत अर्ज त्यांचे वतीने त्यांचे कार्यालयीन पो.कॉ. भांगे, नियंत्रण कक्ष यांचे हस्ते आमच्या कार्यालयास पाठविले. या

पाठविलेल्या अर्जातील स.पो.आ. पाचपावली विभाग, यांचे नांवाने असलेला माहितीच्या अधिकाराचा अर्ज स्विकारण्यात आला आणि स.पो.आ. सदरचे नावानी असलेला अर्ज सदर विभागास सादर करण्याची संबंधीतास समज देण्यात आली होती.

वर नमूद प्रमाणे दि. ५.३.२००७ रोजी या कार्यालयात स्विकारण्यात आलेल्या अपीलकर्त्यांचे अर्जाची माहिती पो.स्टे.पाचपावली कडून प्राप्त करुन घेवून या कार्यालयाचे पत्र क्रं.सपोआ/पांवि/मा.अधि/२८७/०७, दि. १४.३.०७ रोजी मागितलेली माहिती घेवून जाणेकरीता अपीलकर्त्यास कळविण्यात आले. त्याअन्वये अपीलकर्ता यांचे वतीने पो.शि.भगवान, बक्क्ल नं. ३१७९ नेमणुक नियंत्रण कक्ष यांनी माहितीचे अधिकारान्वये रु. १८/- पो.स्टे. पाचपावली येथे भरुन ११ पाने माहिती दि.१४.३.२००७ रोजी मुदतीचे आत घेवून गेलेत.

परंतु, दुसरा अर्ज ज्यावर माहितीच्या अधिकारान्वये स.पो.आ. सदर असे नमुद केले होते. त्यावर अर्जाची माहिती मिळाली नाही. म्हणून अपीलकर्ता यांनी पोलीस आयुक्त कार्यालयाकडे अपील केली. त्या अन्वये पोलीस आयुक्त कार्यालयाचे पत्र क्रं. पोआना/माहीचा अधिकार/४०/०७, दि. ७.३.०७ रोजी या कार्यालयास निर्देश प्राप्त झाले. त्याचे निर्देशाप्रमाो सदर अपील अर्जातील मुद्या क्रं.१ मधील पो.स्टे. पाचपावलीची दि. ९.२.०४, १०.२.०४, ११.२.०४, ७.१०.०४ च्या स्टेशन डायरीची सत्यप्रती या कार्यालयातून अपीलकर्त्यास दि. २०.३.२००७ रोजी मुदतीचे आंत जा.क्रं.३००/०७ अन्वये पुरविण्यात आलेल्या आहेत.

पोलीस आयुक्तालयाचे वर नमूद संदर्भीय आदेशातील अपीलकर्त्यांच्या अर्जातील मुद्या क्रं. २ मध्ये नमूद पो.उप नि. लोकनारायण पांडे त्यावेळी पो.स्टे. पाचपावली येथे नेमणुकीस असतांना दि. ९.२.०४, १०.२.०४, ११.२.०४ व दि. १२.२.०४ च्या त्यांच्या आठवडी डायरीची सत्यप्रत ही माहिती स.पो.आ. सदर हे अपील कर्त्यास पुरवतील असे निर्देश मा. वरिष्ठांचे जा.क्रं.४०/०७ अन्वये देण्यात आले होते. सदरचे पत्र स.पो.आ. सदर यांचेकडे देखील पो.आ.ना. कडून पाठविण्यात आलेले होते व त्याची प्रत मा. पोलीस उप आयुक्त, परि-२ यांचे कार्यालयात देण्यात आली होती. त्याप्रमाणे मुद्या क्रं. २ ची माहिती अपील कर्त्यास पुरविण्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्रं.सपोआ/पांवि/म.अधि/२८१/०७, दि. ९.३.०७ अन्वये स.पो.अ. सदर यांना आमचे द्वारे देखील कळविण्यात आलेले आहे. स.पो.आ. पाचपावली हे

कार्यालय दि.१९.९.०४ रोजी अस्तीत्वात आले आहे. त्यापूर्वी हे क्षेत्र स.पो.आ. सदर विभागात होते म्हणून दि. १९.९.०४ चे पुर्वीचे अधिका-यांचे संबंधीत अभिलेख हे स.पो.आ. सदर यांचे कडे असल्याने मुद्या कं. २ ची माहिती स.पो.आ. सदर यांनी पुरवावी असे स्पष्ट आदेश होते.

यापुर्वी अपीलकर्ता श्री मोते यांनी या कार्यालयात माहितीचे अधिकारान्वये आता पावेतो वेगवेगळया दिनांकास एकुण १४ अर्ज सादर कले. त्याप्रमाणे त्यांना मुदतीचे आंत त्या चौदाही अर्जात नमूद माहिती पुरविण्यात आलेली आहे.

वर नमूद प्रमाणे जन माहिती अधिकारी तथा स.पो.आ. पाचपावली यांचे अधिपत्याखाली व कार्यक्षेत्रात उपलब्ध असलेली मुद्या क्रं. १ ची माहिती दि. २०.३.२००७ रोजी मुदतीचे आंत पुरविण्यात आली आहे. मुद्या क्रं. २ ची माहिती आमचे कार्यालयाशी संबंधीत असली तरीही ज्या काळातील माहितीची मागणी केली गेली, त्या काळात सदरचे कार्यालय अस्तीत्वातच नव्हते. तसेच अधिका-याचे आठवडा दैनंदिनीची माहिती वरील कारणास्तव आमचे कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे मुद्या क्रं. २ ची माहिती या कार्यालयाने पुरविण्याचा प्रश्नच उदभवत नाही.

सबब, या कार्यालयाकडून माहिती पुरविण्यास विलंब अथवा टाळाटाळ करण्यात आलेली आहे हे म्हणणे बरोबर नाही. माहितीची मागणी केल्याप्रमाणे मुदतीचे आतच पुरविण्यात आलेली आहे. सबब खुलासा सविनय सादर आहे. "

तसेच सहाय्यक पोलीस आयुकत, सदर विभाग यांनी दिनांक ११.६.२००८ रोजी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

खुलासा- " सविनय सादर आहे की, अर्जदार श्री एम.व्ही.मोते, तत्कालीन पोलीस निरीक्षक, नियंत्रण कक्ष नागपूर यांनी आपणाकडे त्यांना माहिती न मिळण्याबाबत अपील दाखल केले आहे. त्यानुसार सविनय निवेदन आहे की, अर्जदार श्री एम.व्ही.मोते यांनी मा. पोलीस आयुक्त, नागपूर कार्यालयात दिनांक ५.३.२००७ रोजी अर्ज सादर केला होता. त्यातील मुद्या क्रं. २ ची माहिती पुरविणे बाबत आम्हास पोलीस आयुक्त, नागपूर कार्यालयाकडून दि. ७.३.२००७ रोजी पत्र प्राप्त झाले होते. (पान क्रं.७) त्यानुसार ची माहिती तत्कालीन पो.उप.नि. श्री लोकनारायण पांडे, पो.स्टे. पाचपावली यांच्या दि. ९.२.०४, १०.२.०४, १.२.०४ व दिनांक १२.२.०४ च्या आठवडी डायरच्या सत्यप्रती मागणी केली होती.

सदर प्रकरणाची माहिती मिळण्याकरीता सदर कार्यालयामार्फत पोलीस निरीक्षक पो.स्टे. पाचपावली जा.क्रं.३८७/०७ दि. ८.३.०७ (पान क्रं.११) अन्वये पत्र देवून माहिती मागविण्यात आली. पोलीस उप आयुक्त, परि.२ नागपूर शहर यांना सुध्दा प्रत सादर केली. दिनांक १३.३.०७ रोजी पोलीस निरीक्षक पो.स्टे. पाचपावली यांनी सदर प्रकरणात त्यांचे कडील रेकार्ड पडताळून माहिती कळविली की त्यांचे कडे पो.उप नि. लोकनारायण पांडे हे पो.स्टे. पाचपावली येथे नेमणुकीस होते. परंतु त्यांनी आपले साप्ताहिक दैनंदिनी पो.स्टे. पाचपावली येथे दप्तरी दाखल केलेली नाही (पान क्रं.१२) तसेच तत्कालीन सहाय्यक पोलीस आयुक्त, सदर यांचे कार्यालयीन रेकार्ड पडताळणी केली असता त्यामध्ये सुध्दा श्री लोकनारायण पांडे पो.उप नि. यांच्या आठवडा डाय-या पाठविण्यात आली नसल्याची नोंद आहे. याबाबत तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री मोते यांना पोलीस निरीक्षक पाचपावली यांनी सादर केलेली माहिती घेवून जाण्यास त्यांना या कार्यालयाचे पत्र दि. ५.४.०७ (पान क्रं. १३ व १४) अन्वये कळविले परंतु ते कार्यालयात हजर न झाल्याने सदर माहिती आमचे कार्यालयीन रेकार्ड वर जा.क्रं.५७४/०७, दि. २४.४.०७ प्रमाणे माहिती श्री मोते यांना देण्यात आली आहे. (पान क्रं.१७)

श्री मोते यांनी अर्जात नमूद केले की, त्याचा अर्ज सहाय्यक पोलीस आयुक्त, सदर यांचे कार्यालयातील श्री बुरघाटे बाबु यांनी स्विकारला नाही आणि अर्ज सहाय्यक पोलीस आयुक्त, पाचपावली विभाग यांचेकडे पाठविण्यास सांगितले. याबाबत सहाय्यक पोलीस आयुक्त, सदर यांचे कार्यालयातील लिपिक श्री बुरघाटे यांनी त्यांचे जबाब सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन नागपूर यांना पत्र क्रमांक ५७३/०७, दि. २४.४.०७ प्रमाणे पाठविला आहे. (पान क्रं.१८ते२०) "

अपीलकर्त्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १४.३.२००७ रोजी मागितलेल्या माहितीच्या करीता अतिरिक्त शुल्क रुपये १३२/- भरण्याकरीता पत्र दिलेले दिसून येते. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी पोलीस स्टेशन पाचपावली कडून सदरच्या खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेतली आहे. परंतु माहिती उपलब्ध करुन घेताना अर्जातील मुद्या क्रमांक १ चे संबंधात ३४ पाने बाबत प्राप्त झाली. १३ ते ५३ अशी पोच त्यांनी दिनांक २०.३.२००७ रोजी देण्यात आलेली दिसते.

यावरुन त्यांना मुद्या क्रमांक २ ची माहिती उपलब्ध झाली नाही, असे दिसून येते. परंतु सहाय्यक पोलीस आयुक्त, सदर विभाग यांनी खुलासा दाखल करताना सदर प्रकरणाची माहिती मिळण्याकरीता पोलीस स्टेशन पाचपावली यांचेकडून पत्र पाठवून माहिती मागविण्यात आली. पोलीस उपआयुक्त परिमंडळ २ यांना सुध्दा प्रत सादर केली. दिनांक १३.३.२००७ रोजी पोलीस निरीक्षक, पाचपावली यांनी त्यांचेकडील रेकार्ड पडताळून माहिती कळविली की, त्यांचेकडे पोलीस उपनिरीक्षक लोकनारायण पांडे हे पोलीस स्टेशन पाचपावली येथे नेमणुकीस होते. परंतु, त्यांनी आपल्या साप्ताहिक दैनंदिनी पोलीस स्टेशन पाचपावली येथे दाखल केलेल्या नाहीत. तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त, सदर यांचे कालावधीतील रेकार्ड तपासला असता संबंधीत डायरी पाठविण्यात आली नसल्याची नोंद आहे. याबाबत तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री मोते यांना पोलीस निरीक्षक पाचपावली यांना सादर केलेली माहिती घेवून जाण्यास त्यांना या कार्यालयाचे पत्र दिनांक ५.४.२००७ अन्वये कळविले. परंतु ते कार्यालयात हजर न झाल्याने सदर माहिती आमच्या कार्यालयाने रेकार्डवर दिनांक २४.४.२००७ प्रमाणे देण्यात आली आहे. सदरच्या पत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, पोलीस उपनिरीक्षक लोकनारायण पांडे हे पोलीस स्टेशन पाचपावली येथे तैनात होते. त्यांनी पाठविलेली साप्ताहिक दैनंदिनी पोलीस स्टेशन पाचपावली येथे दप्तरी दाखल नाही असे पोलीस निरीक्षक पाचपावली यांनी कळविले आहे. तसेच या कार्यालयाला सुध्दा दत्परी दाखल केली नसल्याने अभिलेख्यावर उपलब्ध नाही असे पोलीस निरीक्षक पाचपावली यांनी कळविले आहे. तसेच या कार्यालयाला सुध्दा दप्तरी दाखल केली नसल्याने अभिलेख्यावर उपलब्ध नाही असे अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले आहे. तसेच लिपिक सपोआ सदर विभाग श्री एम.डी. बोरघाटे यांचा जबाब सुध्दा दिनांक २४.४.२००७ रोजी सादर केला आहे.

यावरुन अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन दिलेली आहे असे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीप्रमाणे निष्कर्ष काढावा लागतो. अर्जदार ज्या तारखेला माहितीच्या अधिकारात अर्ज कलम ६ प्रमाणे करतात त्यावेळेस त्या कार्यालयात

जी माहिती उपलब्ध असते ती ३० दिवसांत उपलब्ध करुन द्यावयाची असते. जी माहिती उपलब्ध नसते ती तयार करुन देता येत नाही. व त्यामुळे त्यांना त्याप्रकारे उत्तर दिलेले आहे.

असे असले तरी उपायुक्त यांनी अपीलकर्ता यांच्या प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या संदर्भामध्ये निर्णय देताना माहिती उपलब्ध नाही हा निर्णय दिलेला आहे. परंतु लोकनारायण पांडे यांचेकडून साप्ताहिक डायरी ही दाखल केलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द योग्य ती कार्यवाही करावी अशा सूचना सपोआ सदर विभाग यांना दिलेल्या दिसून येतात. त्याप्रमाणे सहाय्यक पोलीस आयुक्त सदर विभाग यांनी लोकनारायण पांडे यांचेकडून सदरची डायरी उपलब्ध करुन घेण्याकरीता कार्यवाही करुन घेणे आवश्यक होते. परंतु, सदरची कार्यवाही ही माहितीच्या अधिकारात येत नाही. तर ती स्वतंत्रपणे सहाय्यक पोलीस आयुक्त, सदर विभाग यांनी करावयाची आहे. परंतु, सहाय्यक पोलीस आयुक्त सदर विभाग यांनी अशा प्रकारची कार्यवाही केलेली नाही असे त्यांनी आयोगास सांगितले. सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन) यांनी दिनांक ७.३.२००७ रोजी माहिती अधिकारी व सहाय्यक पोलीस आयुक्त, पाचपावली विभाग व सदर विभाग यांना श्री बोरघाटे लिपिक यांचे संदर्भात तसेच लिपिक श्री सहारे यांचे संदर्भामध्ये त्यांचे स्पष्टीकरण घेवून योग्य कार्यवाहीकरीता कार्यालयास सादर करावे असे आदेश दिलेले दिसून येतात. सदर आदेशाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, बोरघाटे यांचा जबाब घेवून त्याप्रमाणे वरिष्ठ कार्यालयास सादर केलेला आहे. अर्थात, माहितीचा अर्ज न स्विकारणे याबध्दल जन माहिती अधिकारी यांना अधिनियमाचे कलम २० प्रमाणे जबाबदार धरण्यात आलेले आहे. परंतु सदरचा अर्ज लिपिक श्री बोरघाटे आणि श्री सहारे यांनी स्विकारलेला नसल्यामुळे त्यांचे विरुध्द योग्य ती प्रशासकिय कार्यवाही करणे संयुक्तिक राहील. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप आयुक्त यांचे निर्णयाप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सदर यांनी पोलीस उप निरीक्षक लोकनारायण पांडे यांचेकडून सदर कालावधीची आठवडी डायरी दाखल करण्याकरता योग्य ती प्रशासकिय कार्यवाही करणे संयुक्तिक राहील व त्यानंतर डायरी उपलब्ध झाल्यास माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक

राहील. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या मुद्या क्रमांक २ मधील मागितलेली माहितीच्या करीता जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सदर यांनी श्री लोकनारायण पांडे यांचेकडून सदरच्या कालावधीतील आठवडी डायरी उपलब्ध करुन घेण्याबध्दलच्या संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी यांचे आदेशाप्रमाणे प्रशासकिय कार्यवाही करुन डायरी उपलब्ध झाल्यास अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती रजिस्टर पोस्टाने विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-६.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १६८६/२००७**

**१) श्री राजेंद्र दादाजी मरसकोल्हे**
**मु.पो.देवलापार, ता. रामटेक,**
**जिल्हा नागपूर- ४४१४०८** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्र. कुलगुरु**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,**
**नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ६.८.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा व कागदपत्रे दाखल केली आहे. जन माहिती अधिकारी हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००६ रोजी जन माहिती अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या माहितीचा कालावधी १९९९-२००६ असून माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल : " शिक्षण शास्त्र पारंगत (M.Ed.) परीक्षेसाठी नागपूर विद्यापीठ पदव्यूत्तर शिक्षण विभाग, नागपूर येथे अपूर्ण राहिलेले डेर्झटेशन व असेसमेंटचे गुण मिळण्यासाठी परीक्षा देण्यासाठी पुन्हा ॲडमिशन घेण्याची गरज आहे काय. (२) नसल्यास वरील उल्लेखील बाबी पूर्ण करण्याची काय प्रक्रिया आहे (३) एकदा अप्रुव्ह झालेले synopsis

पुन्हा renew करावे लागणार काय? गाईड (मार्गदर्शक) पुरविण्याची वेगळी प्रक्रिया आहे काय? (४) मी विद्यापिठाला यासंबंधी दिलेल्या दिनांक ३१.१०.२००६ च्या अर्जावर काय कार्यवाही झाली ? नसल्यास त्याची कारणे (५) विलंबास जबाबदार असलेल्या कर्मचा-यांवर कार्यवाही करणार काय? पदव्यूत्तर विभागाच्या प्रमुख श्रीमती डॉ. शशी वंजारी यांनी माझ्या ३१.१०.२००६ च्या पत्रासंबंधी पत्रव्यवहार केला आहे काय? (६) यावर्षी शैक्षणिक वर्षात २००६-२००७ मध्ये पदव्यूत्तर शिक्षण विभागाच्या १९९८-९९ च्या माजी नियमित विद्यार्थी असल्याने Ex student म्हणून परीक्षेचा फार्म भरता येइल काय. तो कुठे सादर करावयाचा (७) असेसमेंट आणि डेझ र्टेशन सादर करण्यासाठी या शैक्षणिक वर्षात शेवटची तारीख काय असते. डेझर्टेशन साठी पदव्यूत्तर शिक्षण विभाग रा.तु.म. नागपूर विद्यापिठाकडून मार्गदर्शक मिळण्याची व्यवस्था या वर्षात करता येईल किंवा कसे ? याबाबत कृपया माहिती दयावी. (८) एम.एड.अभ्यासक्रम अपूर्ण असल्यास ते पूर्ण करण्यासाठी विद्यापिठाचे आर्डीनन्स आहे काय, असल्यास प्रत पुरवावी.

सदरच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३.२.२००७ रोजी देण्यात आलेला असून मागितलेली माहिती प्रश्न उत्तराच्या स्वरुपात असल्यामुळे आणि पदव्यूत्तर शिक्षण पारंगत शिक्षण घेणा-या अनुत्तीर्ण विद्यार्थ्याला अनुत्तीर्ण झाल्यानंतर पुनश्च परीक्षेत बसण्याबाबतची नियमाबाबत नियमिती विद्यार्थी असल्यामुळे विचारलेली माहितीची जाणिव होणे आवश्यक आहे. अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना निकाल जाहिर झाल्याच्या १५ दिवसात परीक्षा आवेदन संबंधित महाविद्यालयामार्फत जमा करण्याबाबतची जाणिव असते. तसेच माहिती नेमकी कोणत्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यासंबंधी आहे, याबाबतचा माहिती अर्जात तसेच दाखल केलेल्या अपीलात बोध होत नाही. परीक्षासंदर्भातील इतर विद्यार्थ्यांची माहिती अधिकार अधिनियमा अंतर्गत देता येत नाही. व त्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे, असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलाचा अर्ज दिनांक १७.११.२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर दिनांक २८.११.२००६ रोजी कुलसचिव व माहिती अधिकारी यांनी परीक्षा नियंत्रक व माहिती अधिकारी यांचेकडे हस्तांतर केलेला दिसून येतो. व त्याची प्रतिलीपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. पुन्हा दिनांक १२.१.२००७ रोजी सहाय्यक सचिव (परीक्षा) यांनी १५ दिवसांची मुदत वाढवून द्यावी याकरीता अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. दिनांक १७.२.२००७ रोजी Regarding completion of your incomplete P.G. M.Ed. course, your case was submitted to the Honble Head P.G. Deptt. Of Education for his detail comments as to how you could complete the course. You will be communicated the Final decision, only after receiving the comments in your case from the Head P.G. Deptt. Of Education.

माहिती विलंबाने देण्याचे कारण याबध्दलचा खुलासा परीक्षा नियंत्रक तथा माहिती अधिकारी यांनी दिलेला आहे तो खालीलप्रमाणे-

खुलासा - " माहिती मुदतीत दिली नसेल तर विलंबाची कारणे व त्याप्रमाणे खुलासा

१. अर्जदाराने त्यांच्या दि. १६.११.०६ च्या अर्जान्वये प्रश्नोत्तर स्वरुपात विचारलेली माहिती ही पदव्यूत्तर शिक्षणशास्त्र विभागाशी संबंधित असल्यामुळे पदव्यूत्तर शिक्षणशात्र विभाग प्रमुखांना याबाबत माहिती देण्यासाठी विनंती करण्यात आली होती. (अपील क्रं. १६.१.०७ व दि. २५.१.०७ रोजी)

२. त्यांनी या संदर्भात सहाय्यक कुलसचिव (विद्या विभाग) यांच्याकडून मार्गदर्शन घेण्यासाठी दि. २३.८.०६ रोजी कार्यालयीन टिपणी सादर केली होती.

३. दि. २३.८.२००६ च्या टिपणी संदर्भात माहिती प्राप्त न झाल्यामुळे पदव्यूत्तर शिक्षणशास्त्र विभाग प्रमुखांनी पुनश्च दि. २५.१.०७ रोजी सहाय्यक कुलसचिव (विद्या विभाग) यांना राजेंद्र मरसकोल्हे यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत उत्तर देण्यास मार्गदर्शन करावे, अशी विनंती केली होती.

४. पदव्यूत्तर शिक्षणशास्त्र विभाग प्रमुखांनी दि. ७.२.०७ रोजी विद्या विभागाने घेतलेल्या कार्यवाहीचा तपशिल सहायक कुलसचिव (सा.प्र. व चौकशी) यांना पाठविण्यात आला आहे. त्यावरुन विद्या विभागाकडून त्यांना माहिती प्राप्त झाली नाही असे दिसते.

५. या वस्तुस्थितीचा विचार करुन परीक्षा नियंत्रक तथा जन माहित अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, यांनी पदव्यूत्तर शिक्षण शास्त्र विभाग प्रमुखाकडून माहिती प्राप्त झाल्यानंतरच अर्जदाराने विचारलेल्या माहिती संदर्भात अंतिम निर्णय कळविण्यात येईल, असे अर्जदाराला दि. १७.२.०७ रोजीच्या पत्रानुसार कळविण्यात आले आहे."

तसेच अपीलाच्या संदर्भात झालेल्या कार्यवाही बध्दल सुध्दा खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

खुलासा- " १. अर्जदार राजेंद्र मरसकोल्हे यांच्या १७.११.०६ चा केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत केलेला अर्ज कुलसचिव कार्यालयाकडून त्यांच्या कुस/मा.अ./धा/०६/१८/८/९४६ दि. २८.११.२००६ च्या पत्रान्वये परीक्षा नियंत्रक तथा माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ३०.११.२००६ रोजी प्राप्त झाला. दि. २.१२.०६ रोजी सदरील अर्ज परीक्षा विभागाच्या संबंधित विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला.(A)

२. संबंधीत विभागाकडून १०.१.२००७ च्या टिपणीनुसार अर्जदाराने विचारलेली माहिती ही पदव्यूत्तर शिक्षण शास्त्र विभागशी संबंधित असल्यामुळे अर्जदाराचा अर्ज सदरील विभागात पाइविण्यात यावा अशी विनंती केली आहे (B)

३. यावर परीक्षा नियंत्रक व माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती काढण्यात येत असून १५ दिवसांत माहिती पुरविण्यात येईल व त्यासाठी १५ दिवसाचा कालावधी वाढवून देण्याबाबत विनंती करावी, अशी सूचना सहायक कुलसचिव (सा.परीक्षा व चौकशी) यांना दिली. (C) व अर्जदाराचा अर्ज पदव्यूत्तर शिक्षण शास्त्र विभागास १६.१.२००७ रोजी पाठविण्यात आलाण (D)

४ त्यानुसार अर्जदाराला सहायक कुलसचिव (सा. परीक्षा व चौकशी) यांनी त्यांच्या विभागाच्या पत्र दि. १२.१.०७ नुसार कळविण्यात आले (E)

५. पदव्यूत्तर शिक्षण शास्त्र विभागाने अर्जदाराच्या दि. १९.८.०६ च्या (F) अर्जासंदर्भात सहाय्यक कुलसचिव (विद्या विभाग) यांच्याकडे २४.८.०६ रोजी (G) नस्ती पाठविण्यात आली असे २२.१.०७ रोजी कळविले (H)

६. सहायक कुलसचिव (सा.परीक्षा व चौकशी) यांनी अर्जदाराने एम.एड. संदर्भात विचारलेली माहिती ही पदव्यूत्तर शिक्षणशास्त्र विभागाकडूनच प्राप्त होइल व त्यासाठी टिपणी पुनश्च सदरील विभागाला २५.१.०७ रोजी पाठविण्यात आली (I)

७. दरम्यान अर्जदाराने त्यांनी विचारलेली माहिती प्राप्त न झाल्यामुळे मा. प्र.कुलगुरु तथा अपिलेट अधिकारी यांच्या कार्यालयात दि. १६.१.०७ च्या अर्जान्वये अपील दाखल केले (I) (जोडपत्रे K to MM)

८. अर्जदाराने दाखल केलेल्या अपीलासंदभ्रत विभाग प्रमुख, शिक्षणशास्त्र विभाग यांनी त्यांच्या दि. ८.२.०७ रोजीच्या नस्ती अन्वये (N) व सहायक कुलसचिव (परीक्षा व चौकशी) यांनी त्यांच्या ३.२.०७ च्या नस्ती अन्वये (o) त्यांचे म्हणणे मा. अपीलेट ॲथारिटी यांच्याकडे सादर केले.

९. अर्जदाराने दाखल केलेल्या अपीलावर सुनावणी झाल्यानंतर मा.प्र.कुलगुरु तथा प्रथम अपीलेट ॲथारीटी यांनी त्यांच्या दि. ३.२.०७ च्या आदेशान्वये अर्जदाराने दाखल कलेले अपील खारीज केले (P) मा.प्रथम अपीलेट ॲथारिटी यांचा निर्णय अर्जदारास कार्यालयीन पत्र क्रमांक पीव्हीसी ०७/२२ दिनांक ५.२.०७ रोजी कळविण्यात आला.(Q)

१०. दि. २५.१.०७ ची टिपणी विभागप्रमुख, शिक्षण शास्त्र विभाग, यांनी सहायक कुलसचिव (विद्या शाखा) यांचेकउे २५.१.०७ रोजी पाठविली. (R)

११. या टिपणीवर उपकुलसचिव (विद्या) यांनी या संदर्भात घेतलेली कार्यवाही मा. कुलगुरु महोदयांच्या मान्यतेसाठी दि. ५.२.०७ रोजी सादर करण्यात आली, असे कळविले. (S)

१२. विभाग प्रमुखांनी सदरील टिपणी परीक्षा नियंत्रक यांना दि. ७.२.०७ रोजी पाठविली(I)

१३. यावर सहाय्यक कुलसचिव (सा.परीक्षा व चौकशी) यांनी अर्जदाराने विचारलेली माहिती पदव्युत्तर शिक्षण विभाग प्रमुख यांच्याकडून अभिप्राय प्राप्त झाल्यानंतरच देता येइल असे दि. ८.२.०७ रोजी सादर केल्यानंतर (U) परीक्षा नियंत्रक तथा माहिती अधिकारी यांनी Time limit

submit information under Right to Information Act २००५ within ०४ days अशा सूचना दिल्या. (V)

१४. यावर अर्जदाराच्या दि. १९.८.०६ रोजीच्या अर्जावर विद्या विभागाने घेतलेली कार्यवाही मा.कुलगुरुंच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आली असून विद्या विभागाकडून मान्यतेची नस्ती प्राप्त झाल्यानंतरच विद्या विभागाच्या अभिप्रायानुसार कार्यवाही घेण्यात येईल असे सहाय्यक कुलसचिव (चौकशी) यांनी दि. १२.२.०७ रोजी सादर केल्यानंतर (W) परीक्षा नियंत्रक तथा माहिती अधिकारी यांनी सादर केल्यानुसार मरसकोल्हे यांना कळवावे अशा सूचना दिल्या. (X)

१५. त्यानुसार सकुस (सा.प्र व चौकशी) यांनी अर्जदाराला त्यांच्या कार्यालयीन पत्र क्रं.GEE/No/२००६/ दिनांक १७.२.२००७ रोजी कळविले."

यावरुन अपीलकर्ता यांच्या विचारलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यांचा मुद्दा क्रमांक ४ वगळता एकुण ७ मुद्यांची मागितलेली माहिती ही हायपोथेटीकल (काल्पनिक) अशी आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (च) प्रमाणे माहिती या संज्ञेची व्याख्या दिलेली आहे. "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येमध्ये "माहिती" याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेखे, दस्तऐवज, ज्ञापन, इ-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दी पत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमूने, प्रतीमाने (model) कोणतीही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील इतर सामुग्री, याचा समावेश होतो. तसेच (अ)"माहितीचा अधिकार" या संज्ञेची व्याख्या दिलेली आहे. "माहितीचा अधिकार" याचा अर्थ कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा तीच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळविता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार असा आहे. व त्यात- i) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख याची पाहाणी करणे,

ii) दस्तऐवजाच्या किंवा अभिलेख्याची तपासणी करणे किंवा प्रमाणित प्रती घेणे,

iii) सामुग्रीचे प्रमाणित नमूने घेणे

iv) डिस्क, फ्लापी, टेप, व्हीडीओ कॅसेट या स्वरुपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रानिक प्रकारातील माहिती किंवा जेव्हा अशी माहिती संगणीकृत किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठवलेली असेल त्या बाबत मुद्रीत प्रती करुन (प्रिंट आऊट) माहिती मिळविणे याबाबतच्या

अधिकाराचा समावेश होतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या एकुण ७ मुद्यांच्या संदर्भामध्ये निर्णय प्रक्रियेशी संबंधीत असल्यामुळे निर्णय होईपर्यंत त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. व त्यानंतर विद्वत परिषदेचा निर्णय झाल्यानंतर दिनांक ३०.७.२००८ रोजी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे तो योग्य आहे. कारण कोणतीही निर्णय प्रक्रिया ही ३० दिवसांत पुर्ण होणे शक्य नसते. तसेच त्यासाठी कोणत्याही प्रकारचा कालावधी सुध्दा निश्चित करता येत नाही. व त्यामुळे निर्णय प्रक्रियेतील निर्णय होईपर्यंत माहिती उपलब्ध करुन देणे हे अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे अपेक्षित नाही. मुद्या क्रमांक ४ च्या संदर्भामध्ये त्यांनी दिनांक ३१.१०.२००६ रोजीच्या अर्जावर काय कार्यवाही केली अशी विचारणा केली आहे. परंतु दिनांक ३१.१०.२००६ चा अर्ज हा कोणत्या अधिका-याकडे दिलेला आहे याबध्दलचा उल्लेख केलेला नाही. त्या अर्जाचे अवलोकन केले असता सदरचा अर्ज हा विभाग प्रमुख, पी.जी. यांचेकडे केलेला असल्यामुळे सदरच्या अर्जाचे संदर्भात कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. किंवा त्याही अर्जामध्ये ज्या प्रक्रियेची माहिती मागितली आहे त्या प्रक्रियेच्या संदर्भात विद्वत परिषदेचा निर्णय हा त्यांनी मागितलेला दिसतो व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती विलंबाने उपलब्ध झ ालेली दिसून येते. त्यापेक्षा अपीलकर्ता यांनी एम.एड. या पदव्यूत्तर अभ्यासक्रमाकरीता विद्यापीठाचे नियम काय आहे याबध्दलची माहितीच्या छायांकित प्रती मागितल्या असत्या तर त्या तातडीने उपलब्ध झाल्या असत्या व त्यातून त्यांना त्यांच्या प्रश्नांची उत्तरे मिळाली असती. त्याकरीता अपीलकर्ता यांना विद्यापीठाच्या एम.एड. पदव्यूत्तर अभ्यासक्रमाकरीता आज अंमलात असलेल्या नियमांची किंवा आदेशाची किंवा अद्यादेशाची माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूरच्या एम.एड. पदव्यूत्तर अभ्यासक्रमाच्या संदर्भामध्ये

अंमलात असलेले आदेश किंवा अद्यादेश किंवा नियमांच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-६.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १६८५/२००७**

**१) श्री नरेंद्र मोतीपुरी गोस्वामी (पुरी)**
**कार्याध्यक्ष, महा.वनरक्षक वनपाल संघटना**
**सिव्हील लाईन, वनविभाग परिसर, नागपूर -४४०००१** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक**
**नागपूर वनविभाग, नागपूर. शासकिय मुद्रणालयाजवळ**
**सिव्हील लाईन, नागपूर**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी**
**नागपूर वनविभाग, नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ६.८.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक जून, २००७ (कार्यालयास प्राप्त दिनांक १५.६.२००७) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.२.२००७ रोजी " सन २००७ मध्ये नागपूर वन विभागामध्ये सन २००७ मध्ये नियतकालीन बदल्यामध्ये किती वनरक्षक वनपाल बदलीस पात्र आहे यांची जेष्ठतेप्रमाणे यादी देण्यात यावी. तसेच शासकिय धोरणानुसार किती टक्के बदल्या करण्याचे उद्यीष्ट आहे. नियतकालीन बदल्या शासकिय परिपत्रकाप्रमाणे कोणत्या महिन्यात करण्यात येणार आहे याची माहिती यथाशिध्र संघटनेस देण्यात यावी. " सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

अपीलकर्त्यांच्या अर्जाप्रमाणे दिनांक २६.३.२००७ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये पुरविता येणार नाही असे अपीलकर्ता यांना शासकिय माहिती अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता

यांनी दिनांक २४.४.२००७ रोजी उपवनसंरक्षक, नागपूर वन विभाग, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल कलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे कारण- अधिनियमाच्या कलम ३ चा सोयीस्करपणे चुकीचा अर्थ काढून माहिती द्यावयास नकार मिळाला व यादी देण्यास टाळाटाळ करण्यात आली असे दिलेले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १७.५.२००७ रोजी देण्यात आलेला असून संघटनेतील पदाधिका-यांना संघटनेकरीता माहिती उपलब्ध करुन देण्याची तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नाही व त्यामुळे शासकिय माहिती अधिकरी तथा उपविभागीय अधिकारी, नागपूर वन विभाग, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्रमांक/उपविविअ/नाग/३४९/अ, दिनांक २६.३.२००७ अन्वये घेतलेल्या निर्णयाशी सहमत आहे. परंतु आपण माहिती मागत असतांना अर्जावर आपल्या संघटनेच्या बरोबर स्वतःचे नांव सुध्दा लिहिलेले होते त्यामुळे आपणास खालीलप्रमाणे माहिती पुरविण्यात येत आहे.

नागपूर वनविभागामध्ये सन २००७ नियतकालिन बदल्यामध्ये बदलीस पात्र वनरक्षक व वनपाल यांची यादी सोबत जोडण्यात येत आहे. बदलीचे उदीष्ट ठरवून दिलेले नाही. शासन बदली अध्यादेश, २००६ अन्वये एका विभागातील एकुण कर्मचा-यांपैकी ३० टक्केपेक्षा जास्त कर्मचा-यांची बदली एक वर्षात करु नये असे शासन अधिनियमात स्पष्ट केले आहे. शासन बदली अध्यादेश २००६ अन्वये नियम कालीन बदल्या एप्रिल, ०७/मे, ०७ महिन्यात करण्यात आलेल्या/येणार आहेत. सहपत्रे १ ते ५. सदरच्या माहितीने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील मेमोमध्ये माहिती देण्याच्या सदर अर्जातील अ.क्रं. १ ते ५ नुसार माहिती देण्यास नकार दिला. क्रमांक ५ (२) नुसार अपूर्ण माहिती दिली. क्रमांक ५(३) अपूर्ण व चुकीची माहिती दिली. तसेच अपीलीय अधिकारी हे ५(१) च्या पत्राशी सहमत आहे, असे अपीलाचे कारण दिलेले दिसून येते. अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी माहिती अपूर्ण, दिशाभूल करणारी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र खालीलप्रमाणे सादर केले आहे.

प्रतिज्ञापत्र : " माहिती अपुर्ण व दिशाभुल करणारी असल्याबाबत प्रतिज्ञापत्र

मी नामे नरेंद्र मोतीपूरी गोस्वामी (पुरी) पत्ता कार्याध्यक्ष महाराष्ट्र वनरक्षक वनपाल संघटना नागपूर वनविभाग नागपूर प्रतिज्ञापत्र सादर करतो की, मी दि. २७.२.०७ चे अर्जान्वये

शासकिय माहिती अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी नागपूर वनविभाग व प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक नागपूर वनविभाग नागपूर यांनी दिशाभूल करणारी व अपूर्ण माहिती दिली आहे. तसेच सदर माहिती देता येत नाही हे कळविण्याकरीता एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी वेळ काढूपणाने घेण्यात आला यावरुन त्यांना सदर माहिती देण्यास टाळाटाळ करायची होती हे सिध्द होते.

१) दिशाभूल करणारी माहिती :-शासकिय माहिती अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी नागपूर वनविभाग नागपूर यांनी आवश्यक असलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ३ अन्वये पुरवठा करता येत नाही. असे त्यांचे पत्र क्रं.उपविवअ/नाग ३४९-अ, दि. २६.३.०७ अन्वये कळवून दिशाभूल केली. कृपया सहपत्र-१ पाहावे. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक नागपूर वनविभाग नागपूर हे शासकिय माहिती अधिका-याचे निर्णयाशी सहमत असल्याचे त्यांचेकडील पत्र क्रं.शिलि-१/मा.अ/७३० दि. १५.५.०७ अन्वये स्पष्ट केले. (सहपत्र २ पहावे) त्यामुळे तेही दिशाभूल करण्यात सहभागी आहेत.

२) अपूर्ण माहिती दिली :- प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.शिलि-१/महा-अ ७३०/ दि. १७.५.०७ अन्वये पुरविलेली माहिती सुध्दा जाणिव पूर्वक व अपूर्ण पुरविण्यात आली. नागपूर वनविभागाचे स्थापनेवर येणारे व कार्यआयोजना विभाग नागपूर येथे कार्यालयात असलेली -

१. श्री पी.एम. चव्हाण, वनरक्षक दि.२७.७.०१ पासून कार्यरत

२. श्री एस.जे. काळबांधे, वनरक्षक, दि. १.४.२००२ पासून कार्यरत

३. श्री बी.एन. गोमासे, वनरक्षक, दि. ९.३.२००४ पासून कार्यरत असतांना व त्यांना त्याच ठिकाणी ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असतांना सुध्दा बदलीस पात्र कर्मचा-यांची पूरविण्यात आलेली यादीत त्यांचे नांवे देण्यात आली नाहीत. त्यामुळे पुरविलेली माहिती अपूर्ण असून दिशाभूल करणारी ठरते. व याकरीता शासकिय माहिती अधिकारी प्रथम अपीलीय अधिकारी पुर्णपणे दोषी ठरतात. माहिती पुरवितांना उपरोक्त दोन्ही अधिका-यांनी अक्षम्य निष्काळजीपणा व नियमाची अवहेलना करुन शासकीय धोरणाची चिरुफाड केली असल्याने

योग्य माहिती पूरविण्यास प्रथम टाळाटाळ करुन व नंतर सारवासारव करुन अपूर्ण माहिती देण्यास सर्वस्वी जबाबदार ठरतात. व पूर्णपणे दोषी ठरतात. करीता त्यांचे विरुध्द नियमांतर्गत योग्य ती कार्यवाही योजण्यात यावी, करीता नागपूर मुक्कामी आज दिनांक २४.६.२००८ रोजी प्रतिज्ञापत्र सादर करीत आहेत."

त्यात अपीलकर्ता यांनी अधिनियमाचे कलम ३ अन्वये माहिती पुरविता येत नाही याबध्दल आक्षेप घेतलेला आहे. त्यानंतर श्री पी.एम. चव्हाण, वनरक्षक, अे.जे. काळबांधे, बी.जे. गोमासे यांच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिली व त्यामुळे ती दिशाभूल करणारी ठरते असे त्यांचे म्हणणे आहे.

अपीलकर्त्यांच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्याकरता जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, त्यांनी दिनांक २८.२.२००७, १३.३.२००७, २२.३.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता आस्थापना अ कक्ष यांना पत्र दिलेले होते. परंतु त्यानंतरही सुध्दा अपीलकर्ता यांनी संघटनेच्या माध्यमातून महिती मागितलेली असल्यामुळे त्यांना अधिनियमाचे कलम ३ मध्ये नागरिकांना माहिती मागता येते, संघटनेला नाही या कारणास्तव सर्व अधिका-यांशी चर्चा करुन त्याप्रमाणे दिनांक २६.३.२००७ रोजी कळविण्यात आले होते. त्यावरुन एक मात्र निश्चित, अधिनियमाचे कलम ३ मध्ये या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधिन राहून सर्व नागरिकांना माहितीचा अधिकार अशी तरतूद आहे. व अपीलकर्ता यांनी संघटनेस माहिती उपलब्ध करुन द्यावी असे म्हटलेले असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन जर दिली नसेल तर सदरचे उत्तर हे सद्भावनेने दिले आहे हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. मात्र, प्रथम अपीलामध्ये माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे ती त्यांना का उपलब्ध करुन दिली याबध्दल प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा करताना व प्रथम अपीलाच्या निर्णय देताना सुध्दा श्री गोस्वामी यांचे नांव संघटनेचे कार्याध्यक्ष असे दिलेले असल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली असा निर्णय दिलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांचे जे म्हणणे आहे की, तीन कर्मचा-यांची नांवे त्या जेष्ठता यादीत उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यामुळे ती अपूर्ण आहे. याबध्दल त्यांनी प्रतिज्ञापत्र सादर केले असले तरी त्याबाबत आयोग त्याबाबतची तपासणी करु शकत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी व माहिती अधिकारी यांना त्याबाबत विचारले

असता त्यांनी असे सांगितले की, इतर सर्व कर्मचा-यांची माहिती दिली त्यामुळे या तिघांची माहिती देण्यास अडचण नव्हती. परंतु तशा प्रकारे त्यांच्या निदर्शनास आणण्यात आले नाही. द्वितीय अपील मेमोमध्ये सुध्दा नाही व मात्र आयोगाकडे केलेल्या २४.६.२००८ च्या प्रतिज्ञा पत्रात आहे. त्यावर जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, सदरची माहिती त्यांना उपलब्ध करुन देता येईल. असे असले तरी अपीलकर्ता यांनी उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे ३ कर्मचा-यांच्या संदर्भामध्ये जर त्यांची तक्रार असेल तर ती योग्य त्या वरिष्ठ अधिका-यांकडे त्याबाबत तक्रार करणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे, जो निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला आहे तो योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक २७.२.२००७ च्या अर्जाप्रमाणे तसेच दिनांक २४.४.२००७ च्या प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे उपलब्ध करुन दिलेली माहिती व निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-६.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८६४/२००७**

**१) श्री बलराज सुमित्र पवार**
**सहाय्यक सरकारी अभियोक्ता, बाळापूर**
**जिल्हा अकोला.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा न्यायाधिश-१**
**अकोला.**

**३) जन माहिती अधिकारी तथा न्याय दंडाधिकारी,**
**बाळापूर, जिल्हा अकोला.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ७.८.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केली आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.२.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी म्हणून न्याय दंडाधिकारी, बाळापूर जिल्हा अकोला यांचेकडे, अकोला जिल्हयांतर्गत व तालुका स्तरावर न्याय खात्यासाठी माहिती अधिकारी नेमन्यात आहे आहेत काय. (२) असल्यास ते कोण आहेत त्यांची नांवे व पत्ते असलेला बोर्ड (फलक) आपल्या न्यायालयाचे आवारात लावण्यात आला आहे काय. (३) नसल्यास तो केंव्हा लावणार आहे. (४) आपल्या न्यायालयाचे इमारतीत सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना कार्यालयासाठी जागा (रुम इत्यादी) सोयी लेखी हुकमाने देण्यात आली आहे काय (५) नसल्यास सदर सोयी केंव्हा उपलब्ध होणार आहेत. अशी माहिती मागितलेली दिसून येते.

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिवाणी न्यायाधिश यांनी Judicial Magistrate First Class , Balapur is not appointed as the public Information Officer under

Right to Information Act,२००५. Hence, the applicant is at liberty to move to proper forum. Hence, application is filed. Applicant to note accordingly. असे आदेश दिनांक ३.३.२००७ रोजी पारित केलेले दिसून येते. सदरच्या आदेशाची प्रत अपीलकर्ता यांना दिनांक ९.३.२००७ रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी पुन्हा दिनांक ५.३.२००७ रोजी न्याय दंडाधिकारी, बाळापूर यांचेकडे अर्ज करुन त्यांच्या दिनांक २८.२.२००७ च्या अर्जास अनुलक्षून बाळापूर तालुक्यासाठी आपण अगर आपले सहाय्यक अधीक्षक माहिती अधिकारी नसल्यास आपण आमचा तो अर्ज योग्य त्या माहिती अधिका-याकडे वर्ग करावा व जरुर ती माहिती आम्हांस देण्यात यावी अशी नम्र विनंती आहे, असा अर्ज केलेला दिसून येतो. त्यावर दिनांक ७.३.२००७ रोजी दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम श्रेणी, बाळापूर यांनी विद्यमान प्रमुख जिल्हा सत्र न्यायाधिश, अकोला यांनी प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, अकोला यांस माहिती अधिकारी म्हणून अकोला जिल्हयासाठी नेमणुक केलेली आहे व तसे परिपत्रक आदेश क्रमांक बी-१/२०/२००७, दिनांक ७.२.२००७ नुसार काढले आहे. या परिपत्रकात प्रबंधकांनी त्यांचेकडे दाखल होणा-या अर्जाचा निकाल हा माहिती अधिकारी कायदा, २००५ च्या अंतर्गत द्यावा, असे आदेश दिलेले आहेत. म्हणून अर्जदारांनी प्रबंधक, जिल्हा न्यायालय, अकोला यांचेकडे स्वतंत्ररित्या अर्ज दाखल करावा. या न्यायालयापूढे केलेला अर्ज पाठविण्याची कोणतीही तरतूद नाही. यास्तव अर्जदाराचा अर्ज रद्य करण्यात येत आहे असे आदेश पारित केले असून नक्कल दिनांक ९.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या निर्णयाने व्यथित होऊन अपीलकर्ता यांनी दिनांक ३.४.२००७ रोजी जिल्हा न्यायाधिश, अकोला यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये अपीलार्थीने जन माहिती अधिका-यांच्या निर्णयाची प्रत अपीलासोबत दाखल केली नाही. सबब प्रस्तुत अपील दाखल होऊ शकत नाही म्हणून अपील प्राथमिक चौकशीत निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी पुन्हा व्यथीत होऊन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदरच्या प्रथम अपीलाच्या सुनावणी करीता श्री डी.बी. माने, दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम श्रेणी, बाळापूर यांनी खुलासा दाखल केला आहे. सदरच्या खुलाशामध्ये वर नमूद केल्याप्रमाणे वस्तुस्थिती विषद करुन "या न्यायालयात दाखल केलेला अर्ज कार्यवाहीसाठी पाठविण्याची तरतूद नसल्याचे नमूद करुन निकाली काढण्यात आलेला आहे. ", असाही खुलासा दाखल केला आहे. तसेच जन माहिती अधिकारी तथा पबंधक जिल्हा न्यायालय यांनी सुध्दा खुलासा दाखल केला आहे. व सदरच्या खुलाशा मध्ये वरीलप्रमाणेच सर्व घटनाक्रम दिलेला आहे.

अपीलकर्ता यांनी त्यांच्या द्वितीय अपील मेमोमध्ये न्यायदंडाधिकारी, बाळापूर यांचेकउे माहिती मागितलेली होती परंतु ती माहिती त्यांनी पुरविली नाही. त्याचे असे की, जो अर्ज जन माहिती अधिकारी जिल्हा न्यायालय, अकोला यांचेकडे दिनांक ५.३.२००७ रोजी विनंती करुनही वर्ग केला नाही. तसेच प्रथम अपील दिनांक १८.४.२००७ चे हुकूमाने निकाली काढलेल्या हुकूमावर महिती पुरविली नसल्यामुळे तसेच या प्रकरणात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(३) चा भंग केल्यामुळे प्रस्तुत दूसरे अपील दाखल केले आहे, असे कारण दिलेले दिसून येते.

अपीलकर्ता यांच्या द्वितीय अपीलाच्या संदर्भामध्ये जो खुलासा दाखल करण्यात आलेला आहे त्या खुलाशामध्ये व दिलेल्या निर्णयामध्ये विद्यमान प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश अकोला यांनी प्रबंधक जिल्हा व सत्र न्यायालय यांची माहिती अधिकारी म्हणून अकोला जिल्हयासाठी नेमणुक केलेली आहे व तसे परिपत्रक बी-१/२०/०७, दिनांक ७.२.२००७ अन्वये काढलेले आहे. यावरुन असे दिसून येते की, जिल्हा न्यायालयाच्या अधिकारीतेखाली जिल्हयामध्ये जे सर्व कनिष्ठ न्यायालये येतात त्या सर्वांकरीता परिपत्रक जिल्हा व सत्र न्यायालय अकोला हे जन माहिती अधिकारी म्हणून आहे. असे असले तरी संपूर्ण जिल्हयाच्या कार्यक्षेत्रामध्ये अर्जदार यांनी अर्ज केल्यास तो अर्थातच प्रबंधक जिल्हा व सत्र न्यायालय यांचेकडे करावा लागेल. परंतु अशा प्रकारचे परिपत्रक काढलेले असल्यास त्याबध्दलची माहिती ही प्रत्येक तालुका स्तरावरील न्यायालयांच्या कार्यालयामध्ये दर्शनी भागात ठळकपणे लावलेली असेल तर अशा प्रकारचे अर्ज करण्याची वेळ नागरिकांवर येणार नाही. व त्यामुळे प्रत्येक तालका न्यायालयाच्या इमारतीमध्ये

दर्शनी भागामध्ये न्यायपालीकांमध्ये जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे फलक लावून माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच दिनांक २०.३.२००७ रोजी जिल्हा व सत्र न्यायाधिश यांना दिवाणी न्यायालय, बाळापूर यांनी सात ठिकाणी त्या प्रकारची माहिती दिलेली आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु सदरची कार्यवाही ही जिल्हा न्यायालयाचे दिनांक १६.३.२००७ चे पत्रानुसारच करण्यात आलेली दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांचा दिनांक २८.२.२००७ चा अर्ज त्यांनी शासकिय माहिती अधिकारी तथा न्यायदंडाधिकारी, बाळापूर यांचेकडे केलेला दिसून येतो.

अपीलकर्ता यांचा अर्ज हा अमान्य केल्यानंतर सुध्दा त्यांनी दिनांक ५.३.२००७ रोजी अर्ज हस्तांतर करावा असे कळविलेले असताना सुध्दा तो हस्तांतर केला नाही व अर्ज स्वतंत्ररित्या दाखल करावा. न्यायालयापुढे दाखल केलेला अर्ज पाठविण्याची कोणतीही तरतूद नाही असा जो आदेश पारित केलेला आहे तो आदेश माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी प्रमाणे नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(१) प्रमाणे` अर्ज सादर केला जाते. सदरचा अर्ज हा न्यायालयामध्ये न्यायालयीन कामाकरीता सादर केला नाही तर तो न्यायालय या सार्वजनिक प्राधिकरणातील माहिती मागण्यासाठी केलेला आहे. व त्यामुळे त्या अर्जावरील कार्यवाही ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी प्रमाणे करणे आवश्यक असते. न्यायालयापूढे केलेला अर्ज पाठविण्याची कोणतीही तरतूद नाही याचा अर्थ जे न्यायालयीन कामकाजाकरीता अर्ज केलेले असतात त्यांच्याबाबत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(३) प्रमाणे जी माहिती अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे असेल किंवा त्या माहितीचा विषय अन्य सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजाशी संबंधीत असेल अशी माहिती मिळविण्यासाठी एखादया सार्वजनिक प्राधिकरणाकडे अर्ज करण्यात आला असेल त्याबाबत ज्यांच्याकडे असा अर्ज करण्यात आला असेल ते सार्वजनिक प्राधिकरण असा अर्ज किंवा त्यास योग्य वाटेल असा त्याचा भाग अशा अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे हस्तांतर करेल व अशा हस्तांतरणाबाबत अर्जदारास देखील माहिती देईल. परंतु, पोटकलम नुसार कार्यवाहीच्या अर्जाचे हस्तांतर शक्य तितक्या लवकर करण्यात येईल, मात्र कोणत्याही

परिस्थितीत तो अर्ज मिळाल्याचे तारखेपासून ५ दिवसांपेक्षा अधिक विलंबाने करण्यात येणार नाही, अशी तरतूद आहे. व त्यामुळे सदरचा अर्ज हा तत्कालीन दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, बाळापूर यांनी जिल्हा व सत्र न्यायालय, अकोला यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून हस्तांतर करणे आवश्यक होते. अर्थात दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, बाळापूर यांनी सदरची माहिती ही ७ कार्यालयामध्ये दर्शनी भागात लावण्यात आलेली आहे असे कळविण्यात आल्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांनी विचारलेली माहिती ही उपलब्ध झालेली असेल असे गृहित धरण्यास हरकत नाही. परंतु त्यांच्या दिनांक २८.२.२००७ च्या माहितीच्या अर्जातील मुद्या क्रमांक ४ च्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन देणे हे आवश्यक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २८.२.२००७ च्या अर्जातील मुद्या क्रमांक ४ च्या संदर्भामध्ये उपलब्ध असलेल्या कागदपत्राच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपामध्ये माहिती उपलब्ध करुन द्यावी. मुद्या क्रमांक ५ हा अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे नसलयामुळे त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-७.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८७१/२००७**

**१) श्री डी.पी. धोटे**
**(श्रीमती रमा अहिर यांचे कायदेशिर कुळमुखत्यार)**
**कॅम्प्युटर सर्कल जवळ, राठीनगर, अमरावती.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसुल)**
**ता. जळगांव (जामोद), जिल्हा बुलढाणा.**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**संग्रामपूर, जिल्हा बुलढाणा.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ८.८.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री व्ही.के. राजपूत हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केली आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.७.२००६ रोजी सार्वजनिक माहिती अधिकारी तथा तहसिलदार, समुद्रपूर, जिल्हा बुलढाणा यांचेकडे " श्रीमती रमा अहेर यांना मिळणा-या वारस हक्काच्या जमीनीचे पटवा-याने बोकायदेशिर मार्गाने हस्तांतरण केले. त्याची दि. १८.९.२००२ ची तक्रारीचा चौकशी अहवाल मिळण्याबाबत. श्रीमती रमा अहीर यांनी दि. १८.९.२००२ ला केलेल्या तक्रारीची श्री पवार, ना.तहसिलदार यांनी चौकशी केली. परंतु चौकशी अहवाल अद्याप पर्यंत अप्राप्त आहे. तो अहवाल कृपया मिळणेस विनंती." सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

सदरच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३.२.२००६ रोजी उपविभागीय अधिकारी, राजस्व व महसुल यांचेकडे प्रथम अपील

दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

खुलासा - " मी १८.९.२००२ ला केलेल्या तक्रारीचे १ ते दिड वर्ष मा. तत्कालीन नायब तहसीलदार श्री पवार यांनी सग्रामपूर तहसिल कार्यालयात चौकशीचे काम केले. त्यांच्या आदेशान्वये चौकशीच्या काळात मी अमरावती येथून संग्रामपूर कार्यालयात १५ ते २० वेळा चौकशी निमित्य स्वतः हजर होतो. त्यामुळे झालेल्या चौकशी अहवाल देणे ही चोकशी अधिका-यांची जबाबदारी आहे. परंतु त्यांनी ती जबाबदारी पार पाडली नाही. म्हणून मी माहितीच्या अधिकार अधिनियमाच्या अंतर्गत अर्ज करुन कायदेशीर मार्गाने सदर चौकशी अहवाल मागीतला परंतु माहितीच्या अधिकाराच्या अर्जाचीही कुणीही दखल घेतली नाही व मला माहितीच्या अधिकाराच्या हक्कापासून वंचीत ठेवले. या प्रकरणाची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

१) माहितीच्या अधिकाराचे अर्ज न स्विकारणे

अर्ज देण्याच्या तारखे पर्यंत शासकीय माहिती अधिकारी पद निर्देशीत केलेले नव्हते व या माहितीचा फलक कुठेही लावलेला नव्हता त्यामुळे जन माहिती अधिकारी, पहिले अपीलीयंट अधिकारी यांची माहिती मला मिळु शकली नाही त्यामुळे श्री माळोदे ना. तहसीलदार यांना अर्ज स्विकारण्याबाबत विनंती केली परंतु त्यांनी अर्ज न स्विकारल्यामुळे सदरचा अर्ज कार्यालयीन प्रमुख या नात्याने मा. तहसीलदार संग्रामपूर यांच्या नावाने कार्यालयात सादर केला व अर्ज मिळाल्याची स्वाक्षरी घेतली या बाबतीत कोणत्याही कर्मचा-याने किंवा अधिका-याने सहाय्य किंवा मार्गदर्शन केलेले नाही. उलट टाळाटाळ केली. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २०(१) अन्वये दोषी आहेत.

२) अर्ज योग्य व्यक्तीकडे न पाठविणे

माहिती अधिका-याचे कोणतेही पद निर्देशित केले नसल्यामुळे मिळालेले पद निर्देशीत केलेल्या जन माहिती अधिका-यांकडे अर्ज पाठविण्याची जबाबदारी कार्यालयीन प्रमुखावर येते. या अर्जात मागीतलेली माहिती आज पर्यंत देण्यात आलेली नाही किंवा या संबंधात आज पर्यंत

काहीही कळविण्यात आलेले नाही व अर्ज नाकारल्याबाबतही निर्णय दिला नाही. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम ६ (३) (ख) अंतर्गत दोषी आहे.

३) पाठपुराव्याच्या पत्र व्यवहाराला निरर्थक पत्र व्यवहार समजून हेटाळणी करणे.

माहिती प्राप्त न झाल्यामुळे माहिती प्राप्त करुन घेण्याकरीता भरपूर चक्रा मारुन भरपूर पत्र व्यवहार केला आहे. त्याची दखल न घेता अर्जदारीची निर्थक अर्ज करण्याची सवय असा बदनाम जनक शब्द वापरण्यात आलेला आहे. १ अर्ज करण्याकरीता कमीत कमी सर्व बाबीचा विचार करुन ५० ते १०० रु. खर्च होतो व त्यासाठी वेळ सुध्दा घालवावा लागतो. असे नुकसान करुन कोणतीही सु व्यक्ती निरर्थक पत्र व्यवहार करणार नाही परंतु माहिती न दिल्याने पत्र व्यवहार वाढविण्या शिवाय पर्यायच उरत नाही.

त्यामुळे मागणी केलेली माहिती अधिनियम ७(२) अन्वये सदरची माहिती फेटाळण्यात आल्यामुळे ते दोषी आहे.

४) पहीले अपील :

जन माहिती अधिका-यांनी मागणी अर्जाच्या संदर्भात माहिती दिली नाही. कोणत्याही पत्राचे उत्तर नाही. मागणी फेटाळण्यात आल्याचे कळविले नाही. माहिती अधिका-याचे पद निर्देशित केलेले नाही. म्हणून वरिष्ठ अधिकारी मा. उपविभाग अधिकारी जळगांव जामोद यांच्याकडे रितसर दि.३.२.०७ पहीले अपील करण्यात आले.

याही कार्यालयाने सदरची माहिती पाठविण्याच्या हेतूने कोणतीच हालचाल केली नाही आलेला अर्ज योग्य अधिकका-याकडे पाठविण्याची कारवाही टाळली किंवा माझा अर्ज फेटाळल्याचे मला कळविले नाही. त्यामुळे माहिती अधिनियम ६(३) (ख) व ७ अन्वये दोषी आहेत.

५) वरीष्ठांची दिशाभुल करणे:

या नंतर याच मालमत्तेतील ठराविक मुद्यावर मा. उप विभागीय अधिकारी जळगांव जामोद यांच्याकडे कायदेशिर दि. ५.८.०४ ला अपील दाखल केले होते. त्याचा निर्णयाचा आदेश दि. १५.१२.०४ मा. उपविभाग अधिकारी यांनी पारित केले. या अपीलाचा व मा. तहसिलदार संग्रामपूर यांच्या चौकशीच्या मुद्याचा एकमेकाशी काहीही संबंध येत नाही. फक्त

मालमत्तेचा शेताचे सर्वे नं. सारखे आहे. याचा गैर फायदा घेवून तक्रारीची चौकशी पारित केलेल्या आदेशामध्ये आहे असे सांगण्यात येवून वरिष्ठांची दिशाभूल करण्यात येते. या कृतीमुळे पहिले अपीली अधिकारी दोषी आहेत.

६) शास्ती :वर नमूद केलेल्या अहवाला वरुन माहितीचा हक्क नाकारण्यात आला त्यामुळे माहिती अधिनियम २०(१) अन्वये संबंधीला शास्ती लावण्यातयावी व मला उचित न्याय द्यावा ही विनंती. "

तसेच माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

खुलासा- " अर्जदार श्री डी.पी. धोटे (रमाबाई अहिर यांचे कुलमुख्त्यार, रा.राठी नगर, अमरावती ) यांचा अर्ज दिनांक २४.७.२००६ रोजी या कार्यालयांस प्राप्त झाला. सदरहु अर्जानुसार अर्जदाराने श्रीमती रमाबाई यांना मिळणा-या वारस हक्काचे जमिनीचे तलाठी यांनी बेकायदेशिर मार्गाने हस्तांतरीत केले, त्याबाबत दिनांक १८.९.२००२ ला दिलेल्या तक्रारीच्या चौकशी अहवाल मिळणे बाबत अर्ज सादर केला होता. अर्जदाराचे दिनांक १८.९.२००२ ला दिलेल्या तक्रारीच्या चौकशी अहवाल मिळणे बाबत अर्ज सादर केला होता. अर्जदाराचे दिनांक १८.९.२००२ तक्रार अर्जात नमूद केल्याप्रमाणे तलाठी आवार यांचे कडील मुळ रेकार्डची अवलोकन केले. तसेच अर्जदाराने ज्या जमिनीच्या संदर्भात तक्रार केली आहे त्या जमिनीचा सातबारा फेर फार व इतर कागदपत्रे त्यास दिनांक १५.१२.२००६ व २.९.२००६ रोजी दिलेत. त्यांचे दिनांक १८.९.२००२ ची अर्जानुसार चोकशीची कार्यवाही चालु असतांना त्यांनी मुळ अर्जावर अवलंबून न राहाता वेगवेगळया प्रकारचे २०-२५ अर्ज वि. जिल्हाधिकारी, बुलढाणा व उपविभागीय अधिकारी, जळगांव (जात्र तसेच तहसिलदार, संग्रामपूर यांचेकडे सादर केले. त्यामुळे अर्जदारास नेमक्या कोणत्या अर्जाची चौकशी हवी आहे, याबाबत बोध झालेला नाही. त्यामुळे त्यांचे दिनांक १८.९.२००२ चे अर्जाबाबत चौकशी पुर्ण झालेली नाही व अहवालसुध्दा सादर करण्यात आलेला नाही. त्यामुळे अर्जदारांस चौकशी अहवालाची प्रत देता आली नाही.

अर्जदाराने मौजा आवार येथील गट क्रं. २९,३०,५७ बाबत वेगवेगळया प्रकारचे अर्ज सादर केलेले आहेत. तसेच वि. दिवाणी न्यायालयात आणि वि. अपर जिल्हाधिकारी, बुलढाणा

यांचेकडे प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. न्याप्रविष्ठ प्रकरण असतांना त्यांचे तक्रार अर्जाबाबत कनिष्ठ कार्यालयांत चौकशी करणे योग्य होणार नाही.

अर्जदार हे स्वत: वेगवेगळया प्रकारचे अर्ज करण्याचे सवयीचे असून त्यांनी यापूर्वी सुध्दा आपले कार्यालयांत अपील क्रं.१५७५/०७ दाखल केले होते. सदर अपीलाची सुनावणी दि. ३.६.२००८ रोजी आपले समक्ष झालेली असून त्याच तारखेत अर्जदाराचे अपील खारीज करण्यात आलेले आहे. अर्जदारांस या कार्यालयातून उपलब्ध माहिती पुरविण्यात आलेली असून उपलब्ध नसलेली माहिती पुरविलेली नाही याबाबत अर्जदाराने सुध्दा पुन्हा मागणी केलेली नाही. अर्जदार यांना अर्ज करण्याची सवय असल्यामुळे त्यांनी हेतुपुरस्सर प्रथम व द्वितीय अपील सादर कलेले आहेत. सबब त्यांचा अपील अर्ज खारीज करण्यात यावा, ही विनंती. "

तसेच उपविभागीय अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल कला आहे.

खुलासा-" प्राप्त नोटीसीच्या अनुषंगाने अपीलार्थी श्री ज्ञानेश्वर पंजाबराव धोटे यांचे अपील अर्जावर नमूद मुद्यांवर खालीलप्रमाणे म्हणणे सादर करण्यात येत आहे.

१) अपीलार्थी श्री ज्ञानेश्वर पंजाबराव धोटे रा. अमरावती ता.जि. अमरावती यांनी दिनांक ३.१.२००७ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत या कार्यालयांत सादर केलेल्या अर्जाचे अवलोकन केले असता सदर अर्ज हा मौजा आवार ता. संग्रामपूर येथील शेत गट क्रं. २९ चे क्षेत्र हे.०.९२ आर व गट क्रं. ३० क्षेत्रफळ ०.६९ हे या जमिनीच्या संदर्भात घेतलेल्या वारसाच्या नोंदीबाबत असल्याचे दिसून आले. अपीलाचे प्रयोजन असे होते की, अपीलार्थीने मंडळ अधिकारी पातुर्डा तसेच नायब तहसिलदार पातुर्डा सर्कल यांचेकडे दिनांक ४.७.२००६ रोजी मौजे आवार येथील गट क्रं. २९,३० व ५७ मधील जमिनीच्या फेर फार नोंदीबाबत तसेच पेरपत्रकाच्या नोंदीची माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केले होते. परंतु, संबंधीत मंडळ अधिकारी व नायब तहसिलदार यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही या सबबीखाली अपीलार्थीने या कार्यालयांत दिनांक ३.१.०७, ८.१.०७, १५.१.०७ रोजी सदर अर्जाविरुध्द प्रथम अपील रजिस्टर पोस्टाने सादर केले.

२) अपीलार्थीने या कार्यालयांत सादर केलेल्या अपील अर्जात आवश्यक असलेल्या माहितीचे स्वरुप आणि विषय यामधील एक मध्ये मौजा आवार, तालुका संग्रामपूर येथील गट क्रं. २९ क्षेत्र

हे. ०.९२ आर, गट क्रं. ३० क्षेत्र हे. ०.६९ आर. च्या नोंदीसंबंधात उपस्थित सात मुद्याची माहिती मिळणेबाबत अपील सादर केलेले आहे. परंतु, आपले कार्यालयांत सादर केलेल्या अपील अर्जात दुरुस्ती करुन दिनांक १८.९.२००२ ला दिलेल्या तक्रार अर्जातील चौकशी अहवालाची प्रत अप्राप्त असल्याचे नमूद केले आहे. ही दुरुस्ती त्यांनी या कार्यालयांत सादर केलेल्या अपील अर्जात केलेली नाही. तसेच अपीलार्थी यांनी याच माहितीबाबत अपील क्रमांक १५७५/०७ दाखल केले होते. त्याची सुनावणी ३.६.२००८ रोजी झालेली असून अपील नामंजूर करण्यात आलेले आहे.

३) अपीलार्थी अर्जदाराने मागणी केलेली माहिती या कार्यालयाशी संबंधीत नसल्यामुळे तसेच तहसिल कार्यालयाचे प्रथम अपीलीय अधिकारी, तहसिलदार, संग्रामपूर हे असल्यामुळे अपीलार्थीचे अपील अर्ज या कार्यालयाचे पत्र क्रं.कावि/अका-२/माअ/२८/०७, दि. १६.१.२००७ अन्वये तहसिलदार, संग्रामपूर यांचेकडे पाठवून अपीलार्थीस नियमानुसार परस्पर माहिती देऊन अर्ज निकाली काढण्याबाबत सुचित करण्यात आलेले आहे. तसेच संबंधीत अपीलार्थीस सुध्दा पत्राची प्रत देण्यात आलेली आहे. सोबत जावक नोंदवहीची छायाप्रत जोडली आहे.

४) प्रस्तुत अपील प्रकरणी अपीलार्थीने दाखल केलेला अपील अर्ज संबंधीत प्राधिकरणांस म्हणजे तहसिलदार संग्रामपूर यांना हस्तांतरीत केलेला आहे. तहसिल कार्यालयांचे प्रथम अपीलीय अधिकारी तहसिलदार हे असतांना अर्जदाराने चुकीने या कार्यालयांस अर्ज सादर केलेला असून तो अर्ज संबंधीत प्राधिकरणांस हस्तांतरीत करण्यापर्यंत या कार्यालयांची जबाबदारी होती. ती या कार्यालयाने पार पाडलेली आहे. मी अपीलीय अधिकारी नसतांना सदर प्रकरणी मला चुकीने प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून प्रतिवादी करण्यात आलेले आहे. करीता माझे नांव प्रतिवादी म्हणून वगळण्यात यावे, ही विनंती. "

यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांच्या दिनांक २१.७.२००६ च्या अर्जाप्रमाणे अपीलकर्ता यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७ (१) प्रमाणे ३० दिवसांचे आंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही किंवा त्याबाबत पत्रव्यवहार केलेला दिसून येत नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अपीलकर्ता यांच्या दिनांक ३.२.२००७ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपीलाची दखल न घेता त्यांच्या दिनांक ३.१.२००७

रोजी दाखल केलेल्या अपीलाच्या संदर्भामध्ये खुलासा दाखल केला आहे. अपीलकर्ता यांनी वारंवार अनेक अर्ज केलेले असले तरी सदरच्या अर्जामध्ये माहिती मागण्याचा विषय हा वेगवेगळा असेल तर त्या प्रत्येक अर्जामध्ये स्वतंत्रपणे कार्यवाही करणे आवश्यक असते. परंतु तसे न करता प्रथम अपीलाच्या संदर्भात मात्र दिनांक ३.१.२००७ च्या संदर्भात आयोगाकडे जो खुलासा केलेला आहे तो अकार्यक्षमतेचा उत्कृष्ट नमूना आहे. सदरचे प्रथम अपील हे उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयात पोस्टाने पाठविण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार किंवा त्यावेळेस जे जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत असतील ते अधिकारी यांनी माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन न दिल्यामुळे अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे दोषी आढळून येतात व आयोगाची तशी खात्री
झालेली असल्यामुळे ते शास्तीस पात्र आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपील कोणत्या संदर्भामध्ये आहे याची कोणत्याही प्रकारची खात्री न करता, त्या प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही, निर्णय दिलेला नाही व आयोगाकडे दिशाभूल करणारा खुलासा दाखल केलेला आहे व त्यामुळे त्यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतूदींचे पालन केले नाही असा निष्कर्ष काढावा लागतो त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे. जन माहिती अधिकारी यांना नोटीस काढून आयोगापूढे हजर राहाण्याची पूरेपूर संधी त्यांना दिलेली होती. परंतु ते आज हजर राहीलेले नाही.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून त्यांनी त्यांच्या दिनांक २१.७.२००६ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) संबंधीत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) प्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ते दोषी आहे अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे त्यांचे विरुध्द कलम २०(१) प्रमाणे रुपये १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) शास्ती करण्यात येत असून त्यांचे दरमहाचे वेतनातून शास्तीची वसुली करुन

"**००७०-इतर प्रशासकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार(००७०-०१६-१)**" मध्ये जमा करावी. व आयोगास तसा अहवाल कळवावा.

३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अधिनियमाच्या तरतूदींचे पालन केले नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द प्रशासकिय कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

५) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-८.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८७५/२००७**

**१) श्री श्रीराम रंगनाथ बल्लाळ**
**अशोकनगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक,**
**वार्ड क्रं.५, अकोला -४४४००३.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त (प्र.)**
**महानगरपालिका, अकोला**

**३) जन माहिती अधिकारी तथा अभिलेखापाल**
**(विभाग प्रमुख), महानगरपालिका, अकोला.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ११.८.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.५.०७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केली आहेत.

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.११.२००६ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा अभिलेखापाल (विभाग प्रमुख) म.न.पा. अकोला यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल : " माझे सेवापुस्तकात नोंद केलेली आहे की त्यांचे संदर्भात कालबध्द पदोन्नतीचे रुपये ६९९६/- मला मिळालेले नाही. वारंवार विनंती अर्ज व निवेदने दिलेली आहेत. त्याची छायाप्रत जोडलेली आहे.

(१) सदर रकमेचे व्हाऊचर नंबर व दिनांक सहित देयक अदा करण्यात आलेले असल्यास सदर देयकाची प्रमाणित सत्यप्रत देण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचे इतर कारणे. त्याची प्रमाणित प्रत. कारण सेवा पुस्तकात लेखापाल यांचे सहीने असे लिहीले आहे की, बिल तयार करुन

दिले. कालबध्द पदोन्नतीचे फरकाचे रुपये ६९९६/- चे बिल तयार दिले. पविर्तीत दिनांक १०.६.२००४ ते २४.६.२००४ पर्यंत सही तु.स.यांची आहे. मला कालबध्द पदोन्नतीची रक्कम मिळालेली नाही. सेवा पुस्तकात असा रिमार्क कोणता कारणास्तव लिहीला त्याचे कारण मिमांसा.

(२) अंशराशीकरणाचे देयकावर कार्यालयीन कार्यवाही सहित संपूर्ण मुळ दस्ताऐवजाची सत्य प्रमाणित प्रत सोबत कालबध्द पदोन्नतीच्या अर्जाची (प्रलंबित) छायाप्रत जोडलेली आहे. "

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ८.१२.२००६ रोजी अपीलकर्ता यांना उत्तर देण्यात आलेले दिसून येते. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ५.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या नंतर सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. द्वितीय अपीलाच्या संदर्भामध्ये खुलासा करताना राज्य जन माहिती अधिकारी, अकोला महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

खुलासा-" माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती प्राप्तीसाठीचे अर्ज स्विकारण्यासाठी अकोला महानगरपालिकेत स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आलेला असून अधिनियमांतर्गत प्राप्त झालेले अर्ज संबंधित विभागाकडे वर्ग करण्याचे कार्य या कक्षामार्फत करण्यात येते. अर्जदाराने दि. २३.११.२००६ रोजी अभिलेखापाल (विभाग प्रमुख) मनपा यांचे नावाने दाखल केलेल्या अर्जातून मागणी केलेली माहिती लेखा विभागाशी संबंधीत असल्यामुळे सदरचा अर्ज लेखा विाागाकडेच परस्पर वर्ग करण्यात आला. त्यामुळे अपीलकताराचा मुळ अर्ज अभिलेखा विभागाला प्रत्यक्ष प्राप्त झाल्याची नोंद नाही.

अर्ज अभिलेखा विभागाचे नांवाने दाखल करण्यात आलेला असला तरी माहिती लेखा विभागाशी संबंधीत असल्यामुळे माहितीचा अर्ज लेखा विभागाकडे वर्ग करण्यात येणार असल्याची माहिती वजा सूचना अर्जदारांना दिनांक २३.११.२००६ रोजीच कक्षातील कार्यरत कर्मचा-यांनी दिलेली होती. म्हणूनच अपीलकतार/अर्जदारांनी अधिनियमाचे कलम १९ (१) अन्वये दिनांक ५.२.२००७ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जातून राज्य जन माहिती अधिका-यांचा तपशिल या रकान्यात माहिती अधिकारी, साप्रवि मनपा अकोला आणि माहितीचा तपशिल

रकान्याच्या पोट रकान्यात माहिती ज्या कार्यालयाशी किंवा विभागाशी संबंधीत आहे त्याचे नांव या अनुषंगाने, लेखापल, आस्थापना लिपिक, पेन्शन लिपिक मनपा, अकोला असा स्पष्ट उल्लेख केलेला आहे.

अधिनियमाचे कलम १९ (३) अन्वये मा. राज्य माहिती आयोगासमक्ष दाखल केलेल्या अपीलात अपीलकर्त्यांनी रकाना क्रं. ३ मध्ये संबंधीत माहिती अधिका-यांचा तपशिल म्हणून अभिलेखापाल (विभाग प्रमुख) महानगरपालिका अकोला असा उल्लेख केलेला असला तरी याच अपील अर्जातील रकाना क्रं. ८(२) मध्ये माहितीशी संबंधीत कार्यालय अथवा विभाग या शिर्षकाअंतर्गत लेखापल, आस्थापना, पेन्शन लिपिक मनपा अकोला असा स्पष्ट उल्लेख केलेला आहे.

माझे सेवापुस्तकात नोंद केलेली आहे की, त्याचे संदर्भात कालबध्द पदोन्नतीचे रुपये ६९९६/- मला मिळालेले नाही. वारंवार विनंती अर्ज व निवेदने दिलेली आहेत त्यांची छायाप्रत जोडली आहे.

१) सदर रकमेचे व्हाऊच्र नंबर व दिनांक सहीत देयक अदा करण्यात आलेले असल्यास सदर देयकाची प्रमाणित सत्यप्रत देण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचे इतर कारणे त्यांची प्रमाणित प्रत. कारण सेवा पुस्तकात लेखापाल यांचे सहीने असे लिहिले आहे की, बिल तयार करुन दिले कालबध्द पदोन्नतीचे फरकाचे रुपये ६९९६/- चे (बिल तयार दिले) परिवर्तीत दि. १०.६.०४ ते २४.६.०४ पर्यंत सही मु.अ. यांची आहे मला कालबध्द पदोन्नतीची रक्कम मिळालेली नाही. सेवा पुस्तकात असा रिमार्क कोणत्या कारणास्तव लिहीला त्याचे कारण मिमांसा.

२) अंशराशीकरणाचे देयकावर कार्यालयीन कार्यवाही सहीत संपूर्ण मुळ दस्ताऐवजाची सत्य प्रमाणित प्रत सोबत कालबध्द पदोन्नतीच्या अर्जाची (प्रलंबित) छायाप्रत जोडली आहे.

अपीलकारांनी कलम १९(३) अंतर्गतच्या अपील अर्जातून मागणी केलेली माहिती अपीलकारांच्या सेवापुस्तकातील नोंदी आणि त्यांचे सेवानिवृत्तीनंतरच्या आर्थिक हिशेबा संबंधीची आहे. सेवापुस्तकातील नोंदी संदर्भात अपीलकारांनी वेगवेगळे आक्षेप घेतलेले आहेत या आक्षेपामुळे त्यांचे सेवानिवृत्तीचे लाभ निर्धारणात अडचणी निर्माण झालेल्या असून आक्षेपांचे निवारण करुन सेवानिवृत्तीनंतरचे हिशेबां संबंधी अंतिम निर्णय घेण्यास विलंब होत असल्याचे

अपीलकारांचे वेळोवेळी चर्चे दरम्यान निदर्शनास आणून देण्यात आलेले आहे. अशाप्रकारे त्यांचे सेवानिवृत्ती संबंधी अंतीत निर्णय होऊन प्रकरण अंतिमत: निकाली निघालेले नाही. त्यामुळे प्रकरण नस्तीबध्द होऊन अभिलेखा विभागाकउे वर्ग करण्यात आलेले नाही म्हणून ज्या प्रकरणाची कागदपत्रे अभिलेखा विभागात वर्गच करण्यात आलेली नाही त्याची माहिती अथवा प्रती  अभिलेखा विभागाद्वारे अपीलकाराला उपलब्ध करुन देणे शक्य झाले नाही तथापि अपीलकाराचा मुळ अर्ज आणि प्रथम अपील या संदर्भात लेखा विभागाकडून अपीलकाराशी करण्यात आलेल्या पत्रव्यवहाराचा लेखा विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या तपशिला प्रमाणे अपीलकारांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीची कागदपत्रे दाखल करण्यात येत आहे."

तसेच अपीलकर्ता यांनी सुध्दा खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

खुलासा - " अपीलकाराने दि. २१.५.२००७ रोजी मा. राज्य माहिती आयोगासमक्ष अधिनियमाचे कलम १९(३) अन्वयेचे अपील प्रेषित केल्यानंतर अपीलकाराला अकोला महानगरपालिकेचे जा.क्रं./अमनपा/लेखा/३६/०७, दिनांक ६.७.०७ या पत्राने १.१०.९४ पासून दिलेल्या कालबध्द पदोन्नतीची थकीत रक्कम रुपये ६९९६-/ या कार्यालयामार्फत प्रदान करण्यात आलेली आहे. सदर रक्कम सन ९८-९९ मध्ये प्रदान करण्यात आली असल्यामुळे त्याबाबतचे प्रमाणक अभिलेख कक्षात शोधण्याचे काम सुरु असल्यामुळे सदर प्रमाणक उपलब्ध होताच आपणांस प्रमाणक क्रमांक व दिनांक कळविण्यात येईल. तसेच दिनांक १०.१.०७ अपील क्रं.४१ मधील माहिती लेखा विभागाशी संबंधीत नसल्यामुळे सदर बाबतची माहिती सा.प्र.विभागातून घेण्यात यावी असे कळविण्यात आले होते हे सोबत जोडलेल्या ६.७.०७ रोजीच्या पत्रावरुन स्पष्ट होते. त्यानंतर दिनांक १७.५.२००८ रोजीच्या लेखा विभागाच्या पत्रातील मुद्या क्रं. ५ मधून पुन्हा आपणांस रुपये ६९९६/- प्रमाणक क्रं.२५८४ दि. २.९.१९९९ नुसार रोखपाल मार्फत प्रदान करण्यात आले असून सदर प्रमाणक अभिलेखा विभागामध्ये शोधण्याचे काम सुरु आहे असे कळविण्यात आले होते. त्यानंतर महानगरपालिकेच्या लेखा विभागाने दि. ३.६.०८ रोजीच्या पत्रातून, अभिलेखा मनपा यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालावरुन अभिलेखा विभागाला दि. २१.५.२००८ रोजी अचानक आग लागल्याने त्यामधील ९० टक्के अभिलेख जळाल्यामुळे सदर प्रमाणक सापडणे शक्य नाही

असे त्यांनी दि. ३०.५.२००८ रोजी पत्राद्वारे या विभागास कळविले आहे करिता आपणास कळविण्यात येते की, सदर प्रमाणक शोधण्या बाबत या कार्यालयाकडून कार्यवाही करता येत नाही असे कळविण्यात आले असले तरी सेवा पुस्तकात, कालबध्द पदोन्नतीचे फरकाचे रुपये ६९९६/- चे बिल तयार करुन दिले परिवर्तीत रजा दि. १०.६.०४ ते २४.६.०४ पर्यंत अशी नोंद १२.८.९९ रोजी आगाऊ कशी करण्यात आली याचे कोणतेही संयुक्तिक कारण लेखा विभाग अथवा सामान्य प्रशासन विभागाने केलेले नाही म्हणून अपीलकर्त्यांचे मुळ सेवा पुस्तक बोलावून सेवापुस्तकातील या नोंदीची शहनिशा करणे आवश्यक आहे करिता अपीलकर्त्यांचे मुळ सेवापुस्तक मा. आयोगा समक्ष दाखल करण्याचे आदेश अकोला महानगरपालिका प्रशासनाला देण्यात यावेत, ही विनंती.

टिप : अंशराशीकरणाचे रकमेतून करण्यात आलेल्या कपातीचाही कोणताही हिशेब समजत नसल्यामुळे अपीलकाराने पुनश्च माहितीचा अधिकार कायद्यांर्गत माहिती मिळविण्यासाठी महानगरपालिका अकोला यांचेकडे अर्ज केलेला आहे."

दिनांक ६.६.२००७ रोजी प्रभारी लेखापाल, अकोला महानगरपालिका यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ५.२.२००७ च्या अर्जाचे संदर्भात " आपणास दिनांक १.१०.१९९४ पासून दिलेल्या कालबध्द पदोन्नतीच्या थकबाकीची रक्कम रुपये ६९९६/- या कार्यालयामार्फत प्रदान करण्यात आली आहे. सदर रक्कम सन १९८-९९ मध्ये प्रदान करण्यात आलेली असल्यामुळे त्या बाबतचे प्रमाणक अभिलेख कक्षात शोधण्याचे काम सुरु असल्यामुळे सदर प्रमाणक उपलब्ध होताच आपणास प्रमाणक क्रमांक व दिनांक कळविण्यात येईल. त्यांचे दिनांक १०.१.२००७ चे अपील क्रमांक ४१ मधील माहिती लेखा विभागाशी संबंधीत नसल्यामुळे सदर बाबीची माहिती सामान्य प्रशासन विभागातून घेण्यात यावी, " असे कळविण्यात आलेले दिसते. त्यानंतर दिनांक १९.९.२००७ रोजी उपायुक्त (प्रशासन), अकोला महानगरपालिका यांनी अपीलकर्ता यांना अपील क्रमांक ४५ च्या संदर्भामध्ये " आपणास दिनांक १.१०.१९९४ पासून दिलेल्या कालबध्द पदोन्नती वेतन फरकाची रक्कम रुपये ७९९६/- म.न.पा.च्या रोख पुस्तीकेनुसार प्रमाणक क्रमांक २५८४ दिनांक २.९.१९९९ नुसार प्रदान करण्यात आलेले आहेत. कृपया याबाबतची नोंद घेण्यात यावी. " प्रथम अपीलाच्या सुनावणी करीता अपीलकर्ता यांना दिनांक १७.२.२००७, ३०.४.२००७,

१४.६.२००७ व २०.६.२००७ या तारखांना सुनावणीस उपस्थित राहाण्याविषयी कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ३.६.०८ रोजी माहिती अधिकारी तथा प्रभारी लेखापाल यांनी अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये कळविलेले दिसून येते. तसेच पुन्हा आयुक्त, महानगरपालिका, अकोला यांनी दिनांक १७.५.२००८ रोजी त्यांच्या दिनांक १४.५.२००८ च्या अर्जाचे संदर्भात मुद्येनिहाय ६ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

अपीलकर्ता यांनी अंशराशीकरणाच्या रकमेतून करण्यात आलेल्या कपातीचा कोणताही हिशोब समजत नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी पुनश्च माहितीच्या अधिकारा अंतर्गत माहिती मिळविण्यासाठी महानगरपालिका यांचेकडे अर्ज केलेला आहे असेही म्हटलेले आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी  असेही सांगितले की, सदरहु प्रकरण हे अभिलेख्याशी संबंधीत असल्यामुळे त्यांनी आपण निष्कर्ष हा अभिलेख विभागशी संबंधीत असल्याबाबत उल्लेख केला आहे. तरी अपीलकर्ता २००३-२००५ या कालावधीमध्ये अभिलेखपाल म्हणून कार्यरत होते. व त्यांनी आपल्या कार्यालयामध्ये आपल्या संबंधीची सर्व कागदपत्रे ही अभिलेख विभागातून गहाळ केलेली आहे. तसा आरोप लेखा विभागाअंतर्गत नमूद केला आहे. त्यानंतर दिनांक २१.५.२००८ रोजी अभिलेख विभागाच्या कार्यालयात अचानक शार्ट सर्किटमुळे आग लागली त्यामुळे मागिल सर्व रेकार्ड हा निस्तानाभूत झालेला आहे असेही सांगितले. परंतु त्या आरोपाप्रमाणे पोलीस तक्रार ही करावयास पाहिजे होती. ती केलेली दिसून येत नाही. त्या आरोपाबध्दल पोलीस तक्रार करणे आवश्यक होते.

असे असले तरी, अपीलकर्ता यांना त्यांचा मुद्या क्रमांक १ च्या संदर्भामध्ये त्यांना कॅश रुमच्या रेकार्डची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. तसेच अंशराशिकरणाच्या देयकाच्या संदर्भामध्ये त्यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या करीता कार्यालयात जी कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्याच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी प्रमाणे कोणत्याही प्रकरणामध्ये गुणवत्तेच्या संदर्भात निर्णय प्रक्रियेमध्ये अंतिम कार्यवाही करुन मागता येत नाही व ती अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे अपेक्षित नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना अंशराशिकरणाच्या

रकमेतून कपात करण्यात आलेल्या कपातीचा कोणताही हिशोब हा महितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे करुन मिळणार नाही. तर तो त्यांना स्वतंत्रपणे जे त्याकरीता सक्षम अधिकारी असतील त्यांचेकडे तक्रार करुन न्याय मिळवून घ्यावा लागेल. असे असले तरी त्यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भामध्ये कॅश रुममधील त्यांच्या अर्जात नमूद केल्याप्रमाणे रुपये ६९९६/- या रकमेच्या संदर्भामध्ये जी कागदपत्रे उपलब्ध असतील त्याच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.

२) अपीलकर्ता यांना त्यांच्या मुद्दा क्रमांक २ प्रमाणे जी कागदपत्रे कार्यालयात उपलब्ध आहेत त्याच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.

३) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-११.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक ४५०/२००७**

**१) श्री संजय जगन्नाथ अकर्ते**
**६/४, शास्त्री नगर, अमरावती कॅम्प, अमरावती. तक्रारदार /अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**

**३) जन माहिती अधिकारी**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि.**
**डफरीन हॅास्पीटल जवळ सब डिव्हीजन क्रं.१,**
**अमरावती, ता.जि. अमरावती. गैरतक्रारदार /उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ११.८.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारदार यांनी दिनांक ८.२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) प्रमाणे तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार व उत्तरवादी हजर असून उत्तरवादी यांचे तर्फे ॲड. श्री राजेंद्र पांडे हजर आहे व त्यांनी युक्तिवाद केला.

तक्रारदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(१) प्रमाणे प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १५.२.२००८ रोजी दिलेला आहे. परंतु तत्पुर्वी अपीलकर्ता यांनी वर नमूद केलेली तक्रार दिनांक ८.२.२००८ रोजी दाखल केली आहे.

वास्तविक, अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केल्यानंतर प्रथम अपीलाचा निर्णय देण्याची मुदत संपेपर्यंत कोणत्याही प्रकारची अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक नव्हते. परंतु, प्रथम अपीलही दाखल करावयाचे व अधिनियमाच्या कलम १८ प्रमाणे तक्रारही दाखल करावयाची या दोनही प्रक्रियामध्ये राज्य माहिती आयोगास वेठीस धरण्यासारखे दिसून येते. असे असले तरी अधिनियमाचा उद्येश हा माहिती उपलब्ध करुन देणे असल्यामुळे

अपीलकर्ता यांच्या दिनांक ८.२.२००८ च्या तक्रारी व द्वितीय अपील एकत्र करुन पुढील निर्णय देण्यात येत आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१२.२००७ रोजी माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य इलेक्ट्रिसिटी डिस्ट्रीब्यूशन कंपनी, सब डिव्हीजन नंबर १, अमरावती यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

हव्या असलेल्या माहितीचा तपशिल : "१) ग्राहक क्रं. ३६६४७१९१४३१७
२) ग्राहक क्रं. ३६६४७१९१४३२५
३) ग्राहक क्रं. ३६६४७१९१४३३३
४) ग्राहक क्रं. ३६६४७००८९५०९
पोल नं.डीटीसी ४२९५६९६०१ सी ५१
ग्राहकाचे नांव - जगन्नाथ सिताराम अकर्ते
पत्ता-५०, राठी नगर, अमरावती.

महितीचा कालावधी : १९९३-२००७

हव्या असलेल्या माहितीचे वर्णन : अ) वरील मिटर लावण्याबाबत अर्जाची तारीख व अर्जाची सत्यप्रत (झेरॉक्स कॅापी)
ब) वरील अर्ज करण्याचा मालकी हक्काचा/भाडे पावतीचा तपशिल व मुळ कागदपत्र तपासणी झाल्याचा तपशिल.
क) मिटर देणा-या अधिका-याचे नांव, हुद्या व कोणत्या कारणास्तव मिटर देण्यात आले त्याचा संपूर्ण तपशिल.
ड) डिमांड नोट काढणा-याचा हुद्या व पैसे भरण्याची तारीख.
इ) सर्व कागदपत्राची सत्यप्रत (झेरॉक्स कॅापीज) पुरविण्यात यावी.
ई) मी संबंधीत कागदपत्रासाठी येणारा खर्च भरण्यास तयार आहे. "

माहितीच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१.२००८ रोजी माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता जी पत्रे त्यांच्या कनिष्ठ अधिका-यांना दिली त्याचा संदर्भ देवून माहिती कार्यालयात उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु संदरच्या उत्तराची प्रत ही अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जाबरोबर आयोगाकडे दाखल केली नाही. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी वर नमूद केल्याप्रमाणे तक्रारही दाखल केली व दिनांक १८.१.२००८ रोजी प्रथम अपील सुध्दा दाखल केले आहे. तक्रारीमध्ये अपीलकर्ता यांनी " १. That the attached chart will show that the Information Officer have posted me the wrong and incomplete information.

२. That they mention allotment of electric meters but do not have any records of allotment for the year २००४.

३. That they do not have any documentation how the meters were released by the then Junior Engineer.

**Prayer :** It is, therefore, humbly prayed that requisite enquire should be initiated against the Information Officer.

Encl : १) Reply chart of Information Officer

२) Xerox copy Application form Annexure A & B. " परंतु सोबत याबध्दल दोनही सहपत्रे दाखल केलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांचे तर्फे त्यांचे वकील यांनी असा युक्तीवाद केला आहे की, अपीलकर्ता तक्रारदार यांचा माहिती मागण्यासाठीचा अर्ज आल्यानंतर दिनांक १७.१२.२००७ रोजी माहिती अधिकारी यांनी श्री व्ही.पी. भारतीय, निम्नस्तर लिपिक, शहर उपविभाग क्रमांक १ (२) पी.बी. बिजवे, कनिष्ठ अभियंता, शेगांव सेंटर (३) एस.के. हनमंते, कनिष्ठ अभियंता, शहर उपविभाग क्रं.१ यांना मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता १० दिवसांचे आंत माहिती अधिकारी यांचेकडे द्यावी जेणेकरुन अर्जदारास योग्य ती माहिती ३० दिवसाचे आंत देता येईल. सोबत सहपत्र अर्जदाराचा अर्ज झेरॉक्स प्रत, सि.पी.एल. ४ ग्राहकांचे वगैरे.. पाठविलेले दिसून येतात. ज्युनियर इंजिनिअर यांनी दिनांक २७.१२.२००७ रोजी " The

information regarding this applicant is not available with the section. You may collect it from record section " असा शेरा दिलेला दिसून येतो. त्यानंतर दिनांक १५.१.२००८ रोजी श्री व्ही.पी. भारतीय यांना दिलेल्या पत्राप्रमाणे त्यांनी अर्जदार यांना सादर केलेले कागदपत्रे शोधण्याचा प्रयत्न केला होता, सापडत नाही. त्यामुळे त्यांचे सि.पी.एल. फक्त या पत्रासोबत दिले आहे. असे माहिती अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे दिनांक १६.१.२००८ रोजी अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. प्रथम अपीलाच्या नंतर सुध्दा दिनांक २४.१.२००८ रोजी उप कार्यकारी अभियंता यांनी आर.डी. इंगळे, सहाय्यक लेखापाल, शहर उपविभाग, अमरावती यांचेकडे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिलेले दिसून येते. त्यावर दिनांक १२.२.२००८ रोजी व्ही.पी. भारतीय, लोअर डिव्हीजन क्लर्क यांनी अपीलीय अधिकारी यांना अर्जदारांनी कनेक्शन घेताना सादर केलेल्या कागदपत्रांचा शोधण्याचा प्रयत्न केला परंतु सापडत नाही. वरील कागदपत्रांचा शोध घेण्याचा किमान ३-४ वेळा प्रयत्न करण्यात आला आहे असे कळविलेले दिसून येते. व त्यावरुन अंतिमत: दिनांक १५.२.२००८ रोजी अपीलकर्ता यांना उत्तर दिलेले दिसून येते.

दिनांक १५.२.२००८ च्या उत्तराने सुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच सदरची कागदपत्रे ही प्रत्यक्ष विज जोडण्याच्या वेळेस सादर करावयाची असतात व त्यामुळे ती उपलब्ध असावयास पाहिजे, असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, विज वितरण कंपनी कडून नविन नियमाप्रमाणे सर्व कागदपत्रांची मागणी न करता अर्जदारास एका पुराव्याच्या आधारे विज जोडणी दिली जाते व त्यामुळे तशा प्रकारची कागदपत्रे सुध्दा आंता उपलब्ध करुन देणे हे शक्य नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. दिनांक १५.२.२००८ च्या उत्तराचे संदर्भामध्ये सुध्दा मुळ कागदपत्रांसोबत मागिल २ वर्षापासूनचे अहवाल उपलब्ध ठेवतात बाकी सर्व रेकार्ड गोडावून मध्ये पाठविला आहे. त्याची पाहाणी केली असता तो मिळू शकला नाही. तसेच विज वितरण कंपनीच्या नियमाप्रमाणे कागदपत्रे नष्ट केल्या जाते व त्याप्रमाणे ती नष्ट झाली असावी. परंतु त्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे परिपत्रक किंवा पत्र आयोगाकडे सादर केलेले नाही. किंवा तसे आदेशही सादर केलेले नाहीत. त्यामुळे व दिनांक १५.२.२००८ च्या उत्तरातील ब प्रमाणे अपीलकर्ता तक्रारदार यांना

त्यांनी मागितलेली माहितीच्या करीता शोध घेण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (अ) मधील (एक) प्रमाणे कागदपत्रे तपासण्याचे अधिकाराप्रमाणे त्यांनी गोडाऊन मधील कागदपत्रे तपासणी घ्यावी व माहितीची कागदपत्रे उपलब्ध असतील तर उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार अपीलकर्ता यांची तक्रार व अपील हे दोनही मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) तक्रारदार अपीलकर्ता यांची तक्रार व अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून तक्रारदार अपीलकर्ता यांना दिनांक १५.२.२००८ च्या उत्तराप्रमाणे गोडाऊन मध्ये कागदपत्रे ही ठेवण्यात आलेली आहे असे जे कळविण्यात आलेले आहे त्या गोडाऊन मधील कागदपत्रांचा त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात तपासणी करण्याची परवानगी दयावी.

२) तक्रारदार अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांना संबंधीत कागदपत्रांच्या तपासणीसाठी तारीख व वेळ कळवावी.

३) तक्रारदार अपीलकर्ता यांनी तपासणीसाठी तारीख व वेळ कळविल्यानंतर त्या तारखेस व वेळेस त्यांनी त्यांचे वकीला सोबत तसेच विज वितरण कंपनीच्या कर्मचा-यांसमक्ष त्यांना कागदपत्रे उपलब्ध करुन देऊन त्याबाबतची तपासणी त्यांनी करावी.

४) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-११.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १९९६/२००७**

**१) श्री देविदास बळवंतराव मुळे**
**से.नि.ग्रामसेवक, पं.स. मुर्तीजापूर, जि. अकोला**
**द्वारा ग्रामसेवक कॅालनी, मु.पो.सिरसो, ता. मुर्तीजापूर,**
**जिल्हा अकोला.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत विभाग)**
**जिल्हा परिषद, कार्यालय, अकोला.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**गट विकास अधिकारी, पं.स. मुर्तीजापूर**
**ता. मुर्तीजापूर, जिल्हा अकोला.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ११.८.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या अपीलाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम २००० च्या अंतर्गत दिनांक ९.६.२००५ रोजी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, अकोला यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. गट विकास अधिकारी पंचायत समिती, मुर्तीजापूर, जिल्हा अकोला यांचेकडे दिनांक १.४.२००५ रोजी अर्ज दाखल केल्याची नोंद अपील मेमोमध्ये दिसून येते. परंतु, अर्जाची प्रत सोबत सादर केली नाही. यावरुन अपीलकर्ता यांनी सदरचा अर्ज व प्रथम अपील हे महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम २००० च्या अंतर्गत दाखल केले आहे असे दिसून येते. व त्यानंतर मात्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दूसरे अपील करुन मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र यांचेकडे दिनांक ९.१.२००७ रोजी दाखल केलेले दिसून येते.

महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००० हा निरसित झालेला असून महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ हा सुध्दा निरसित झालेला आहे. व त्यामुळे य दोनही अधिनियमाच्या अंतर्गत जे माहितीचे अर्ज दाखल केलेले आहे किंवा प्रथम अपील दाखल केलेले असतात त्यांच्या संदर्भामध्ये द्वितीय अपील हे मा. लोक आयुक्त यांचेकडेच दाखल करावयाचे असते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा केंद्र शासनाचा अधिनियम आहे. व तो दिनांक १२.१०.२००५ पासून अंमलात आलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियमाच्या अंतर्गत दाखल केलेल्या प्रथम अपीलाच्या निर्णया विरुध्द महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये द्वितीय अपील दाखल करण्याची कोणतीही तरतूद नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(१) प्रमाणे दाखल केलेल्या अर्जाचे संदर्भात प्रथम अपील किंवा द्वितीय अपीलाची तरतूद आहे. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.६.२००५ रोजी जर प्रथम अपील दाखल केले असेल तर जो अपीलाचा नमूना वापरलेला आहे तो महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००० चा आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील हे राज्य माहिती आयोगास सुनावणी घेवून निर्णय देण्याची अधिकारिता नाही व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील राज्य माहिती आयोगास अधिकारीतेच्या अभावी खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-११.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८८०/२००७**

**१) श्री भिकाजी मोतीराम वरोकार**
**रा. फुलेनगर शेगांव, ता.शेगांव, जि. अकोला** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**जिल्हा पोलीस अधिक्षक, बुलढाणा.**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**खामगांव, ता. खामगांव, जिल्हा बुलढाणा.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १२.८.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केली आहेत.

अपीलकर्ता यांनी दिनांक १.३.२००७ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी, खामगांव यांचेकडे "सावकारी व्यवहार चौकशीचा निकाल मिळण्याबाबत. मा. गृह मंत्री, श्री आर.आर. पाटील यांचे दिनांक ३१.१०.२००६ च्या अर्जावरुन कार्यालयातून शेगांव पोलीस स्टेशनला प्राप्त झालेल्या पत्रावरुन शोगांव पोलीस स्टेशनने गैरअर्जदार व त्याचे सोबत किती लोकांचे जबाब घेतले त्याचे नक्कला मिळणे करीता व शेगांव पोलीस स्टेशनला पत्र कोणत्या दिवशी प्राप्त झाले व तेथून चौकशी पुर्ण करुन खामगांवला कोणत्या दिवशी रवाना झाले त्याच्या तारखा नमूद करणे. माहिती स्वतः घेणार "असे नमूद केले आहे.

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.३.२००७ रोजी उप विभागीय पोलीस अधिकारी, खामगांव यांनी " सदरचा अर्ज दिनांक २७.११.२००७ रोजी पोलीस स्टेशन शेगांव येथे प्राप्त

झाला असून त्यांनी चौकशी करुन अहवाल दिनांक ९.१२.२००६ रोजी खामगांव येथे पाठविला आहे. चौकशी मध्ये घेण्यात आलेल्या जबाबाची नक्कल प्रत कलम ८ प्रमाणे नाकारण्यात येत आहे " असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १३.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १२.५.२००७ रोजी देण्यात आला असून " सदर अर्जाची माहिती आपणास यापूर्वीच दिनांक २१.३.२००७ रोजी इकडील कार्यालयाकडून देण्यात आलेली आहे " असे उपविभागीय पोलीस अधिकारी, खामगांव यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

सदरच्या द्वितीय अपीलाच्या संदर्भामध्ये पोलीस अधीक्षक, बुलढाणा तथा अपीलीय अधिकारी यांनी खुलासा दाखल केला आहे. परंतु खुलाशामध्ये अपीलकर्ता यांच्या नंतर केलेल्या अर्जाच्या संदर्भामधील माहिती उपलब्ध करुन देण्याचा खुलासा दिसून येतो. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.३.२००७ रोजी केलेल्या पत्राच्या संदर्भामध्ये अधिनियमाचे कलम ८ चा आधार घेण्यात आलेला दिसतो. परंतु, अपीलकर्ता हे स्वत: तक्रारदार असल्यामुळे व त्यांच्या तक्रारीच्या चौकशीच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली असल्यामुळे व चौकशी सुरु असल्यामुळे अधिनियमाचे कलम ८ प्रमाणे माहिती नाकारलेली दिसून येते. परंतु अधिनियमाच्या कलम ८(१) प्रमाणे माहिती प्रकट करण्यास अपवाद करावयाचा असेल तर गंभिर गुन्हयाच्या संदर्भामध्ये पोलीस तपास सुरु असेल तर महिती प्रकट करण्यास अपवाद करता येतो. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहाता सदरची माहिती ही गंभिर गुन्हयाच्या स्वरुपाची दिसून येत नसल्यामुळे व शेती खरेदी करुन दिली असे अहवालात म्हटले असल्यामुळे त्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देण्यास हरकत नव्हती. व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतूदी प्रमाणे सदभावनेने माहिती नाकारलेली असल्यामुळे त्यांच्या विरुध्द कोणत्याही प्रकारची कार्यवाही कण्याची आवश्यकता नाही. मात्र माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून कारण मिमांसा देणारा निर्णय दिला असला पाहिजे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली आहे असेच उत्तर द्यावयाचे असल्यास प्रथम अपीलीय अधिकारी हे अधिनियमाच्या तरतूदींच पालन करीत नाही असे म्हणावे लागते. अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिल्यावर समाधान झाले नाही म्हणूनच अर्जदार हे अपील करीत असतात व त्यामुळे अर्जदाराचे समाधान कशामुळे झाले नाही याची चौकशी करुन निर्णय देणे आवश्यक असते. प्रशासकिय पत्र देवून उत्तर देणे हे अधिनियामाच्या तरतूदींचे उल्लंघन करणारे ठरते,याची नोंद प्रथम अपीलीय अधिकारी तसेच पोलीस अधिक्षक यांनी घेणे आवश्यक आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १.३.२००७ च्या अर्जात मागितलेल्या माहितीप्रमाणे माहिती हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांना स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-१२.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**
**अपील क्रमांक ७८१/२००७**

**१) श्री प्रकाश दशरथ उराडे,** **अपीलकर्ता**
**प्र.अधीक्षक अभियंता (लोककर्म विभाग)**
**नागपूर महानगर पालिका, नागपूर.**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**अप्पर आयुक्त, महानगरपालिका, नागपूर**

**( आदेश पारित दिनांक १२.८.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. मुळ अर्जदार अपीलकर्ता श्री प्रमदास रेकाजी राठोड (यापुढे उत्तरवादी म्हणून उल्लेख केला आहे) अपीलकर्ता यांनी अप्पर आयुक्त तथा अपीलीय अधिकारी, महानगरपालिका, नागपूर यांचे दिनांक ३०.९.२००६ चे अपील क्रमांक एम.आय.आर. १११-७२-२००६ च्या निर्णयातील आदेशामध्ये " राज्य जन माहिती अधिकारी तथा प्रभारी अधीक्षक अभियंता श्री प्रकाश दशरथ उराडे यांनी अर्जदाराचे (उत्तरवादी) दिनांक ११.७.२००६ चे अर्जापासून ३० दिवस दिनांक १०.८.२००६ रोजी पुर्ण होत असल्याने माहिती उशिरा दिल्याबध्दल दिनांक ११.८.२००६, १६,८,२००६ पावेतो ६ दिवसाकरीता प्रति दिन रुपये २५०/- प्रमाणे एकुण रुपये १५००/- दंड लावण्यात यावा. ही रक्कम त्यांनी म.न.पा. फंडात जमा करावी असे आदेश दिलेले असल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले होते. परंतु, सदरचे अपील हे अर्ज स्वरुपात दाखल केलेले असल्यामुळे उत्तरवादी (मुळ अर्जदार) यांना नोटीस काढणे आवश्यक होते. व त्याकरीता त्यांना अपीलाचा नमूना बरोबर प्रपत्र क मध्ये अपील दाखल करण्यासाठी आयोगाने आदेश दिले होते. व त्याप्रमाणे अपीलकर्ता (मुळ माहिती अधिकारी) यांनी ४ जुलै, २००८ रोजी मुळ अर्जदार यांस

उत्तरवादी करुन अपील मेमो दाखल केला आहे. व त्याप्रमाणे श्री प्रेमदास रेकाजी राठोड, मुळ अर्जदार व उत्तरवादी यांना दिनांक ५.७.२००८ रोजी आयोगाचे कार्यालयातून आज दिनांक १२.८.२००८ रोजी दुपारी २.०० वाजता अपीलाच्या सुनावणीस हजर राहाण्याकरीता नोटीस काढून कळविण्यात आले होते. परंतु मुळ अर्जदार-उत्तरवादी श्री प्रेमदास रेकाजी राठोड हे आज हजर झाले नाही व त्यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा दाखल केला नाही.

मुळ अर्जदार-उत्तरवादी यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रभारी अधीक्षक अभियंता (लोककर्म), म.न.पा. नागपूर यांचेकडे दिनांक ११.७.२००६ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(१) प्रमाणे माहिती मागण्यासाठी अर्ज दाखल केला होता. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १४.८.२००६ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली होती ती ६ दिवस विलंबाने उपलब्ध करुन दिली या कारणास्तव जन माहिती अधिका-यांवर उशिरासाठी रुपये २५०/- प्रति दिन प्रमाणे दंड लावण्यात यावा अशी त्यांनी मागणी करुन प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर आयुक्त, महानगरपालिका यांचेकडे प्रथम अपील दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३०.९.२००६ रोजी दिलेला असून त्यामध्ये वर नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांना एकुण रुपये १५००/- एवढा दंडाची शास्ती प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेली आहे. व त्याबाबत अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, प्रथम अपीलीय अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० प्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेवर शास्ती लादण्याचे अधिकार नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिल्यास व तशी आयोगाची खात्री झाल्यास आयोगास शास्ती लादण्याचे अधिकार दिलेले आहे. व त्यावरुन कलम १९(१) प्रमाणे ज्या वरिष्ठ अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल करण्याची तरतूद आहे त्या प्रथम अपील अधिकास शास्ती लादण्याचे अधिकार नाही. व म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर आयुक्त यांनी अधिकार नसतांना जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांचे विरुध्द एकुण रुपये १५००/- ची शास्ती लावण्याचा जो निर्णय दिलेला आहे तो अधिकार बाहय असा निर्णय आहे व त्यामुळे सदरचा निर्णय हा रद्द

करण्यास पात्र आहे. व त्याकरीता त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे सदरचे द्वितीय अपील दाखल केले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० चे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांचे म्हणणे योग्य आहे असे दिसून येते व त्यामुळे त्यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे."

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांनी अपील क्रमांक एम.आय.आर. १११-७२-२००६ मधील निर्णयाच्या आदेशामधील आदेश क्रमांक १ हा रद्य करण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे महितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी तसेच मुळ अर्जदार-उत्तरवादी श्री प्रेमदास रेकाजी राठोड यांना माहितीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-१२.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १७२/२००७**

**१) श्री ज्ञानदेव कोळशिराम वानखडे** **तक्रारदार**
**श्री नारायण पांडूरंग दांदळे**
**रा. पिंपळखुटा रा. पातूर, जिल्हा अकोला.**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी बाळापूर.**
**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, पातूर ता. पातूर, जिल्हा बाळापूर.** **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक १३.८.२००८ )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक ६.३.२००७रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १८ (१) अन्वये द्वितीय तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार हजर आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हजर असून त्यांनी कागदपत्रे दाखल केली आहे.

तक्रारदार यांनी दिनांक २६.१०.२००६ रोजी " दिनांक २०.१०.२००६ पासून पुढे व त्या अगोदर एक ते दीड महिन्यापर्यंत पिंपळखुटा येथे अतिवृष्टीमुळे ज्यांचे घरांची पडझड झाली अशा लोकांना शासनाकडून मदत म्हणून पैशाचे वाटप झाले. परंतु, काही लोकांची घरे प्रत्यक्षात अतिवृष्टीमुळे चालु वर्षी पडली असतांना सुध्दा त्यांना डावलण्यात आले. सबब, अशा लोकांना कां वगळण्यांत आले आहेत व त्यांची घरे पडली असतांना सुध्दा सर्व्हेक्षणात त्यांची नांवे कां घेण्यात आली नाहीत याची माहिती द्यावी. तसेच दि. २०.१०.२००६ रोजी ज्या ज्या लोकांना मदत देण्यांत आली त्यांची यादी कृपया द्यावी. यावूर्वी चालू वर्षात अशी मदत दिली त्याची सुध्दा माहिती द्यावी. " माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. अर्जदार दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे कोर्ट फी स्टॅाम्प लावलेले नाहीत. कार्डाची प्रत दिलेली आहे. अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रारदार यांनी प्रथम अपील दाखल केल्याचे सांगितले. परंतु प्रथम अपीलाची प्रत आयोगाकउे दाखल केली नाही. मात्र,

दिनांक १४.१.२००७ रोजी उपविभागीय अधिकारी तथा माहिती अधिकारी, बाळापूर यांनी शासकिय माहिती अधिकारी यांचेवर अपीलीय अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी हे पद नामनिर्देशित नसल्या कारणाने आपण या कार्यालयास सादर केलेला अर्ज दप्तरी दाखल करण्यात येत आहे. तरी आपण सक्षम अधिकारी यांचेकडे आपला अर्ज दाखल करावा असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

अपीलकर्ता यांनी सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये पुढीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे, तो पुढीलप्रमाणे- " १) उपरोक्त अपीलार्थी हे एकाच गावचे असून अपीलार्थी नं.१ यांनी दिनांक २६.१०.२००६ रोजी माहिती अधिकारान्वये ग्राम पिंपळखुटा येथील अतिवृष्टीमुळे घराचे पडझडीच्या सर्वेची यादी व लाभार्थी वाटपाची यादी माहितीच्या अधिकारान्वये वरील दिनांकास मागीतली होती. तसेच अपीलार्थी नं. २ यांनी दिनांक ३०.१०.२००६ रोजी वरील कारणासाठीच माहितीच्या अधिकारान्वये माहितीची मागणी केली होती. त्यानंतर माहिती अधिकारी तहसिलदार पातूर यांनी १५ दिवसांनी त्यांना बोलावण्यात आले परंतू काहीही महिती पुरविण्यात आली नाही. तसेच ५ दिवसांनी त्यांना या, २ दिवसांनी या अशा प्रकारचे सांगण्यात येवून माहिती देण्यास टाळाटाळ करीत होते. उपरोक्त माहितीच्या मागणीला एक महिना उलटून गेला तरी अजूनपर्यंत त्यांनी कोणत्याही प्रकारची माहिती पुरविलेली नाही. या दरम्यान अर्जदार व गावातील इतर लोक त्यामध्ये श्री गजानन सिताराम राऊत हे सुध्दा होते. ते सर्व जिल्हाधिकारी यांचेकडे उपरोक्त मागणीसाठी गेले असता जिल्हाधिकारी साहेबांनी लेखी आदेश वरील माहिती अधिकारी यांना २ डिसेंबर, २००६ रोजी दिला. त्या आदेशामध्ये जिल्हाधिकारी साहेबांनी स्पष्ट निर्देश दिले की, नागरीकांच्या मागण्यांची दखल घेवून त्यांची सविस्तर चौकशी तात्काळ सुरु करावी तसेच माहितीच्या अधिकाराखाली आपल्याकडे दिलेल्या अर्जातील कागदपत्रे अर्जदारास मुदतीच्या आत उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुध्दा त्वरीत करावी असे स्पष्ट आदेश असतांना सुध्दा वि. तहसिलदार साहेब यांनी कलेक्टर साहेबांच्या आदेशाची सुध्दा पायमल्ली केली आहे.

२) अपीलार्थीनी माहिती अधिकारान्वये विहित नमून्यात माहिती अधिकारी तहसिलदार पातूर यांच्याकडून केलेला आहे. माहिती अधिकारी यांनी अधिनियमानुसार वेळेच्या अवधीत माहिती पुरवायला हवी होती परंतु त्यांनी तसे केले नाही. त्यांनी कायदयाची पायमल्ली केली हे उघड आहे. माहिती अधिकारी पातूर जाणून बुजून माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहेत हे सुध्दा उघड आहे. त्यामुळे त्यांच्यावर वरील कायदयानुसार कारवाई करण्यात येवून अपीलार्थीला मौजे पिंपळखुटा येथील अतिवृष्टीमुळे घरांच्या पडझडीच्या सेर्वेची यादी व लाभार्थीची यादी ही माहिती पुरविण्यात यावी."

तसेच अपीलकर्ता यांना विद्यमान माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली व सदरची माहिती अपीलकर्ता यांना प्राप्त झाली. दिनांक २७.६.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली असे पत्र दाखल केले आहे. अपीलकर्ता यांच्या दिनांक २६.१०.२००६ च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती ही ३० दिवसाच्या विहित मुदतीत अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे संबंधीत तत्कालीन माहिती अधिकारी तथा तहसिलदार पातूर हे दोषी आढळून येतात. व त्यामुळे अधिनियमाचे कलम २० प्रमाणे ते शास्तीस पात्र आहे. तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, बाळापूर यांनी दिनांक १४.१.२००७ रोजी अपीलकर्त्यांच्या अपीलाच्या संदर्भामध्ये जे उत्तर दिलेले आहे ते अतिशय बेजबाबदारपणे दिलेले आहे. जन माहिती अधिकारी कोण व प्रथम अपीलीय अधिकारी कोण आहे याचा विचार न करता सदरचे उत्तर दिलेले आहे. उपविभागीय अधिकारी हे जरी प्रथम अपीलीय अधिकारी नाही तरी प्रथम अपीलीय अधिकारी कोण आहे हे अपीलकर्ता यांना अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे कळविणे आवश्यक होते. परंतु ते तसे कळविलेले दिसून येत नाही. त्यामुळे तत्कालीन उपविभागीय अधिकारी हे सुध्दा दोषी आढळून येतात व त्यांना ताकिद देणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे, असे अपीलकर्ता यांनी सुध्दा मान्य केले आहे व तसेच विद्यमान माहिती अधिकारी यांनी सुध्दा ती माहिती उपलब्ध करुन दिली असे सांगितले असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली हा निष्कर्ष काढावा लागतो. असे असले तरी संबंधीत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार

यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे सदरचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक २६.१०.२००६ च्या अर्जाप्रमाणे व अधिनियमाच्या कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे संबंधीत तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये १,०००/-( रुपये एक हजार फक्त) शास्ती लादण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-१३.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७०३/२००७**

**१) श्री पंजाबराव नारायणराव राक्षसकर** — **अपीलकर्ता**
**मु.पो. दहिगांव (रेखा )**
**ता. अंजनगांव सुर्जी, जिल्हा अमरावती.**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार**
**अंजनगांव सुर्जी, ता. अंजनगांव सुर्जी,**
**जिल्हा अमरावती.** — **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १३.८.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहे. उत्तरवादी यांचे तर्फे ॲड. राजेंद्र पांडे हजर आहे.

श्री कृष्णा संपत इंगळे यांनी संपुर्ण माहिती श्री पंजाबराव नारायणराव राक्षसकर यांनी केलेल्या अर्जानुसार मिळाली. माहितीचे पुर्ण समाधान झालेले आहे. तक्रार राहीलेली नाही. व राज्य माहिती आयोगाकडील अपील क्रमांक १७०३/२००७ खारीज करण्यात यावी असे लेखी दिलेले आहे. तसेच बळवंत अरखराव, तहसिलदार,अंजनगांव सुर्जी यांनी अपीलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात यावे असे लेखी दिलेले आहे.

अपील हे श्रीकृष्ण संपत इंगळे, श्री बाळू संपत इंगळे, श्री नाना संपत इंगळे यांचे तर्फे श्री पंजाबराव नारायणराव राक्षसकर यांनी दाखल केले होते. व त्यामुळे श्रीकृष्ण संपत इंगळे यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांना माहिती मिळाली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यांत येत आहे.
२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-१३.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १७८/२००७**

**१) श्री वाय.एम.माटे (वि.अ.कृषि)**
**पंचायत समिती, सावली, जि. चंद्रपूर.** **तक्रारदार**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) जन माहिती अधिकारी**
**(पंचायत विभाग), जिल्हा परिषद, चंद्रपूर.** **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक १४.८.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.४.२००७ रोजी अपील क्रमांक १८ व १९ ची माहिती अपूर्ण अ प्रमाणे देणे. पुन्हा सुनावणी घेण्याबाबत तक्रार दाखल केली आहे. तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार विना अनुमती गैरहजर आहे. गैरतक्रारदार हजर आहे.

तक्रारदार यांनी अपील क्रमांक १८ व १९ मध्ये दिनांक ७.३.२००७ रोजी निर्णय देण्यात आलेला असून त्यांच्या दिनांक २.१२.२००५ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचा निर्णय दिलेली दिसून येतो. व त्याप्रमाणे त्यांना दिनांक २६.३.२००७ रोजी माहिती घेवून जाण्यास कळविण्यात आले. त्याप्रमाणे त्यांनी दिनांक २८.३.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन घेतली. व सदरच्या माहितीमुळे समाधान झालेले नाही अशी त्यांनी तक्रार करुन अपील क्रमांक १८ व १९ ची पुन्हा सुनावणी घेण्यात यावी असे नमूद कलेले आहे. सदरच्या तक्रार अर्जाचे अनुषंगाने शासकिय माहिती अधिकारी तथा अधीक्षक, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी दिनांक ३०.६.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

खुलासा -" संदर्भीय पत्रानुसार श्री वाय.एम. माटे यांनी दिनांक १६.४.२००७ नुसार दाखल केलेल्या तक्रारीचे अनुषंगाने खालीलप्रमाणे खुलासा सादर करण्यांत येत आहे.

१) श्री वाय.एम. माटे यांना त्यांचे मुळ अर्जात नमूद तथा कार्यालयात उपलब्ध माहिती पुरविण्यांत आलेली आहे.

२) श्री वाय.एम. माटे यांनी दिनांक २७.७.२००५ व २.१२.२००५ चे अर्जान्वये माहितीच्या अधिकारात मागणी केलेल्या अर्जात माहिती ही प्रमाणित करुन देण्यांबाबत कळविले नसल्यामुळे संबंधीतास माहिती प्रमाणित करुन देण्यात आलेली नाही.

३) बाब क्रमांक ३ नुसार श्री वाय.एम.माटे यांना कार्यालयात उपलब्ध माहिती पुरविण्यात आलेली आहे. करीता श्री माटे यांनी दिनांक १६.४.२००७ चे अर्जात नमुद केल्यानुसार माहिती अपुण्र् दिली आहे, असे त्यांचे म्हणणे योग्य नाही.

४) बाब क्रमांक ४ नुसार श्री वाय.एम. माटे यांनी मागणी केलेली माहिती या कार्यालयास उपलब्ध नसल्यामुळे माहिती उपलब्ध नसल्याचे त्यांना लेखी स्वरुपात कळविण्यात आलेले आहे.

५) बाब क्रमांक ५ नुसार श्री वाय.एम. माटे यांनी मागणी केलेली माहिती ही ग्राम पंचायत स्तरावरील असल्यामुळे माहिती उपलब्ध नसल्याचे त्यांना लेखी स्वरुपात कळविण्यांत आलेले आहे.

६) बाब क्रमांक ६ नुसार जेंव्हा उपलब्ध माहिती या कार्यालयाकडून विनामुल्य पुरविण्यांत आलेली असतांना सुध्दा माहिती देण्याचे टाळले आहे असे श्री वाय.एम.माटे यांचे म्हणणे चुकीचे आहे.

७) बाब क्रमांक ७ नुसार संबंधीतास कार्यालयात उपलब्ध दस्ताऐवजाच्या छायाप्रती पुरविण्यांत आलेल्या आहे तेव्हा तक्रारीची यांनी आपले तक्रार अर्जात बाब क्रमांक ७ नुसार बनावट व खोटी माहिती दिली, असे म्हणणे संयुक्तिक नाही.

८) बाब क्रमांक ८ नुसार कर्यालयात उपलब्ध असलेली माहिती तक्रारकर्त्यास पुरविण्यात आली असून तक्रारीत नमूद बाब क्रमांक ८ नुसार माहिती देण्यांचे बुध्दीपुरस्पर टाळले आहे, असे त्यांचे म्हणणे योग्य नाही.

९) बाब क्रमांक ९ नुसार तक्रारकर्त्याने आपले अर्जा माहिती गहाळ करण्यांचा प्रयत्न केला असल्याचे नमूद केले आहे, आ आक्षेप योग्य नाही.

तक्रारकर्त्याने अपील क्रमांक १८ व १९ या प्रकरणात आपणाकडे सादर केलेल्या अपील अर्जावर आपले कार्यालयाकडून दिनांक २६.१२.२००७ रोजी पारित केलेल्या निर्णयानुसार संबंधीताची अपील खारिज करण्यात आलेली आहे.

करिता कृपावंत महोदय या कार्यालयाकडून उपरोक्तप्रमाणे सादर करण्यात येत असलेला खुलासा ग्राहय धरण्यात यावा व तक्रारकर्त्यांची दिनांक १६.४.२००७ ची तक्रार खारिज करण्यास विनंती आहे."

वरील खुलाशा वरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे दिसून येते. असे असले तरी तक्रारदार वारंवार तक्रार करीत असतात व तक्रारीच्या सुनावणीस मात्र राज्य माहिती आयोगाकडे उपस्थित राहात नाही. सोबत जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांच्या संदर्भात आतापर्यंत उपलब्ध करुन दिलेल्या सर्व माहितीची कागदपत्रे दाखल केली आहे. व त्यावरुन अपीलकर्ता यांना संपुर्ण माहिती उपलब्ध झाली आहे हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पुन्हा खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

खुलासा-" उपरोक्त विषयावरील संदर्भिय कारणे दाखवा नोटीसचे अनुषंगाने खुलासा सादर करण्यात येते की, श्री वाय.एम.माटे यांनी दाखल केलेल्या अपील क्रमांक १८/२००७ व १९/२००७ या दोन्ही प्रकरणात मा. आयोगाने दिनांक ७.३.२००७ रोजी निर्णय दिला. त्यात अपील क्रमांक १८/२००७ या प्रकरणात उत्तरवादी यांनी अपीलकर्ता यास ३ एप्रिल, २००७ पर्यंत त्यांच्या दिनांक २७.७.२००५ च्या अर्जाप्रमाणे त्यांना सर्व माहिती विनामुल्य पुरविण्यात यावी व अपीलकर्ता यांनी रुपये ७५/- भरले आहे ते उत्तरवादी यांनी परत करावे. तसेच अपील क्रमांक १९/२००७ या प्रकरणात अपीलकर्ता अर्जदार यांना उत्तरवादी यांनी अर्जदाराने मागितलेली माहिती दिनांक २ एप्रिल, २००७ पर्यंत विनामुल्य देण्यात यावी असा निर्णय दिला.

एकदा शासनाकडे किंवा जिल्हा परिषदेकडे रक्क्म भरल्यावर ती परत करण्याच्या प्रक्रियेला जास्त वेळ लागतो हा मुद्या मांडला असता मा. माहिती आयुक्त यांनी ते मान्य केले.

मा.राज्य माहिती आयुक्त यांनी दिनांक ७.३.२००७ चे सुनावणीचे वेळी दिलेल्या आदेशानुसार श्री वाय.एम.माटे यांना या कार्यालयाचे माहिती अधिकारी तथा अधिक्षक पंचायत

उप विीाग यांचे पत्र क्रं.पंचायत/ट-२/७७९/२००७ दिनाक २६.३.२००७ अन्वये मुद्दा क्रमांक अ) ते त) पर्यंत एकुण ३६ पृष्ठांची माहिती विनामुल्य दिली आहे. व ती त्यांनी दिनांक २८.३.२००७ ला प्राप्त केली आहे. माहितीचे अधिकारात कार्यालयात जी माहिती उपलब्ध आहे ते देणे अपेक्षित आहे. त्या नुसार उपलब्ध सर्व माहिती श्री वाय.एम.माटे यांना दिली आहे. त्यामुळे त्यांची तक्रार खरी नाही.

श्री वाय.एम.माटे यांनी भरलेली रक्कम रुपये ७५/- त्यांना परत करण्याबध्दल चे देयक दिनांक ३.४.२००७ ला जिल्हा परिषदेचे सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाकडे मंजूरीस पाठविण्यात आले सदर देयकाचा रुपये ७५/- चा धनाकर्ष दिनांक १२.६.२००७ हा श्री वाय.एम.माटे यांचे कडे या कार्यालयाचे पत्र क्रमांक पंचायत/ट-२/१६०४/२००७ दिनांक २२.६.२००७ अन्वये यांचे पत्यावर रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आले आहे.

अपील क्रमांक १९ संबंधी :-

तक्रार क्रमांक १९ संबंधि श्री वाय.एम. माटे यांना या कार्यालयाचे माहिती अधिकारी तथा अधिक्षक पंचायत उप विभाग यांचे पत्र क्रमांक पंचायत/टे-२/७८०/२००७ दिनांक २६.३.२००७ अन्वये मुद्दा क्रमांक १ ते १२ ची एकुण ५६४ पृष्ठांची माहिती विनामुल्य देण्यात आली आहे. सदर माहिती त्यांना दिनांक २८.३.२००७ ला प्राप्त झाल्या बध्दल त्यांनी सदर पत्रावर स्वाक्षरी केली आहे. माहितीचे अधिकारात कार्यालयात जी माहिती उपलब्ध आहे ते देणे अपेक्षित आहे. त्यामुळे या कार्यालयात उपलब्ध असलेली ५६४ पृष्ठांची माहिती श्री वाय.एम.माटे यांना देण्यात आली आहे. अर्जदारास उपलब्ध असलेली पुर्ण माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे श्री माटे यांची तक्रार खरी नाही.

श्री वाय.एम.माटे हे जिल्हा परिषद, चंद्रपूर चे कर्मचारी असून हे पंचायत समिती सावली येथे विस्तार अधिकारी (कृषि) या पदावर कार्यरत आहे. त्यांनी स्वतःचे सेवा विषयक बाबी व्यतिरिक्त इतर कर्मचा-यांचे सेवा विषयक बाबी संबंधी माहिती अनेक वेळा मागितली आहे. कार्यालयात उपलब्ध माहिती त्यांना देण्यात आली आहे. त्यांनी अपील क्रमांक १८ व १९ मधील माहिती, माहिती अधिका-यांकडे मागितली होती परंतु माहिती बध्दल त्यांनी प्रथम अपीलीय अधिका-यांकडे अपील केलेली नाही.

श्री वाय.एम. माटे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.४.२००७ व दिनांक २२.६.२००७ अन्वये केलेल्या तक्रारीचा खुलासा खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१. दिनांक १६.४.२००७ चे अर्जासंबंधी

त्यांनी अपील क्रमांक १८ चे संबंधी मुळ अर्ज दिनांक २७.७.२००५ चा आहे. अर्जात खालील मुद्दे होते. अ,ब,क,ड,इ,ई,फ,म,ण,ज,त त्यांचे अर्जानुसार या कार्यालयाचे पत्र क्रमांक पंचायत/टे-२/७७९/२००७ दिनांक २६.३.२००७ अन्वये मुद्दा क्रमांक (अ ते त ) पर्यंत त्यांना माहिती दिली आहे. त्यामुळे पुरविण्यात आलेली माहिती अर्जाप्रमाणे आहे. तसेच अपील क्रमांक १९ चे संबंधात मूळ अर्ज दिनाक २.१२.२००५ चा आहे. मुद्दा क्रमांक १ ते १२ आहे. या कार्यालयाचे पत्र क्रमांक/पंचायत/टे-२/७८०/२००७, दिनांक २६.३.२००७ अन्वये मुद्दा क्रमांक १ ते १२ ची माहिती दिली आहे. त्यामुळे श्री माटे यांच्या म्हणण्यानुसार पुरविण्यात आलेली माहिती मुळ अर्जाप्रमाणे नाही हे खरे नाही.

२. पुरविण्यात आलेली माहिती श्री वाय.एम.माटे यांनी स्वत: नेली आहे. त्यावेळी या मुद्यांवरुन कोणताही आक्षेप घेतलेला नाही.

३. पुरविण्यात आलेली माहिती अपूर्ण नाही. कार्यालयात उपलब्ध असलेली माहीती अपील क्रं. १८ मध्ये ३६ पृष्ठांची माहिती व अपील क्रं. १९ मध्ये ५६४ पृष्ठांची माहिती त्यांना देण्यात आली आहे. त्यामुळे श्री वाय.एम.माटे यांचे म्हणण्याप्रमाणे दिलेली माहिती अपूर्ण आहे हे खरे नाही.

४. जी माहिती कार्यालयात उपलब्ध नाही ती उपलब्ध नाही असे कळविले आहे. माहितीचे अधिकारात जी माहिती उपलब्ध आहे ती पुरविणे अपेक्षित आहे असे कळविले आहे. माहितीचे अधिकारात जी माहिती उपलब्ध आहे ती पुरविणे अपेक्षित आहे. त्यामुळे जी माहिती उपलब्ध नाही त्याबध्दल तसे कळविले आहे. त्यात काही चुक नाही.

५. अपील क्रं. १९ मधील मुद्दा क्रं. ८ ची माहिती जिल्हा परिषद कार्यालयात उपलब्ध नाही. त्यांनी ग्राम पंचायत सिंदेवाही, नवरगांव नवेगांव पांडव, मिंथूर, कोथुळना आणि कोटगांव ग्राम पंचायत मधील फेर आकारणीची माहिती मागितलेली होती. सदर माहिती संबंधित ग्राम पंचायतीमध्ये उपलब्ध असल्यामुळे संबंधित ग्राम पंचायतींना सदर माहिती श्री वाय.एम. माटे यांना देण्याबध्दल या कार्यालयाचे पत्र क्रमांक/पंचायत/टे-२/७७८/२००७, दिनांक २०.३.२००७

अन्वये कळविण्यात आले आहे व सदर पत्राची प्रत श्री माटे यांना देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे सदर मुदयाबध्दल श्री माटे यांना उत्तर दिले आहे. ही कार्यवाही योग्य आहे. श्री माटे यांनी सदर ग्राम पंचायत कडून माहिती न मिळाल्याबध्दल माहिती अधिकारी किंवा अपीलीय अधिका-याला कळविले नाही.

६. मुळ अर्जाप्रमाणेच उपलब्ध असलेली माहिती श्री माटे यांना दिलेली आहे. त्यामुळे त्यांचे म्हणणे खरे नाही.

७. श्री वाय.एम.माटे यांना दिलेली माहिती कार्यालयात उपलब्ध असल्याप्रमाणे झेरॉक्स प्रती काढून त्यांना दिलेली आहे. माहिती बनावट व खोटी असल्याचा प्रश्न उदभवत नाही. श्री माटे यांचे म्हणणे खोटे आहे.

८. उपलब्ध असलेली माहिती दिली आहे. सदर माहिती ३६ व ५६४ पृष्ठांची आहे. त्यामुळे बुध्दीपुरस्पर माहिती देण्याचे टाळले असे श्री माटे यांचे म्हणणे खरे नाही.

९. उपलब्ध असलेली माहिती दिली आहे. माहिती गहाळ करण्याचा प्रश्न उदभवत नाही. श्री माटे यांचे म्हणणे खोटे व आकसपूर्ण आहे.

अपील क्रं. १८/२००७ व अपील क्रं. १९/२००७ मध्ये दिनांक ७.३.२००७ रोजी मा. राज्य माहिती आयुक्त यांनी दिलेल्या निर्णयानुसार या कार्यालयाचे माहिती अधिकारी तथा अधिक्षक पंचायत उप विभाग यांनी श्री वाय.एम.माटे यांना उपलब्ध असलेली माहिती दिलेली आहे व त्यांनी भरलेली रक्कम रुपये ७५/- त्यांना रु. ७५/- चे धनाकर्षाद्वारे परत करण्यात आलेली आहे. त्यांनी दिनांक १६.४.२००७ व २२.६.२००७ ला केलेल्या तक्रार अर्जावर वरीलप्रमाणे खुलासा सादर केलेला आहे. श्री वाय.एम.माटे यांना जाणून बुजून चुकीची किंवा अपूरी किंवा दिशाभूल करणारी माहिती दिलेली नाही. तसेच मागणीचा विषय असलेली माहिती नष्ट केलेली नाही. माहितीचे अधिकारांतर्गत मगितलेली माहिती देण्यामध्ये एका अधिका-यास शक्य ते सर्व कार्य योग्य प्रकारे केले आहे. माहितीचे अधिकाराचे अधिनियम २००५ चे तरतुदीचे पुर्णपणे पालन केले आहे. त्यामुळे माहितीचे अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० प्रमाणे शास्ती लादण्यात येवू नये, अशी आपणास विनंती आहे. "

जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, " श्री वाय.एम.माटे हे पुर्वी ग्राम विकास अधिकारी होते. त्यांचे ग्राम विकास अधिकारी या पदावरुन विस्तार अधिकारी (कृषि) पदासाठी नामनिर्देशनाने त्यांना कृषि विभागाकडे देण्यात आले असता विस्तार अधिकारी (कृषि) या पदावर त्यांना पदोन्नती देण्यात आली. परंतु, त्यांचे मते त्यांना विस्तार अधिकारी (पंचायत) व्हावयाचे होते. कार्यालयाकडून झालेली सदरची पदोन्नतीची कार्यवाही ही शासनाच्या नियमाप्रमाणे झालेली असल्यामुळे कृषि विभागाकडून मागण्यात आलेल्या यादी नुसार त्यांना कृषि विभागाकडे नामनिर्देशित करण्यात आले. " व या कारणास्तव तक्रार ते वारंवार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी प्रमाणे अर्ज करुन माहिती मागत असतात. व उपलब्ध झालेली माहिती ही खोटी आहे म्हणून पुन्हा पुन्हा अर्ज व तक्रार करीत असतात. त्यांची तक्रार ही कोणत्याही व्यापक जन हिताकरीता नसून सार्वजनिक प्राधिकरणाला वेठीस धरुन स्वत:च्या हिताकरीता माहिती मागत आहे, असा निष्कर्ष काढावा लागतो व त्याकरीता सदरची तक्रार ही खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत तक्रारदार व जन माहिती अधिकारी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-१४.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८०८/२००७**

**१) श्री दिपक गरिबाजी चौधरी**
**से.नि.पदवीधर केंद्र मुख्याध्यापक,**
**मु.पो. नागपूरा (फर्री), ता.जि. गोंदिया.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, गोंदिया.**

**३) जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी**
**पंचायत समिती, गोंदिया.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २०.८.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.५.२००७ (प्राप्त दिनांक १४.५.२००७) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.२.२००७ रोजी माहिती अधिकारी (शिक्षण विभाग), पंचायत समिती, गोंदिया यांचेकडे अर्जादाराचे दिनांक २९.१.२००७ च्या अर्जानुसार सेवाबाबी संबंधी मुद्येसुद लेखी माहिती मिळण्याबाबत अर्ज, अशी माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. तसेच नोंदणीकृत टपालाने घेणार असेही नमूद केलेले दिसून येते.

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विषयांकित पत्राचे अनुषंगाने कळविण्यात येते की, १) या कार्यालयाचे पत्र क्रमांक ३३७८/०६, दिनांक १७.११.२००६ व पत्र क्रमांक ९१/०५, दिनांक ९.१.२००७ अन्वये आपणास माहिती पुरविण्यात आलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कार्यालयात उपलब्ध माहिती पुरविण्याच्या सूचना आहेत. या कार्यालयाकडे जी माहिती उपलब्ध होती ती माहिती पुरविण्यात आली असून मुद्या क्रमांक ४ ची माहिती गट शिक्षणाधिकारी (प्राथमिक), गोंदियाकडून घेण्याकरीता कळविण्यात आले होते.

आपण मुद्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अपेक्षित केली असून माहितीच्या अधिकारा अंतर्गत फक्त माहिती पुरविली जाते. प्रत्येक्ष कार्यवाहीसाठी आपण योग्य अधिका-याला विनंती करावी, असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२००७ रोजी उप शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक २५.४.२००७ रोजी अपीलकर्ता यांना गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गोंदिया यांना जोबत जोडलेल्या पत्राप्रमाणे त्वरीत मुदतीत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल उलट टपाली या कार्यालयात सादर करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना दिनांक १२.१०.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडून त्यांचे दिनांक १५.३.२००७ व १५.४.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. दिनांक १०.७.२००८ रोजी सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग, गोंदिया यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २९.९.०६ चे पत्राप्रमाणे दिनांक १७.११.२००६ ला सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. दिनांक २९.१.२००७ रोजी सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

यावरुन अपीलकर्ता यांच्या मुळ तक्रारीचे संदर्भामध्ये त्यांना अनेक अर्जाच्या माध्यमातून माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांचे त्यांच्यावर झालेल्या अन्यायाच्या संदर्भामध्ये निराकरण व्हावे अशी मागणी दिसून येते. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीप्रमाणे कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणामध्ये कागदपत्राच्या स्वरुपात जी माहिती उपलब्ध असते त्याच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असून उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे अपीलकर्ता यांना योग्य त्या प्राधिकरणाकडे किंवा न्यायालयाकडे तक्रार करुन न्याय मिळवून घेणे अपेक्षित असते. राज्य माहिती आयोगाकडून कोणत्याही प्रकरणामध्ये कार्यवाहीचे आदेश दिले जात नाही. अपीलकर्ता यांनी त्यांच्या अनेक अर्जामध्ये जे मुद्ये उपस्थित केलेले आहे त्या मुद्याच्या संदर्भामध्ये माहिती निर्णय प्रक्रियेच्या

संदर्भात तयार करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता हे वारंवार अर्ज करुन उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये विश्लेषण करुन पुन्हा पुन्हा माहिती मागतांना दिसून येतात. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी प्रमाणे कोणत्याही प्रकारची माहिती ही तयार करुन देणे अपेक्षित नाही. तर उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. अशा अनेक अर्जामध्ये त्यांनी प्रश्न उपस्थित केलेले दिसतात. त्या प्रश्नांच्या संदर्भातून अभिप्राय मागितलेले दिसून येतात व " माहिती" या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे कोणत्याही प्रश्नांचे अभिप्राय देणे हे अपेक्षित नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झाली आहे ती निर्णय प्रक्रियेच्या संदभातील असल्यामुळे त्यांचे समाधान होत नाही असेच दिसून येते. त्याकरीता वर नमूद केल्याप्रमाणे न्यायालयात तक्रार दाखल करणे हा एक मार्ग दिसून येते व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ७.२.२००७ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत दिनांक १३.२.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-२०.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८१०/२००७**

**१) श्री हंसदास प्रल्हाद रामटेके,**
**रा.क्वार्टर नं. ५७, एम्प्रेस मिल क्वार्टर,**
**जरीपटका बस स्टॉप जवळ, बेझनबाग, नागपूर-४४०००४** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर आयुक्त,**
**नागपूर महानगर पालिका, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा विकास यंत्री,**
**नागपूर महानगर पालिका नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २०.८.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.३.२००७ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून अतिरिक्त उप आयुक्त, मिळकत अभियंता-१, नागपूर महानगर पालिका यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**<u>आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल</u>** : " मुद्या क्रं.१ : मंत्रालय, नगर विकास विभाग, मुंबई यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक राज्यमंत्री/नवि/नाप्रसका/नाजकवा/नस/व्हीआयपी५३/२००६, दिनांक ७.१२.२००६ अनुसार सदर पत्र श्रीमती शारदाबाई दौलत राऊत, रा.प्लॉट नं. ४२ वी.वी. लेआऊट बेझनबाग नागपूर यांनी माननिय श्री राजेश टोपे, राज्यमंत्री नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई (कॅम्प नागपूर हिवाळी अधिवेशन, नागपूर) यांना दिनांक ७ डिसेंबर, २००६ ला स्टे मिळण्याकरीता निवेदन दिलेले होते.

सदर निवेदनवर मा. श्री राजेश टोपे, राज्यमंत्री नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी खालील प्रमाणे नोटींग श्रीमती शारदाबाई दौलत राऊत यांना लिहून दिलेले आहेत ते खालील प्रमाणे आहे.

Hon.Commissioner, NMC, Nagpur.

बेझनबाग सोसायटी व शासनाची भाडेपटी बध्दल चर्चा सुरु असून अशा परिस्थिती कारवाई करण्यापेक्षा तूर्त कारवाई स्थगीत करुन प्रस्ताव पाठविणे.

सही/- राजेश टोपे,
राज्यमंत्री
रबर स्टॅम्पचा शिक्का

सदर पत्राची झेरॉक्स सोबत जोडून पाठवित आहो.

माननीय श्री राजेश टोपे, राज्यमंत्री यांनी जे नोटींग श्रीमती शारदाबाई दौलत राऊत यांनी लिहून दिलेली आहे ते नोटींग बरोबर आहे किंवा खोटी आहे या बाबत तपशिल कळविण्यात यावा. वरील नोटींग वर मला संशय आहे. कृपया सबब माहिती मला कळविण्यात यावी.

मुद्या क्रमांक २: माननीय सहाय्यक आयुक्त, वार्ड अधिकारी, महानगर पालिका, मंगळवारी झाने क्रमांक १० नागपूर यांनी श्रीमती शारदाबाई दौलत राऊत यांना दिनांक १०.११.२००५ ला महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५४ अंतर्गत नोटीस देण्यात आले आणि महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ (१) अंतर्गत नोटीस देण्यात अले त्यानंतर श्रीमती शारदाबाई दौलत राऊत यांनी माननिय न्यायाधिश, हरपळे साहेब, जिल्हा व सत्र न्यायाधिश नागपूर मध्ये अपील केलेली होती. मिसलिनीयस अपील नं. ८३४/२००५ आणि दिनांक ७.११.२००६ माननीय श्री राजेश टोपे, नगर विकास राज्यमंत्री, नागपूर यांना केलेली होती, सदर अपील मध्ये कोर्ट केस संबंधीत कोणतीही माहिती राज्यमंत्री यांना कळविलेली नाही आणि लिहून सुध्दा दिलेली नाही तर मा. राज्यमंत्री साहेब यांनी श्रीमती शारदाबाई दौलत राऊत यांनी स्टे कशा देण्यात आलेला आहृे कृपया सबब माहिती कळविण्यात यावी आणि मला संशय आहे की सदर नोटींग खोटी आहे. "

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक ७.४.२००७ रोजी विकास अभियंता तथा माहिती अधिकारी, महानगरपालिका नागपूर यांनी अपीलकर्ता यांना माहिती प्रपत्र-१ पत्रासोबत टाचन आहे, अशा पध्दतीने कळविलेले दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान झालेले नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १०.४.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३०.४.२००७ रोजी देण्यात आला असून अपीलार्थीने मागितलेली माहिती मा. राज्य मंत्री (नगर विकास) यांचे कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे याबाबत खुलासा त्यांच्या कार्यालयाकडून होणे आवश्यक असल्यामुळे प्रस्तुत अपील खारीज करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल कलेले आहे.

द्वितीय अपील मेमो मध्ये श्रीमती शारदाबाई दौलत राऊत यांना राज्य मंत्री नगर विकास विभाग यांचे दिनांक ७ डिसेंबर, २००६ रोजी स्टे मिळण्याकरीता जे नोटींग लिहून दिलेले आहे, हे नोटींग खरे आहे किंवा खोटे आहे याची चौकशी करण्यात यावी. श्रीमती शारदाबाई दौलत राऊत यांनी राज्य मंत्री नगर विकास विभाग यांना दिलेले निवेदनाची सत्यप्रत नगर विकास विभाग, मंत्रालय यांचे कार्यालयातून मागविण्यात यावी अशी विनंती केलेली दिसून येते.

अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, राज्य मंत्री, नगर विकास विभाग यांचेकडे दिलेल्या निवेदनाच्या संदर्भामध्ये माहिती ही अपीलकर्ता यांना नागपूर महानगरपालिकेतील जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेली दिसून येते. तसेच जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती मागवून द्यावी अशीही विनंती केलेली दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ५ प्रमाणे प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये वेगवेगळया उपविभागामध्ये जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती करावी अशी तरतूद आहे. सदरच्या तरतूदीचे कारण असे की, अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता ३० दिवसाची मर्यादा घालून दिलेली आहे. या मर्यादेमध्ये महिती उपलब्ध करुन द्यावयाची असल्यास ती अर्थातच त्या त्या स्तरावर माहिती अधिकारी असणे आवश्यक आहे. तरच ती ३० दिवसांत उपलब्ध होऊ शकेल. त्याप्रमाणे नगर विकास

विभागा अंतर्गत जर अनेक कार्यालये येत असेल तर महानगरपालिका, नगरपालिकेचे प्रत्येक कार्यालय हे स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण आहे व त्यामुळे मा. राज्य मंत्री, नगर विकास विभाग हे सुध्दा एक स्वतंत्र असे सार्वजनिक प्राधिकरण आहे व त्यामुळे मा. मंत्री महोदयांना जे निवेदन दिले जाते त्यात किंवा त्यांच्याकडे ज्या तक्रारी दिल्या जातात त्या तक्रारीचे निराकरण अर्थातच त्या त्या कार्यालयीन विभागाचे माहिती अधिकारी यांचेकडून उपलब्ध करुन घेणे अपेक्षित आहे. व त्यामुळे मा. राज्य मंत्री नगर विकास विभाग यांना श्रीमती शारदाबाई राऊत यांनी जरी निवेदन दिले असले तरी त्या निवेदनाची प्रत, त्यावर झालेली कार्यवाहीची माहिती ही नगर विकास विभागाच्या माहिती अधिका-यांकडून मिळू शकेल. एका सार्वजनिक प्राधिकरणाने दूस-या सार्वजनिक प्राधिकरणाकडून माहिती मागवून उपलब्ध करुन द्यावी अशी तरतूद नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना जे उत्तर दिलेले आहे तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा जो निर्णय दिलेला आहे तो योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-२०.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८८७/२००७**

**१) श्री अशोक नंदलालजी जायस्वाल**
**ऑंचल ओगले रोड, महाल, नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी,**
**नागपूर ग्रामीण सर्कल, तहसिल कार्यालय, नागपूर (ग्रामिण)**

**३) जन माहिती अधिकारी तलाठी साझा क्रं. ७३**
**मौजा डोंगरगांव (वर्धा रोड)**
**ता.जि. नागपूर (ग्रामीण).** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २०.८.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.९.२००७ रोजी राज्य जन माहिती अधिकारी तथा तलाठी साझा क्रं. ७३ चे माहिती अधिकारी मौजा, डोंगरगांव कार्यालय, तालुका जिल्हा नागपूर यांचेकडे "मौजा डोंगरगांव गांव नमूना सात ब मध्ये ईश्वर चंदनलालचे शेत नंबर ५८/२ मध्ये कब्जेदार दाखविले बाबत. संबंधीत माहितीचा कालावधी २००६-२००७. आपण साझा ७३ चे माहिती अधिकारी आहे. मौजा डोंगरगांव येथील शेत ५८/२ मध्ये ईश्वर चंदनलाल जैस्वाल नांवे नोंद केली. नियम ३० (२)(३)(४) महाराष्ट्र लँड रेव्हेन्यू रेकार्ड ऑफ राईटस आणि रजिस्टर चे अनुसरण केले काय. तसेच नियम ३१(२) चे अनुसरण केले काय. तहसिलकडे extract पाठविले काय. केव्हा पाठविले. त्यांचे नांवे कोणता कागदावर आणले, त्यांनी कोणते कागद दिले, कोणत्या आदेशानुसार, आदेश असल्यास प्रत द्यावी." माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी एकुण २० कागदपत्रे दिलेली दिसून येते. तसेच त्यांनी आयोगाकडे खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

" सदर अर्ज प्राप्त झाल्याबरोबर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८.११.२००७ च्या माहितीच्या पत्राद्वारे अपीलार्थी मागितलेली संपूर्ण माहिती तसेच संदर्भीय कागदपत्रे १) ७/१२, ८-अ, गावचा नकाशा २) ७-ब, ३) उप विभागीय अधिकारी साहेबांना दिलेला अर्ज ४) कोर्टाची ऑर्डर कॅापी ५) आत्याकडून बिना मोबदला हक्क सोडल्याचा लेख ६) भावाकडून बिना मोबदला हक्क सोडल्याचा लेख, ७) दिनांक २.८.०५ ला तहसिलदार साहेबांना दिलेल्या अर्ज ८) नोकरनाम्याची प्रत ९) ईश्वर चंदनलाल जैस्वाल यांचे तसेच शेतावरील काढलेले छाया चित्र १०) कापूस विक्री बध्दलचा धनादेश.

जन माहिती अधिकारी तथा तलाठी असेही नमूद करतात की गांव नमुना ७-ब मध्ये कब्जेदार म्हणून ईश्वर चंदनलाल जैस्वाल यांचे कब्जेदार म्हणून नांव नोंदवितांना ज्या संपूर्ण कागदपत्रांची अवलोकन केले ती संपूर्ण कागदपत्रे अर्जदाराला देण्यांत आली. सदर प्रकरणामध्ये अशोक नंदलाल जैस्वाल तसेच ईश्वर चंदनलाल जैस्वाल यांचे घरगुती वाद असल्यामुळे आजूबाजूच्या कुठल्याही कास्तकारांनी आपले होऊ नये म्हणून बयान देण्यास टाळाटाळ केली. म्हणून कायदा व सुव्यवस्थेच्या कारणावरुन कुठल्याही कास्तकारांचे नांव उघड करणे हे संयुक्तिक वाटले नाही. "

परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ४.१२.२००७ रोजी मंडळ अधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यात तत्पुर्वी दिनांक ५.१०.२००७ रोजी पुन्हा माहितीचा अर्ज दाखल केलेला दिसून येतो. व त्याच अर्जाच्या संदर्भामध्ये वर नमूद केलेले प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक १७.१२.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली. तसेच दिनांक ९.९.२००६ ला संपुर्ण आवश्यक कागदपत्रे तलाठी रेकार्डसह तहसिलदार (नागपूर) यांचेकडे सादर केली. त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही व तहसिल कार्यालयाकडून तसे आदेश प्राप्त झालेले नाही असे कळविलेले दिसून येते.

सदरच्या उत्तरामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपीलामध्ये मौजा डोंगरगांव (वर्धा रोड) तहसिल जिल्हा नागपूर येथे शेत क्रमांक ५८/२ वरील शेतावर गांव नमूना ७ ब मध्ये कब्जेदार म्हणून ईश्वर जैस्वाल नांव दाखविले आहे. वरील विषयाची माहिती तलाठयांनी पुरविलेली आहे. नियम ३०(२)(३)(४) व नियम ३१(२) महाराष्ट्र लँड रेव्हेन्यू रेकार्ड ऑफ राईटस चे अनुषंगाने कळविले काय. दिनांक २८.९.२००७ ला आजूबाजुच्या कास्तकारांकडून चौकशी केली असता कोणी सांगितले, त्यांचे नांव व बयाण घेतले काय, हयाबाबत ५.१०.२००७ रोजी पुन्हा अर्ज केला, माहिती दिली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी न घेता जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे प्रशासकिय पत्राप्रमाणे उत्तर दिलेले दिसून येते. वास्तविक, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे अपील दाखल झाल्यावर अपीलकर्त्याचे म्हणणे काय आहे व त्यांनी अपील कां दाखल केले आहे याची माहिती दोनही पक्षकाराच्या उपस्थितीत घेऊन कारण मिमांसा देणारा निर्णय देणे आवश्यक असते जेणेकरुन अपीलकर्ता यांना त्यांच्या स्तरावर माहिती उपलब्ध होऊ शकेल. त्यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतूदींचे पालन केलेले दिसून येत नाही.

वर नमूद केल्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी शेत सर्व्हे क्रमांक ५८/२ मौजा डोंगरगांव मध्ये ईश्वर जैस्वाल नांव नोंद केल्याबध्दल महाराष्ट्र लँड रेव्हेन्यू रेकार्ड ऑफ राईटस व रजिस्टर नियमाला अनुसरुन कळविले काय. तसेच नियम ३१(२) चे अनुसरुन कळविले काय. तहसिलकडे extract कॅापी पाठविली काय. केव्हा पाठविली त्याचे नांव. त्यांनी कोणते कागद दिले. कोणत्या आदेशान्वये. आदेश असल्यास प्रत मिळावी. प्रत मिळाली नाही म्हणून त्यांना उपलब्ध करुन देण्याकरीता त्यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपीली अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ७.९.२००७ च्या अर्जात आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन मध्ये मुद्येनिहाय माहिती

त्यांना हा निर्णय मिळाल्यासून १० दिवसांत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-२०.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८९०/२००७**

**१) श्रीमती वैशाली कुंदन चवरे,**
**प्लॉट नं. २१५, हुडको कॅालोनी,**
**के.नारायण विद्यालय जवळ, जरीपटका, नारा रोड,**
**नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा**
**उपविभागीय अधिकारी, नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २१.८.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हजर आहे. प्रथम अपील दाखल केलेले नाही.

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.३.२००७ रोजी उपविभागीय अधिकारी तथा माहिती अधिकारी यांचेकडे मौजा खैरी येथील प.ह.नं.१६ व शेत सर्व्हे नं. २१ आणि २६ हे.आर ०.०६ व १.३७ या शेतीची अर्जदार सौ. रमाकांता सुखदेव वाघमारे यांनी भू-वर्ग-२ चे भू-वर्ग-१ मध्ये करण्याचे आदेश क्रं. ६७४ दि. ६.१.२००३ च्या द्वारे झालेले आहे. त्या आदेशाचे अर्जदाराने केलेल्या अर्जापासून तर सादर केलेल्या कागदपत्रांचे व आदेशाचे कार्यवाही चे संपूर्ण कागदपत्रांची प्रमाणित प्रत मिळण्याबाबत. सन २००३-०४ या कालावधीतील माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २२.३.२००७ रोजी आपण प्रमाणित प्रतीसाठी रितसर पैसे भरुन आदेश व कागदपत्राच्या प्रमाणित प्रती आपणास उपलब्ध करुन देण्यात येईल, असे कळविलेले दिसून येते. परंतु सदरचे पत्र अपीलकर्ता यांचे खुलाशाप्रमाणे व म्हणण्याप्रमाणे

त्यांना दिनांक ३०.४.२००७ रोजी उपलब्ध झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केलेले नव्हते. व राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपीलाच्या संदर्भामध्ये उपविभागीय अधिकारी, नागपूर यांनी दिनांक २०.६.२००७ रोजी खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

खुलासा " तक्रारकर्त्याने उपस्थित केलेल्या मुद्यांवर खुलासा सादर करण्यात येते की, अर्जदाराने भोगवटदार वर्ग २ मधून भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतरीत केलेल्या पण स्वत:शी संबंधित नसलेल्या सौ रमाकांता सुखदेव वाघमारे यांचे प्रकरणातील आदेशाची प्रत मागितली तरी पण या कार्यालयाने सदर प्रत पूरविण्याचे दृष्टीने कार्यालयातील रेकार्ड रुम मधील रेकार्डचा शोध घेतला परंतु रामटेक लोकसभा पोट निवडणुक २००७ चे निवडणुकीचे रेकार्ड मुळे सदर रेकार्ड अत्यंत विस्कळीत झाल्याने संबंधित प्रकरणाचा वेळीच शोध लागला नाही त्यामुळे अर्जदाराने आपणाकडे तक्रार नोंदविलेली आहे.

तसेच अर्जदाराने उपस्थ्ति केलेल्या मुद्या क्रमांक १ व २ नुसार स्पष्ट करण्यात येते की, अर्जदाराने माहितीकरीता डाक खर्चाची तरतूद न केल्याने आणि अर्जात व्यक्तीशा मागणी करुन स्वत: ही त्यांनी वेळीच कार्यालयाशी संपर्क न साधल्याने दिनांक २२.३.२००७ चे माहिती पत्र अर्जदारास प्राप्त होण्यास विलंब झाला. आणि संबंधित प्रकरणाचा शोध लागल्यानंतर सदर प्रकरणातील आवश्यक प्रमाणित प्रतीकरीता लागणा-या खर्चाची रक्कम कॅापिंग विभागात भरावी व प्रमाणित प्रती उपलब्ध कराव्यात अशा सूचना संबंधित लिपिकाने अर्जदारास दिल्या परंतु प्रकरण अजून पर्यंत उपलब्ध न झाल्याने अर्जदारास रक्कम भरता आली नाही. म्हणून हया कार्यालयाने रक्कम शासन खजिना जमा करण्यास नकार दिल्याचा अर्जदाराने आरोप करणे उचित वाट नाही. करिता माहितीस सविनय सादर. "

तसेच अपीलकर्ता यांनी सुध्दा  खुलासा दाखल करतांना ३० दिवसांपेक्षा जास्त दिवस होऊनही पत्र मिळालेले नाही परंतु ते पत्र दिनांक ३०.४.२००७ ला प्राप्त झाले. तसेच माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की आपला अर्ज दिनांक २२.३.२००७ ला नस्तीबध्द करण्यात आलेला आहे. आपणास माहिती देता येत नाही. तेव्हा आपण राज्य माहिती आयोगाकडे अर्ज करावा असे सूचविले.

यावरुन व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन घेणार असे नमूद केल्यावर ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध न झाल्यास त्याप्रमाणे आक्षेप घेणारी तक्रार ही माहिती अधिकारी यांना द्यावयाची असते. अन्यथा दोनही खुलाशा प्रमाणे माहिती घेण्यास गेलो होतो परंतु मिळाली नाही, व माहिती घेण्यास आले नाही यावर आयोगास निर्णय देता येत नाही. तसेच प्रथम अपील सुध्दा दाखल केले नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ८.३.२००७ च्या अर्जाप्रमाणे सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात विना मुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील, त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक ८.३.२००७ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती विना मुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२) व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचेकडे स्वतः १५ दिवसात जावून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

३) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-२१.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -**

**अपील तक्रार १७०/२००७**

**१) श्री राजेश फकिरा पराते,**
**नवी मंगळवारी, मेहंदीबाग रोड,**
**श्री किशोर डोरले यांचे घराजवळ, नागपूर. तक्रारदार**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी**
**अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,**
**आदिवासी भवन, गिरिपेठ, नागपूर. गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक २१.८.२००८ )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक २३.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये द्वितीय तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रारीशी संबंधीत कोणतेही कागदपत्रे दाखल केले नाही. माहिती मागण्यासाठीच्या अर्जाची छायांकित प्रत सुध्दा दाखल केली नाही. गैर तक्रारदार यांनी दाखल केलेले जोडपत्र अ च्या छायांकित प्रतीवरुन तक्रारदार यांनी दिनांक १५.३.२००७ रोजी संशोधन अधिकारी यांची शैक्षणिक पात्रता २) पोलीस उप अधीक्षक यांची नियुक्तीबाबत सन २००२ ते २००७ पर्यंत सेवा पुस्तकावरुन माहिती देणे. ३) श्रीमती वसुधा नाईक यांची शैक्षणिक पात्रता काय आहे ४) श्री गेडाम संशोधन सहाय्यक यांची शैक्षणिक पात्रता काय आहे ५) श्री कुमरे, पोलीस उप अधीक्षक यांची पदोन्नती दिनांक व आपल्या कार्यालयात रुजू झाल्याचा दिनांक. अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे.

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.३.२००७ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम ८(१) (ञ) अन्वये माहिती मागण्यासाठीचे प्रयोजन काय याबाबत आपल्या संदर्भीय अर्जात आपण नमूद केलेले नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ (च) व २ (झ) (एक) नुसार शासकिय अभिलेख्यात उपलब्ध असलेली माहिती ही कागदपत्राच्या प्रतीच्या स्वरुपात पुरविणे अपेक्षित आहे. कार्यालयातील अधिकारी कर्मचा-यांच्या

संदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार केक्शन ४(१)(b)(iv) मध्ये कार्यालयात लावावयाची माहिती ही कार्यालयात लावलेली आहे. सदर माहिती ही शासकिय सुटी वगळता आपणास कार्यालयात येवून पाहता येईल असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यावर तक्रारदार यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील सुध्दा दाखल केलेले दिसून येते. परंतु त्याबाबतची कागदपत्रे ही दाखल केलेली नाही. मात्र, दिनांक २६.४.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम केलेला दिसून येतो.

राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल न करता तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीचे रुपांतर हे अपीलात करणे हे संयुक्तिक राहील. तक्रार-अपील या संदर्भामध्ये गैर तक्रारदार यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

खुलासा " वास्तविक पाहता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) प्रमाणे माहिती या शब्दाची व्याख्या दिलेली आहे. माहिती या संज्ञेचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेख दस्तऐवज प्रसिध्दी पत्रके, परिपत्रके इ. स्वरुपात छायांकित प्रती घेणे असा आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता सदर माहिती ही व्यक्तीगत स्वरुपाची आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ section ४(१)(६)(ix) अन्वये कार्यालयातील कर्मचा-यांची आवश्यक ती माहिती कार्यालयात लावावयाची माहिती ही कार्यालयात प्रसिध्द केलेली आहे. त्यामुळे अपिलकर्त्यास प्रसिध्द केलेल्या माहिती व्यतिरिक्त ई. माहिती पुरविणे हे अपेक्षित नाही. तसेच माहिती व अभिलेख या संज्ञेनुसार सदर माहिती पुरविणे हे अपेक्षित नाही. यापूर्वीही वैयक्तिक माहितीच्या आधारे या समितीचे सदस्य श्री सुरेंद्र वामणराव सावरकर, संशोधन अधिकारी यांना सुध्दा वारंवार धमक्या येवून शेवटी त्यांचेवर प्राणघातक हल्ला करण्यात आला. ज्यामुळे ते अद्यापही या धक्यातून सावरलेले नाही.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये section ४(१)(६)(ix) अन्वये विहित नमुन्यातील रकान्यातील कर्मचा-यांचे संदर्भातील माहिती जनतेसाठी प्रसिध्द करण्यात आलेली असल्याने तसेच मागितलेली माहिती ही कलम २ (च) व २(झ) (एक) चे संज्ञेनुसार नसल्याने त्यांना महिती देण्याचे नाकारलेले आहे. अपिलकर्त्याचे निवडणुक प्रकरण समितीकडे तपासणीकरीता प्रक्रियेत आहे."

वास्तविक तक्रारदार यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती ही अधिनियमाच्या कलम ४ प्रमाणे सक्तीने प्रत्येक कार्यालयातील दर्शनी भागावर प्रसिध्द केलेली आहे. असेच उत्तर जन माहिती अधिकारी यांनी दिलेले आहे. अधिनियमाच्या कलम ४(२) प्रमाणे "माहिती मिळविण्यासाठी लोकांना या अधिनियमाचा कमीत कमी आधार घ्यावा लागावा यासाठी, नियमित कालांतराने, लोकांना इंटरनेटसह, संपर्काच्या विविध साधनांद्वारे, स्ततःहून माहिती पुरविण्यासाठी, पोटकलम (१) च्या खंड (ख) च्या आवश्यकतेनुसार उपाययोजना करण्याकरिता प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण सतत प्रयत्नशील राहील. (३) पोटकलम (१)च्या प्रयोजनांसाठी प्रत्येक माहिती विस्तृत प्रमाणात आणि लोकांना सहजपणे उपलब्ध होईल अशा स्वरुपात आणि अशा रीतीने प्रसारित करण्यात येईल." अशी तरतूद आहे.

यावरुन वरील उद्येश लक्षात घेता माहिती जर प्रसारित कण्यात आलेली आहे तर ती पुन्हा माहितीच्या अधिकाराच्या माध्यमातून मागणे, त्यावर पुन्हा प्रथम अपील करणे व त्यावर पुन्हा राज्य माहिती आयोगाकडे तक्रार करणे हे सदरच्या अधिनियमाच्या तरतूदींचा गैरवापर आहे. तसेच सदरची माहिती ही अपीलकर्ता यांनी व्यापक जनहिताचे दृष्टीने मागितलेली दिसून येत नाही तर त्यांचे प्रकरण समितीकडे तपासणीस पडून आहे त्याकरीता मानसिक दबाव आणून वेठीस धूरुन स्वतःच्या बाजूने निर्णय मिळावा या उदेशाने महिती मागितलेली दिसून येते. व त्यामुळे तक्रारदार यांनी सदरची माहिती ही संबंधीत कार्यालयामध्ये ज्या सूचना फलकावर किंवा दर्शनी भागात प्रसारित केली असेल तेथून ती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता सदरची तक्रार ही खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत असून तक्रारदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४(१)(ख) पोट कलम (नऊ) प्रमाणे कार्यालयातील दर्शनी भागात प्रसारित केलेली माहिती ही त्या ठिकाणाहून घेण्यात यावी.

२) निर्णयाची एक प्रत तक्रारदार व गैरतक्रारदार यांना देण्यात यावी.

**दिनांक :-२१.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १७५/२००७**

**१) श्री कृ.के. चांदेकर,**
**पोथरा वसाहत, हिंगणघाट, ता. हिंगणघाट,**
**जिल्हा वर्धा.** **तक्रारदार**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक (सं.)**
**अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,**
**अमरावती.** **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक २१.८.२००८ )**

**नि र्ण य**

तक्रारकर्ता यांनी दिनांक १०.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहे.

तक्रारकर्ता यांचे अपील क्रमांक २००७/८१५/०२ मध्ये दिनांक ६.२.२००७ रोजी अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक ११ व १३ ची माहिती पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी व त्याची प्रत या कार्यालयास पाठविण्यात यावी असे आदेश देण्यात आले होते. परंतु तक्रारदार यांना सदरची माहिती दोन महिन्याचा कालावधी लोटून सुध्दा प्राप्त झाली नाही त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार करुन शास्ती करण्याची विनंती करुन माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधीतास परत कळविण्यात यावे, अशी विनंती केली आहे. सदरच्या तक्रारीच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी यांनी अर्जदार श्री कृ.के. चांदेकर यांनी आपणाकडे दाखल केलेली सुनावणीसाठी दिनांक ६.२.२००७ रोजी मी आपल्या कार्यालयात हजर होते. सदर सुनावणीच्या वेळी आपण अपीलकर्ता अर्जदार यांची अपील अंशतः मंजूर करुन मुद्या क्रमांक ११ व १३ ची माहिती अपीलकर्ता अर्जदारास देण्याविषयी आदेशित केले होते. सदर आदेशाची प्रत या कार्यालयास दिनांक २.५.२००७ रोजी प्राप्त झाली. व सदर आदेशाचे अनुषंगाने अर्जदारास या कार्यालयाचे पत्र क्रमांक २१६७, दिनांक १०.५.२००७ अन्वये

पाठविण्यात आली आहे. व सदर पत्राची प्रत माहिती विलंबाने पाठविलेली नाही करीता तक्रार खारीज करण्यात यावी अशी विनंती केली आहे. त्याकरीता त्यांनी आवक नोंदवहीची छायांकित प्रत दाखल केली असून त्यामध्ये क्रमांक २२७६ चे आवक दिनांक ७.५.२००७ रोजी नोंदविण्यात आलेले दिसून येते. तसेच राज्य माहिती आयोगाकडून पाठविलेल्या निर्णयाच्या प्रतिवर सुध्दा दिनांक ७.५.२००७ रोजी आवक क्रमांक दिलेला दिसून येतो. व त्यामुळे माहिती विलंबाने जरी दिलेली असली तरी ती जन माहिती अधिकारी यांचेकडे आदेश प्राप्त झाल्यानंतर त्यांनी ३ दिवसांचे आंत म्हणजे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे तक्रार खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-२१.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १७३/२००७**

**१) श्री बाळकृष्ण तुळशिराम रामटेके**
**रा.चिकमारा, पो.विलम, ता. नागभिड,**
**जिल्हा चंद्रपूर. तक्रारदार**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, नागभिड, जिल्हा चंद्रपूर. गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक २२.८.२००८ )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक २८.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये तक्रार दाखल केली आहे. तसेच दिनांक ६.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) प्रमाणे द्वितीय अपील दाखल केली होती. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहे.

अपील क्रमांक १४३१/२००७ चा निर्णय हा दिनांक २४.४.२००८ रोजी देण्यात आला आहे. अपीलामधील आदेशाच्या संदर्भातच तक्रार दाखल केली होती. त्यामुळे सदरच्या तक्रारीचा निर्णय सुध्दा अपीलाच्या निर्णयाप्रमाणेच व्हावयास पाहिजे. परंतु, अपील क्रमांक १४३१/२००७ मध्ये अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात आले असून -

१) Government Resolution No.-WEL १५६६/२०१२ F- Dated The ३१st December १९६६

२) Government Resolution No.-IAD ३६७१/१८६/३-R Dated the २८th Janurary, १९७२. प्रतिचा शोध घेवून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना वरील माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी किंवा कार्यालयात उपलब्ध नसल्यास शासनाच्या कृषि किंवा संबंधीत विभागास सदरच्या निर्णयाच्या संदर्भामध्ये शासन निर्णयाची मागणी करुन ३० दिवसांत सदरच्या प्रती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात याव्या असा निर्णय दिलेला

आहे. परंतु अपीलकर्ता यांना अद्यापपर्यंत सदरच्या शासन निर्णयाच्या प्रती प्राप्त झालेल्या दिसून येत नाही. त्याकरीता कृषि अधिकारी, पंचायत समिती, नागभिड यांनी दिनांक २७.५.२००८ रोजी कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना सदरच्या प्रती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिलेले दिसून येते. व तसेच ते तक्रारदार यांना सुध्दा दिलेले दिसून येते. त्याचप्रमाणे दिनांक ३१.५.२००८ रोजी कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी सचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग यांना सदरच्या शासन निर्णयाच्या प्रती उपलब्ध करुन देण्यासाठी पत्र दिलेले दिसून येते. त्या पत्राची प्रतिलीपी ही तक्रारदार यांना दिलेली दिसून येते. तसेच दिनांक १५.७.२००८ रोजी पुन्हा कृषि अधिकारी यांनी कृषि विकास अधिकारी यांना स्मरणपत्र पाठविलेले दिसून येते व दिनांक १.८.२००८ रोजी सचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग यांना स्मरणपत्र पाठविलेले दिसून येते.

यावरुन तक्रारदार यांना आतापर्यंत सदरच्या शासन निर्णयाच्या प्रती उपलब्ध झाल्या नाही असे दिसून येते. त्याकरीता अर्थात पुन्हा सचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग यांचेकडे पाठपुरावा करणे आवश्यक राहतील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांची सदरची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांना १) Government Resolution No.-WEL १५६६/२०१२ F- Dated The ३१st December १९६६ २) Government Resolution No.-IAD ३६७१/१८६/३-R Dated the २८th Janurary, १९७२. च्या प्रती शासनाकडून उपलब्ध झाल्यावर ३० दिवसांचे आंत तक्रारदार यांना उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२) सचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांनी कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांच्या दिनांक ३१.५.२००८ च्या

पत्रानुसार मागितलेल्या शासन निर्णयाच्या प्रती तातडीने उपलब्ध करुन देण्याकरीता सदरच्या निर्णयाची एक प्रत त्या विभागकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-२२.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८१५/२००७**

**१) श्री शशीकांत शिवरतन जाजु व आरती जाजु**
**अमृत निवास जठारपेठ चौक, अकोला. अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मॅनेजिंग डायरेक्टर**
**बजाज अलायन्स लाईफ इन्शुरन्स कंपनी लि.**
**जी.ई.प्लॉझा, एअरपोर्ट रोड, येरवठा**
**पुणे- ४११००६.**

**३) जन माहिती अधिकारी तथा रिजनल मॅनेजर**
**बजाज अलायन्स लाईफ इन्शुरन्स कं.**
**रिजनल ऑफिस २रा माळा, करवा आर्केड,**
**खापर्डे बगिचा, अमरावती- ४४४६०१. उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २२.८.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.४.२००७ (प्राप्त दिनांक ३.५.२००७) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहेत.

अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या अपीलातील उत्तरवादी बजाज अलायन्स लाईफ इन्शुरन्स कं. लि. ही कंपनी ॲक्ट प्रमाणे रजिस्टर झालेली संस्था आहे. व कंपनी ॲक्ट हा केंद्रिय अधिनियम असल्यामुळे केंद्रिय अधिनियमाच्या अंतर्गत पंजिबध्द झालेल्या संस्थेच्या संदर्भामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे "समुचित" शासन हे केंद्र सरकार असल्यामुळे व त्या संदर्भामध्ये केंद्रिय माहिती आयोगाची अधिकारिता असल्यामुळे

सदरच्या अपीलाबाबत केंद्रिय माहिती आयोगाकडे अधिकारिता दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरचे अपील हे केंद्रिय माहिती आयोगाकडे दाखल करणे संयुक्तिक राहील. केंद्रिय माहिती आयोगाचा पत्ता खालीलप्रमाणे आहे.

**केंद्रिय सूचना आयोग,**
**ब्लॉक नं. IV, पांचवा तल,**
**पूराना जे.एन.यू. परिसर,**
**नवी दिल्ली- ११००६७**

त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी केंद्रिय माहिती आयोगाकडे अपील दाखल करावे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अधिकारीते अभावी निकाली काढण्यात येते.

**दिनांक :-२२.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८९८/२००७**

**१) श्री अब्दुल अन्सार अब्दुल रऊफ**
**रा. इंदिरा नगर, यवतमाळ** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**विशेष पोलीस महानिरीक्षक, अन्टी करप्शन ब्यूरो, म.रा.मुंबई**
**मधु इंडस्ट्रीज इस्टेट, पहिला मजला, पांडुरंग बुधकर मार्ग,**
**वरळी मुबई -४०००१३.**

**३) जन माहिती अधिकारी तथा पोलीस अधीक्षक**
**अन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, जिल्हा अमरावती.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २५.८.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.१२.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने कागदपत्रे दाखल करण्यात आली आहे.

अपीलकर्ता यांनी सदरचे अपील आयोगाकडे दाखल करताना जोडपत्र क मध्ये दा ाल केले आहे. परंतु सदरच्या अपील मेमो सोबत माहिती कोणत्या माहिती अधिका-याकडे मागितली त्याबध्दलचे जोडपत्र अ व कोणत्या अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले त्याचे प्रपत्र ब ची छायांकित प्रत दाखल केली नव्हती. त्यामुळे त्यांना आयोगाच्या कार्यालयातून दिनांक ८.१.२००८ रोजीचे पत्राने प्रपत्र अ आणि ब ची छायांकित प्रत दाखल करावी याकरीता कळविण्यात आले होते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांचेकडे प्रपत्र अ आणि ब ची छायांकित प्रत नाही. तसेच प्रपत्र क मध्ये जोडपत्र अ आणि ब याबाबतचे छायांकित प्रती जोडल्याबाबत कोठेही नमूद केले नाही. परंतु प्रपत्र अ ची छायांकित प्रत जन माहिती अधिकारी

तथा पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडून आपण प्राप्त करुन घ्यावी ही विनंती. तसेच प्रपत्र ब ची छायांकित प्रत सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी व विशेष पोलीस महानिरीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी असे कळविले आहे. राज्य माहिती आयोगाकडे जे द्वितीय अपील दाखल केले जाते त्यामध्ये जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांचे योग्य ते वर्णन दिलेले असते. व त्यामुळे जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांना नोटीस काढतांना कोणत्या अर्जाच्या संदर्भामध्ये द्वितीय अपील राज्य माहिती आयोगडे दाखल केले आहे याबध्दलची माहिती जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांना होत नसल्यामुळे व द्वितीय अपील मेमोमध्ये कोणत्याही प्रकारचा संदर्भ दिलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे कोणती कागदपत्रे सुनावणीसाठी दाखल करावी असा प्रश्न उपस्थित केला जातो. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी किंवा जन माहिती अधिकारी हे आयोगाकडे सुनावणीस जरी आले तरी कोणतीही कागदपत्रे दाखल करणे शक्य नाही. व त्यामुळे अपीलाची सुनावणी घेणे किंवा मुदत देणे हे अशक्यप्राय होत असते. व त्यामुळे प्रपत्र अ आणि ब ची आवश्यकता असते. अर्थातच अधिनियमाचे कलम १९(१०) अन्वये अपील कार्यपध्दतीचे नियम अधिनियमाचे कलम २७(१)(ड.) प्रमाणे अपील कार्यपध्दतीचे नियम केलेले असते तर अपीलकर्ता यांना अशा प्रकारचे अपील दाखल करताना कागदपत्रे दाखल करावे लागले असते. परंतु शासनाकडे राज्य माहिती आयोगाने अपील कार्यपध्दतीचा मसुदा पाठविला असून सुध्दा एक वर्षाचा कालावधी लोटल्यावर सुध्दा अपील कार्यपध्दतीचे नियम शासनाने केले नाही. सामान्य प्रशासन विभागामध्ये सदरच्या अधिनियमाच्या तरतूदी बध्दल कोणत्याही प्रकारचे आकलन आहे असे दिसून येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा दिनांक १२.१०.२००५ रोजी अंमलात आल्यानंतर केंद्र शासनाने अधिनियमाच्या कलम २७(१)(ड.)प्रमाणे अपील कार्यपध्दती नियम हे दिनांक २८.१०.२००५ रोजीच केलेले आहेत. परंतु ते केंद्रिय माहिती आयोगास लागू आहेत. मात्र, महाराष्ट्र शासनाने आतापर्यंत अशाप्रकारचे नियम केलेले नाही. व त्यामुळे

अपीलकर्ता हे अनभिज्ञता दाखवून जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांचकडूनच कागदपत्रे उपलब्ध करुन घ्यावी असे आयोगास कळवितात.

प्रत्येक अपीलकर्त्यांची मानसिकता अशी असते की, त्यांचे एकटयाचेच काम फक्त सार्वजनिक प्राधिकरणात असते व त्यामुळे त्यांचे फक्त नांव सांगितले की त्यांनी केलेले अर्ज वगैरे सर्व उपलब्ध होऊ शकेल अशी त्याची समज असते. परंतु अशा परिस्थितीमध्ये आयोगास अपीलाच्या सुनावणीस कोणत्या अधिका-यांना बोलवावे असा प्रश्न पडतो. न्याय पालिकेमध्ये पोस्टाने अर्ज किंवा दावे दाखल करण्याची पध्दत नाही व त्यामुळे अर्ज किंवा दावे दाखल करुन घेताना नियमाप्रमाणे सर्व कागदपत्रे आहे किंवा नाही हे तपासणी केल्यानंतर अर्ज किंवा दावे दाखल होते. त्यामुळे न्याय पालिकेपुढे अशा प्रकारचे प्रश्न उपस्थित होत नाही. मात्र राज्य माहिती आयोगाचा अधिकार हा अर्धन्यायिक असला तरी पोस्टाने अपील किंवा अर्ज दाखल करण्याची कार्यपध्दती असल्यामुळे अपीलकर्ता हे त्याबाबत काळजी घेतातच असे नाही. व या कारणावरुन सुध्दा अपीलकर्ता यांचे अपील हे सकृतदर्शनीच खारीज करण्यास पात्र आहे.

परंतु अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचा नंतर दिलेल्या तपशिलाप्रमाणे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांना नोटीस काढून सुनावणीस उपस्थित राहाण्यास कळविले असता त्यांनी कागदपत्रे दाखल केली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली किंवा नाही हे तपासणे आवश्यक आहे. प्रभारी पोलीस अधीक्षक, अन्टी करप्शन ब्युरो, अमरावती यांनी खुलासा करतांना " अर्जदार श्री अब्दुल अन्सार अब्दुल रऊफ रा. इंदिरानगर, यवतमाळ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये दिनांक २५.८.२००६ रोजी दिलेल्या अर्जामधील मागितलेली माहिती यापुर्वी अन्टी करप्शन ब्युरो, यवतमाळ येथे दाखल अपसंदामधील गुन्हा आरोपी श्री साहेबराव बढीये उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, यवतमाळ यांनी सुध्दा दिनांक २५.८.२००६ रोजी अर्ज देवून माहिती मागितली होती. सदर प्रकरणी विद्यमान राज्य माहिती आयुक्त, नागपूर यांचेकडे त्यांनी सुध्दा अपील केले होते. त्यांच्या अपीलाचा क्रमांक ११६९/२००७ असून सदर अपीलाचा निकाल दिनांक ५.३.२००८ रोजी लावलेला आहे. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र नागपूर यांचे

आदेशान्वये अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात आलेले आहे. अर्जदार अब्दुल अन्सार अब्दुल रऊफ आणि अन्टी करप्शन ब्युरो कडून दाखल अपसंपदेच्या गुन्हयातील आरोपी श्री सहेबराव बा. बढिये, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, यवतमाळ हे मित्र असल्याची गोपनिय माहिती समजली आहे. श्री साहेबराव बढीये यांचे विरुध्द दाखल अपसंपदेचा गुन्हा सध्या तपासावर आहे."

तसेच पुन्हा खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

" उपरोक्त विषयास अनुसरुन सविनय सादर आहे की, विषयात नमूद अर्जदार श्री अब्दुल अन्सार अब्दुल रौऊ रा. इंदीरा नगर यवतमाळ यांनी श्री एन.एम.पारधे पोलीस अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती यांचे संपुर्ण नाव व पत्ता, स्थायी पत्ता, मुला मुलींचे व पत्नीचे संपुर्ण नांव, सेवापुस्तकाच्या पहिल्या पानाची छायांकित नक्कल, मागिल १० वर्षापासूनची फार्म नं. १६ ची माहिती, माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये मागणी केल्याबाबत दि. २५.८.२००६ रोजी दिलेला तक्रार अर्ज ॲन्टी करप्शन ब्यूरो अमरावती कार्यालयास दिनांक ३०.८.२००६ रोजी प्राप्त झालेला आहे.

अर्जदार श्री अब्दुल अन्सार अब्दुल रौऊफ यांनी वरील नमूद माहिती मिळण्याकरीता दिलेल्या वरील अर्जावरुन केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ (ञ) अन्वये त्यांनी मागितलेली माहिती नाकारल्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती पत्र क्रं.२०५८ दि. १८.९.२००६ अन्वये लेखी पत्र देण्यात आले होते.

सदर पत्रामध्ये माहिती नाकारल्याबाबतचे आदेशाविरुध्द अपीलीय अधिकारी मा.अपर महासंचालक ॲन्टी करप्शन ब्यूरो महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडे अपील दाखल करता येईल असे सुध्दा कळविण्यात आले होते.

अर्जदार यांनी अपीलीय अधिकारी यांचेकडे अपील केल्यानंतर अपील क्रं.४४/०६ दि.४.१०.०६ चे आदेशानुसार अर्जदार यांना त्यांनी दि. २५.६.२००६ रोजी केलेल्या अर्जातील माहिती पैकी संपुर्ण नांव, पत्ता व जन्म तारीख याबाबत माहिती देण्याचे आदेश प्राप्त झाले होते,

त्यानुसार अर्जदार अब्दुल अन्सार अब्दुल रौऊफ यांना आमचे कार्यालयीन जा.क्रं.२४१० दि.२०.१०.२००६ अन्वये माहीती कळविण्यात आली आहे."

यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-२५.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १९००/२००७**

**१) श्री सिध्दार्थ शंकरराव वानखडे**
**आझाद नगर (लालपूल), कोर्ट रोड परतवाडा**
**वार्ड क्रं. १५ ता. अचलपूर, जिल्हा अमरावती.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता कार्यालय**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम उपविभाग क्रं. १**
**अचलपूर, ता. अचलपूर जिल्हा अमरावती.**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम क्रमांक १,**
**उपविभाग, अचलपूर, जिल्हा अमरावती.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २५.८.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले नाही तर ते उपविभागीय अभियंता यांचेकडेच दाखल केलेले दिसून येते.

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१२.२००६ रोजी राज्य जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता याचंकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

हव्या असलेल्या माहितीचा तपशिल :" आपले आदेशाप्रमाणे वाहन सेवकानी सेवा केले बाबत कालावधी दि. १८.६.२००१ ते ४.८.२००३ वाहनचालक जीप गाडी नं.MS-१५३९ अचलपूर लॅागबुक डिझल बिल अता मेकॅनिक मोटार रिपेअरींग केलेत तेव्हा मी डयुटीवर होतो की रोजंदारीवर होतो. निवडणुक आयोगाचे आदेशाप्रमाणे डयुटी केली हे योग्य आहे की आयोग्य आहे. दि. १८.६.२००१ ते ४.८.२००३ पर्यंत मी आपले नियंत्रणाखाली कोणते काम केलेत. दि.

१८.६.२००१ ते ४.८.२००३ पर्यंतचे वाहन चालक अंतर्गत सेवा केली. मी ११.२.२००२ पासून ते १९.२.२००२ पर्यंत जि.परिषद पंचायत समिती निवडणुक डयुटी केली. तहसिल अचलपूर मधून भूगतान मिळालेत गाडी वांरवार मी निपेअरिंग करुन घेतली. डिझेल भरुन मी घेत होतो. तेव्हा या कामाची माहिती मिळणे जरुरी आहे. व्यक्तीशः सात दिवसाचे आंत हवी आहे. माहिती न मिळाल्यास आपण केलेल्या आर्थिक अडचणीमुळे कार्यालयासमोर उपोषणास बसणार आहे."

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.१.२००७ रोजी उपविभागीय अभियंता यांनी अपीलकर्ता यांना खालीलप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

माहिती : "वरील संदर्भिय अर्जान्वये आपणास कळविण्यात येते की, या उपविभागाचे वाहन क्रमाक MGS/१५३९ वर कायम स्वरुपी वाहन चालकाची व्यवस्था नसल्याने वरिष्ठ कार्यालयाच्या परवानगीने आपण नमूद केलेल्या कालावधीत (दिनांक १८.६.२००१ ते ४.८.२००३) कंत्राटी पध्दतीने कंत्राटदारा मार्फत वाहन चालकाची वेळोवेळी व्यवस्था करण्यात येत होती. याबाबत संबंधीत कंत्राटदारास वाहन चालकाच्या पगारापोटीचे भूगतान वरिष्ठ कार्यालया मार्फत करण्यात येत होते.

तसेच दिनांक १२.२.२०२ ते १९.२.२००२ या कालावधीत, शासकिय वाहन असल्याने जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक कामासाठी सदर वाहन देण्यात आले होते. या कालावधीत सुध्दा उपरोक्त वाहनावर कंत्राटदारा मार्फत वाहन चालकाची व्यवस्था करण्यात आली होती. या कालावधीत निवडणुक कार्यालय (तहसिल) मार्फत वाहन चालकास भत्ता पोटी जे काही भूगतान करण्यात आले असेल या बाबतची माहिती या कार्यालयास उपलब्ध नाही.

सदर वाहनात इंधन (डिझेल) भरणे, वाहनाची दुरुस्ती करणे यासाठी कार्यालयाचे संबंधीत अधिकारी/कर्मचारी हजर राहात होते. सदर वाहन हे दिनांक १६.३.२००५ रोजी म.जी.प्रा.उपविभाग, वणी येथे वाहन चालक रिकामा असल्याने पाठविण्यात आले आहे व सद्यपरिस्थीत या उपविभागात कोणते ही शासकिय वाहन नाही."

सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी वर नमूद केल्याप्रमाणे प्रथम अपील पुन्हा उपविभागीय अभियंता यांचेकडेच दाखल केलेले दिसून येते. व त्यामुळे त्याबाबतचा निर्णय झालेला दिसून येत नाही. माहिती मिळण्यासाठीचा अर्ज

करण्यापुर्वीच अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२००६ व ५.१२.२००६ च्या पत्रव्यवहाराच्या छायांकित प्रती दाखल केल्या आहेत. त्यात कार्यकारी अभियंता व अधिक्षक अभियंता, उपविभागीय अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी श्री सिध्दार्थ शंकरराव वानखडे यांना वाहन चालक या पदावर नियुक्ती देण्यात आलेली नाही व तसेच या कार्यालयाकडून वाहन चालकाचे पदी सदर इसमाला दाखवून भूगतान करण्यात आलेले नाही अशा प्रकारचा अहवाल दिलेला दिसतो. अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या खुलाशामध्ये त्यांनी केलेल्या सेवेच्या संदर्भामध्ये काही प्रश्न उपस्थित केलेले आहे. त्यामध्ये लागबुकावर सहया आहेत, वगैरे दाखविले आहे. व त्यामुळे असत्य माहिती दिली असे त्यांचे म्हणणे आहे. लागबुकावर अपीलकर्त्यांच्या सहया असतीलही, रिपेअरिंगच्या संदर्भात सुध्दा त्यांच्या सहया असतीलही परंतु जन माहिती अधिकारी यांनी सादर केल्याप्रमाणे प्रमाणे कंत्राटी पध्दतीवर वाहन चालकाची नियुक्ती झाली होती, असेच दिसून येते. अपीलकर्ता यांनी कामगार न्यायालयामध्ये सुध्दा दावा दाखल केला आहे. लागबुकाच्या छायांकित प्रती आधीच न्यायालयीन प्रकरण क्रमांक रेफ.आयडीए नं.२६/४ अन्वये न्यायालयात सादर केलेल्या असताना सुध्दा त्यांनी या कार्यालयाला पुनश्च मागणी करणे हे कार्यालयाचा वेळ घालविणे व आपल्या कार्यालयाची दिशाभूल करणे सिध्द होते असा खुलासा राज्य माहिती आयोगाकडे दाखल केला आहे.

जन माहिती अधिकारी यांचेकडून अपीलकर्ता यांचा न्यायालयातील रेफरन्स क्रमांक २६/४ च्या प्रतिज्ञापत्राची प्रत दाखल केली आहे. तसेच पी.डी. पाटील शासन नोंदणी कंत्राटदार यांना वेळोवेळी दिलेल्या भूगतानाच्या पावत्या दाखल केलेल्या दिसून येतात. अपीलकर्ता यांनी सुनावणीच्या सुरुवातीला सुध्दा त्यांची नियुक्ती तोंडी होती असे सांगितले. आज आदेश देतो, उदया आदेश देतो असे त्यांना सांगण्यात आले, असेच त्यांचे म्हणणे आहे. व त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्याप्रमाणे कंत्राटदारास भूगतान झालेले असेल व कंत्राटदाराकडून अपीलकर्ता यांना भूगतान झालेले नसेल तर अपीलकर्ता यांनी न्यायालयामध्ये दाखल केलेल्या दाव्यामध्ये संबंधीत कंत्राटदाराला पक्षकार करुन त्यांना भूगतान झालेल्या दरमहिन्याच्या वेतनाची रक्कम त्यांच्याकडून वसुल करुन घेता येईल. त्याकरीता अपीलकर्ता यांना श्री पी.डी. पाटील, शासन

नोंदणी कंत्राटदार तसेच साईनाथ कंस्ट्रक्शन व एम.पी. पांडे यांना भूगतान केल्याच्या पावत्या ज्या आयोगाच्या कार्यालयात दाखल केलेल्या आहेत त्यांची छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून राज्य माहिती आयोगाकडे जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या पी.डी. पाटील शासन नोंदणी कंत्राटदार यांना वाहन चालकांचे संदर्भामध्ये केलेल्या वेतनाच्या भूगतानाच्या पावत्या एकुण १३ च्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून ५ दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२) अपीलकर्ता यांची कामावर घेण्याबाबतची जी विनंती आहे ती आयोगास मान्य करता येत नाही.

३) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-२५.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक ४७/२००७**
**तक्रार क्रमांक १७६/२००७**

**१) श्री विलास वामनराव लोहोटे,**
**बी-३/११२, बजरंग कॅाम्लेक्स, सिरसपेठ,**
**नागपूर-४४०००९** **तक्रारदार**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी**
**तहसिलदार, तहसिलदार यांचे कार्यालय, अकोला.**

**३) २) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, अकोला.** **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक २५.८.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारदार यांनी दिनांक ४.४.२००७ व १८.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार हजर आहे. जन माहिती अधिकारी यांचे ऐवजी नायब तहसिलदार हजर आहे.

तक्रारदार यांनी २.४.२००७ रोजी माहिती अधिकारा अंतर्गत माहिती विचारण्याकरीता लेखी अर्ज देण्याकरीता अर्जदार तहसिलदार कार्यालयात गेले असता माहिती " अधिका-याचे मौखिक आदेश आहे की, माहितीच्या अधिकाराअंतर्गत आलेले अर्ज स्विकारु नये व त्यामुळे सदरचा अर्ज उपविभागीय अधिकारी यांचेकडे द्यावा लागला," अशी तक्रार असून शासकिय माहिती अधिकारी श्री एस.सी. साळुंखे, तहसिलदार, तहसिल कार्यालय, अकोला यांचे विरुध्द कायदेशिर कार्यवाही करण्यात यावी अशी विनंती केली आहे. सोबत अर्जाची प्रत दिनांक २.४.२००७ ची दाखल केली आहे. त्याबाबत खुलासा मागविण्यात आला होता. तक्रारदार यांनी उपविभागीय अधिकारी, अकोला यांचे कार्यालयात अर्ज सादर केला व त्यावर त्यांना माहिती देण्यात आली. अर्जदार यांचे म्हणण्यानुसार त्यांचा अर्ज घेण्यास नकार दिला हे म्हणणे खोटे असून पुर्णतः नाकबुल आहे. अर्जदार यांनी त्यांच्या अर्जात म्हटल्यानुसार संबंधीत कर्मचारी यांना

अशा प्रकारच्या कुठल्याही सूचना देण्याचा प्रश्न उदभवत नाही. माहिती अधिकाराअंतर्गत आलेले अर्ज आवक-जावक विभागत स्विकारले जात व तेथून संबंधीत विभागाकडे पाठविले जात असत. असा खुलासा श्री एस.सी. सोळंके, तत्कालीन, तहसिलदार, अकोला यांनी दाखल केला आहे.

दिनांक १८.६.२००७ रोजी सुध्दा अपीलकर्ता यांनी वरील संदर्भातच माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून तक्रार केलेली दिसून येते. सदरच्या उपविभागीय अधिकारी यांचेकडे केलेल्या अर्जाचे संदर्भामध्ये माहिती ही तहसिल कार्यालयात असल्यामुळे तहसिल कार्यालयातून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे दिनांक ३.४.२००७ रोजी कळविण्यात आलेले दिसते. परंतु मागितलेली माहिती प्रमाणित करुन द्यावी अशी तक्रारदार यांनी मागणी केली असता मुळ बक्षिस पत्र कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे छायांकित प्रतिच्या प्रमाणित प्रती देता येणार नाही अशी तक्रारदार यांनी सांगितले व त्यामुळे त्यांनी माहिती उपलब्ध करुन घेतली नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

तहसिलदार, अकोला यांनी दिनांक २७.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाचे कार्यालयात खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

खुलासा : " श्री विलास वामनराव लोहोटे, यांनी दिनांक २.४.२००७ रोजी या कार्यालयास अर्ज केला असता तहसिलदार अकोला यांनी अर्ज घेण्यास नकार दिला असे नमूद केले आहे. परंतु प्रत्यक्षतः मुळ अर्जदार वामनराव नथ्थूसा लोहोटे, मु.पो. म्हेसांग, ता.जि. अकोला हे स्वतः या कार्यालयात येवून अर्ज सादर केला नसून त्यांनी मा. उपविभागीय अधिकारी, अकोला यांचे कडे दिनांक २.४.२००७ रोजी अर्ज सादर केला आहे. सदर अर्ज दिनांक १०.४.२००७ रोजी या कार्यालयास प्राप्त झाला. अर्जा नमूद केल्यानुसार प्रकरणाचा शोध घेतला असता त्यामध्ये कु. ज्योती दादाराव नसुर्डे हयांची बक्षीस पत्राची छायाप्रत जोडलेली होती. त्याचीच छायाप्रत काढून दिनांक २०.५.२००७ रोजी अर्जदारास पाठवियात आली. प्रकरणामध्ये बक्षीस पत्राची मुळ प्रत नसल्यामुळै ती साक्षांकित करता आली नाही. त्यानंतर दिनांक २५.७.२००७ रोजी सुध्दा वरील प्रमाणे बक्षीस पत्राची छायाप्रत (एकुण पाने नऊ) अर्जदारास तलाठी म्हेसांग यांचे मार्फत पाठविण्यात आली. परंतु सदर प्रत अर्जदाराने स्विकार न करता या कार्यालयात तलाठी म्हेसांग यांचे मार्फत परत पाठविलेली आहे.

वरील बाबीवरुन दिनांक २.४.२००७ रोजी माहिती अधिकारान्वये अर्जदाराचा अर्ज तहसिलदार अकोला यांनी घेण्यास नकार दिला हे अर्जदाराचे म्हणणे चुकीचे आहे. "

तक्रारदार यांनी मागितलेल्या मुळ बक्षिस पत्राची मुळ प्रत ही तहसिल कार्यालयात उपलब्ध नसेल व छायांकित प्रत उपलब्ध असेल तर छायांकित प्रतिच्या प्रमाणित प्रती देता येत नाही. मात्र उपलब्ध असलेल्या छायांकित प्रतिच्या छायांकित प्रती करुन त्यावर " **माहितीच्या अधिकरामध्ये उपलब्ध करुन दिली** " अशा प्रकारचा शेरा देवून तहसिलदार म्हणून स्टँम्प देवून प्रमाणित करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार क्रमांक ४७/०७ ही मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार क्रमांक ४७/२००७ ही मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांना त्यांच्या दिनांक २.४.२००७ च्या माहितीच्या अर्जाचे प्रमाणे तहसिल कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या बक्षिसाच्या छायांकित प्रतीच्या छायांकित प्रती ही " **माहितीच्या अधिकारात उपलब्ध करुन दिली** " असे तहसिलदार यांनी प्रमाणित करुन द्यावे. सदरची प्रत हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) तक्रार क्रमांक १७६/२००७ ही खारीज करण्यात येत आहे.

३) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-२५.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १९०१/२००७**
**अपील क्रमांक १९१४/२००७**

**१) श्री उमेशचंद्र राधेश्याम गुप्ता**
**दत्तचौक, अमराईपुरा, यवतमाळ,**
**ता.जि. यवतमाळ.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक कार्यालय,**
**महा.राज्य मार्ग परिवहन विभाग, यवतमाळ, ता.जि. यवतमाळ.**

**३) जन माहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक कार्यालय,**
**महा.राज्य मार्ग परिवहन विभाग, यवतमाळ, ता.जि. यवतमाळ.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २६.८.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे. अपील क्रमांक १९०१/२००७ मध्ये दिनांक ५.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी आपल्या अधिनस्त काम करणा-या कर्मचा-यांना एकाच विभागात, एकाच टेबलावर काम करण्याचा कालावधी किती. सदर प्रकरणी राज्य परिवहन महामंडळाने काढलेल्या स्थायी आदेश,(Standing orders) तसेच मध्यवर्ती कार्यालयाचे परीपत्रकाची विभागवार जसे आस्थापना, अपराध, लेखा, कामगार शाखा जेवठया शाखा असतील त्याच्याप्रती द्याव्यात. आपणास (एम.सी.एस.आर.) महामंडळाचे कर्मचारी अधिकारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा कायदा लागू आहे काय. वाहकाचे गाडीत विना तिकीट प्रवाशी आढळल्यास विना छिद्रित तिकीट कां घेतले जाते. अशी माहिती मागितलेली असून माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

सदरच्या अर्जाच्या प्रमाणे दिनांक २.४.२००७ रोजी विभाग नियंत्रक, राज्य परिवहन यवतमाळ यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सदरच्या

उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी पुन्हा अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १५.५.२००७ रोजी देण्यात आलेला असून माहिती ही दिनांक २.४.२००७ रोजी उपलब्ध करुन दिली असून मुद्या क्रमांक १ व २ ची माहिती ही कर्मचा-यांकडून कोणत्या दप्तराचे काम करुन घ्यावयाचे ही बाब प्रशासकिय धोरणात्मक स्वरुपाची असून प्रशासकिय गरजेस्तव कर्मचा-यांना दप्तराचे काम दिले जाते असा निर्णय दिलेला दिसून येतो. व तरी सुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी दिनांक २.७.२००७ रोजी खुलासा दाखल केला आहे तसेच प्रतिज्ञापत्र सुध्दा दाखल केले आहे. परंतु अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जातील माहितीचे अवलोकन केले असता त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे व तसे त्यांनी मान्य सुध्दा केलेले आहे. परंतु मुद्या क्रमांक १ च्या संदर्भामध्ये त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली असेल तर त्यांचा असा समज आहे की, अशा प्रकारचे स्थायी आदेश असतात. परंतु पुन्हा प्रथम अपीलीय अधिकारी तसेच माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अशा प्रकारचे कोणतेही स्थायी आदेश उपलब्ध नसतात व त्याबाबत अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य आहे असा निष्कर्ष काढणे आवश्यक आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

अपील क्रमांक १९१४/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२००७ रोजी एखादे वाहकाचे गाडीत वि.मु.वि.ति.प्रवाशी आढळल्यास वाहकाकडून विनाछिद्रित तिकीट घेण्याचे सविस्तर कारण स्पष्ट करावे. तसेच एखादे वाहकाचे गाडीत मनिकलेक्ट अथवा कोणत्याही प्रकारे एकाच तिकीटाची पुनर्विक्री केल्याचे मार्ग तपासणीसांचे निदर्शनास आल्यास तेवढया किंमतीची विनाछिद्रित तिकीट घेण्याचे प्रयोजन त्याची रक्कम वाहकास मार्ग तपासणीस देत का नाहीत. कलम १२ ब ही सिध्द झाल्यास काय शिक्षा दिली जाते. न झाल्यास शिक्षेची त्या वाहकासाठी काय तरतूद आहे. वाहक/चालक निर्दोष असल्याचे सिध्द होत असूनही त्यांना त्यांचेवर जबरीने शिक्षा कां लादली जाते. अशी माहिती विचारली असून सदर माहिती व्यक्तीशः

घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १२.३.२००७ रोजी ४ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १८.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक २५.४.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यामुळे सुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भामध्ये त्यांचे समाधान झालेले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु, मुद्दा क्रमांक ४ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना प्रश्नांच्या माध्यमातून नियमाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांचे अभिप्रायाची अपेक्षा आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी प्रमाणे कोणत्याही प्रकारची माहिती ही उपलब्ध असलेल्या दस्तऐवजाच्या, कागदपत्राच्या, अभिलेखे, टिपणी इ.च्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध होतात. परंतु कोणत्याही प्रकारे जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय येईल अशा प्रकारची माहिती ही "माहिती " या व्याख्येत अभिप्रेत नाही. व त्यामुळे सदरच्या प्रश्नाचे उत्तर हे अपीलकर्ता यांना न्यायालयाच्या माध्यमातून उपलब्ध होऊ शकते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना ते उत्तर दिले आहे ते योग्य असे दिलेले आहे. व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

वरील दोनही अपीलामध्ये माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी तथा विभागीय नियंत्रक यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती माहिती त्यांनी तयार करुन दिलेली आहे. कोणत्याही प्रकारे माहिती तयार करुन देणे सुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीप्रमाणे अपेक्षित नाही. विचारलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जे नियम किंवा कागदपत्रे उपलब्ध असतील त्या नियमाच्या किंवा कागदपत्रांच्या किंवा टिपणीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित आहे. माहिती तयार करुन दिल्यास अर्जदार अपीलकर्ता यांचे जवळ ती तपासण्यास कोणतेही कागदपत्र नसतात. व त्यामुळे सदरच्या माहितीमुळे समाधान होत नाही व प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल केले जातात. त्यामुळे ज्या

साहित्याच्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन दिल्यास प्रथम अपील किंवा द्वितीय अपील दाखल करण्याचा प्रश्न येणार नाही व त्यामुळे माहिती तयार करुन देणे हे अपेक्षित नाही, याची नोंद घ्यावी.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १९०१/२००७ व अपील क्रमांक १९१४/२००७ मध्ये त्यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे दोनही अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-२६.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**
**अपील क्रमांक १९०८/२००७**

**१) श्री  बळवंत अजाबराव वाटाणे**
**मुराई कॅम्लेक्सचे मागे, हर्षवत कॅालनीजवळ**
**वि.म.वि. पोस्ट ऑफिस, अमरावती-४४४६०४** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी**
**कृषि सहसंचालक विभागीय कार्यालय,**
**अमरावती विभाग, अमरावती.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**कृषि सहसंचालक विभागीय कार्यालय,**
**अमरावती विभाग, अमरावती.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २७.८.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.६.२००७ (प्राप्त दिनांक ८.६.२००७) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी, कृषि सहसंचालक कार्यालय यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

माहितीचा विषय : "कृषि विभागातील कृषि सेवकाची सहाय्यक अधीक्षक/वरिष्ठ लिपिक/लिपिक यांच्या नियुक्ती संदर्भातील जाहिराती विषयी माहिती. १२ मार्च ०७ रोजीची जाहिरात क्रं.आस्था/कृसेप/ससेप्र/गट-क/८१२/२००७ दिनांक १२ मार्च, ०७. सदरहू जाहिरात कोणकोणत्या वृत्तपत्रात आपण कोणत्या एजन्सीद्वारे ही जाहिरात प्रसिध्दीस दिली त्यांची नांवे, प्रसिध्दीचा दिनांक आकार व त्या वृत्तपत्राचे दर एकुण या जाहिरातीवर किती खर्च झाला."

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.४.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली होती. असे अधीक्षक कृषि अधिकारी यांचे खुलाशावरुन दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक २४.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलामध्ये माहिती अपूरी मिळाली असे कारण दिलेले दिसते. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळे राज्या माहती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने जी माहिती मागितलेली आहे त्यावेळेस जाहिरातीची देयके प्राप्त झाली नव्हती व त्यामुळे ती माहिती त्यांना देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतु त्यानंतर देयके प्राप्त झाल्यानंतर सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिली नाही असेच दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये टिपणी सहाय्यक श्री एस.ए. सावंत, वरिष्ठ लिपिक व सहाय्यक माहिती अधिकारी यांनी श्री एम.एम. कांबळे यांनी अपील अर्ज अपीलीय अधिकारी यांचे निदर्शनास आणून दिला नाही. त्यामुळे सुनावणी होऊ शकली नाही असा खुलासा सादर केला आहे. टिपणी सहाय्यक किंवा वरिष्ठ लिपिक व सहाय्यक माहिती अधिकारी यांनी जर अपीलीय अधिकारी यांचे निदर्शनास प्रथम अपील आणले नसेल तर त्यांचे विरुध्द प्रशासकिय कार्यवाही करणे आवश्यक ठरते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांची सुध्दा अकार्यक्षमता दिसून येते. त्याप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कारणे दाखवा नोटीस ही टिपणी सहाय्यक व सहाय्यक माहिती अधिकारी यांना दिली आहे असे त्यांनी आयोगास तोंडी सांगितले. तसेच माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असेही सांगितले असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १६.३.२००७ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना

माहितीच्या छायांकित प्रती रजिस्टर पोस्टाने विनामुल्या उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-२७.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १९११/२००७**

**१) श्री गजानन प्रल्हादराव तेलगोटे**
**मु.पो. सोमवार बेस, आकोट, ता. आकोट,**
**जिल्हा अकोला -४४४१०१** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी,**
**उपविभाग, अकोट, ता. आकोट, जिल्हा अकोला.**

**३) जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,**
**अकोट, ता. आकोट, जिल्हा अकोला.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २७.८.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१२.२००६ रोजी खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमूद केले आहे. दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे.

माहितीचा विषय : "(१) दारिद्रय रेषेखालील मागासवर्गीय अत्यंत हलाखी व नादारी दारिद्रयाची आर्थिक परिस्थिती असलेले अत्यअल्पभूधारक शेतकरी श्री पल्हाद गेन्दु तेलगोटे यांनी शेती पॅकेज अंतर्गत पंचवीस रुपये आर्थिक अनुदान मिळणे करीता आपणाकडे माहे मार्च २००६/एप्रिल २००६ मध्ये केलेला अर्ज या विषयी आपण केलेली कार्यवाही पॅकेज अनुदान मंजूरी विषयी माहिती द्यावी.

(२) आकोट तालुक्यातील शेती पॅकेज अंतर्गत मंजूर केलेली अर्ज जसे शेतकरी पुर्ण नांव पत्ता गावाचे नांव एकुण शेती नावाने शेतीचा प्रकार कोरडवाहू/बागायती, अर्जदार दारिद्रय रेषेखालील आहे काय. अर्जदाराचा प्रवर्ग SC/ST/open पॅकेज मंजूरीचे कारण, इत्यादि माहिती

(३) पॅकेज मंजूरी विषयी निकष, नियम व पात्रता याविषयी माहिती

(४) दुभती जनावरे व पॅकेजमधून इतर सर्व प्रकारचे शेतक-यांना मदत सहाय्य मिळणे करीता असलेले निवड पात्रता, मंजूरी विषयीचे शासनाचे परिपत्रके इत्यादीची माहिती.

(५) शेतक-यांना महाराष्ट्र व केंद्र सरकार तर्फे दिल्या जाणा-या सर्व प्रकारची मदत, पॅकेज (सन २००५-०६-०७) यासंबंधी शासनाचे आदेश व परिपत्रके नियमावली इत्यादीची माहिती."

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ९.२.२००७ रोजी प्रथम अपील तालुका कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी, आकोट उपविभाग यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये उपविभागीय कृषि अधिकारी, अकोट यांनी दिनांक १२.२.२००७ रोजी अपीलकर्ता यांना तालुका कृषि अधिकारी कार्यालयात कृषि अधिकारी हे माहिती अधिकारी आहे व तालुका कृषि अधिकारी हे त्यांचे अपीलीय अधिकारी आहे. तेव्हा आपण तालुका कृषि अधिकारी (अपीलीय अधिकारी) यांचेकडे संपर्क साधून निर्णय घ्यावा. आपला सदर्हु अपील अर्ज तालुका कृषि अधिकारी, आकोट यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. पत्राची प्रतिलीपी तालुका कृषि अधिकारी, आकोट यांना अग्रेषित केलेली दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. तालुका कृषि अधिकारी यांनी मंडळ अधिकारी आकोट-१ व २ चोहटटा तालुका कृषि अधिकारी शाखा मृदु संधारण, तालुका कृषि अधिकारी, शाखा विस्तार यांचेकडे माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी पत्र पाठविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली दिसून येत नाही. परंतु आयोगाची नोटीस दिनांक ९.७.२००८ रोजी निर्गमित झाल्यानंतर दिनांक १४.८.०८ रोजी

उपविभागीय अधिकारी यांनी तालुका कृषि अधिकारी, आकोट यांना माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. तथापि, त्यावर काहीही कार्यवाही केलेली नसल्यामुळे आयोगाकडे अपील दाखल केले आहे. त्यामुळे अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती तात्काळ पुरवून या कार्यालयास कळविण्यात यावे असे तालुका कृषि अधिकारी कार्यालयास कळविण्यात आलेले दिसते. व त्याप्रमाणे दिनांक २६.८.२००८ पूर्वी अपीलकर्ता यांचेकडे घरी जावून माहिती देण्याचा प्रयत्न केला होता. परंतु अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घेतली नाही असा श्री अे.एल. सोळंके, शिपाई यांचा जबाब माहिती अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केल्याचे दिसून येते.

यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही असाच निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ता यांना प्रवासखर्च हा झेपणार नाही म्हणून सुनावणीस अनुपस्थित राहाण्याकरीता परवानगी मागितली आहे.

अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १३.१२.२००६ च्या अर्जाप्रमाणे ३० दिवसांचे आंत म्हणजे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यानंतरही प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय दिलेला नसल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतूदींचे पालन केलेले नाही असे दिसून येते. आज संबंधीत अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी हे उपस्थित नसून विद्यामान प्रथम अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहे. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यामुळे सदरचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना दिनांक १३.१२.२००६ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने मागितलेली माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) संबंधीत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, अकोला यांना पोस्टाने स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.

४) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-२७.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १९१७/२००७**

**१) श्री ओमप्रकाश यशवंत सुरवाडे**
**मु.पो. बटवाडी, ता.बाळापूर, जि. अकोला. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कुलगुरु**
**कवी कुलगुरु कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक**
**ता.रामटेक, जिल्हा नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा तथा कुलसचिव,**
**कवी कुलगुरु कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक**
**ता.रामटेक, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २८.८.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.३.२००७ रोजी कुलसचिव यांना माहिती अधिकारी म्हणून "(१) सरस्वती एज्युकेशन सोसायटीने आपल्या विद्यापीठास कृष्णाजी जोशी बी.एड.कॅालेजच्या मान्यतेसाठी जो प्रस्ताव सादर केला त्याच्या साक्षांकित सत्यप्रती.

(२) संबंधीत महाविद्यालयाच्या इमारतीचा नकाशा, शासकिय नियमाप्रमाणे संपूर्ण भैातिक सोयी उपलब्ध आहेत का. असतील तर त्याचा तपशिल.

(३) संबंधीत महाविद्यालयाने किती शिक्षकेतर कर्मचारी नेमावे.त्यात SC, ST, NTVJ, SBC, OBC च्या कर्मचा-यांची संख्या.

(४) २००५-०६ व २००६-०७ या वर्षात विद्यापीठाकडून किती शुल्काचे धनादेश देण्यात आले.

(५) आपल्या विद्यापीठात SC,ST,NT,VJ व SBC,OBC अपंग, माजी सैनिक यांच्या भरलेल्या व रिक्त असलेल्या पदांचा तपशिल."

माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी तथा कुलगुरु यांचेकडे दिनांक २३.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक २८.४.२००७ रोजी " वरील विषयाबाबत आपल्या दिनांक २६.३.२००७ रोजीचा मुळ अर्ज विश्वविद्यालयास अद्याप प्राप्त झाला नाही. तरी अपीलाबाबत पुढील कार्यवाहीसाठी आपल्या मुळ सहीचा अर्ज ( विश्वविभालयाच्या विहित नमुन्यात ) कृपया विश्वविद्यालयास सादर करावा " असे कळविण्यात आलेले दिसून येते. मात्र त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक १५.५.२००७ रोजी फॅक्सनी " आपणास माझा दिनांक २६.३.२००७ चा मुळ अर्ज प्राप्त झाला नाही असे समजते. परंतु मी दिनांक २३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपील दाखल करताना मी (कुलसचिव) पाठविलेल्या मुळ अर्जाच्या सत्यप्रती सोबत जोडलेल्या आहेत. पोस्टाने हा अर्ज पाठविण्याचा पुरावाही सोबत जोडलेला आहे. " असे कळविलेले दिसून येते. परंतु जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, त्यांचा मुळ अर्ज त्यांना प्राप्त झाला नसल्यामुळे व त्यांनी पुन्हा मुळ अर्जाची प्रत पाठविली नसल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. परंतु राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून दिनांक २६.३.२००७ रोजीच्या अर्जाची प्रत उपलब्ध करुन घेतली आहे. व त्यांना माहिती पाठविण्यात आली. श्री सुरवाडे यांनी यापूर्वी याच मुद्यांवर एकापेक्षा जास्त वेळी माहितीच्या अधिकारात अर्ज केले आहेत. महाविद्यालयाने माहिती देवूनही पुन्हा त्याच मुद्यावर अपील केले आहे. यापुर्वीचे त्यांचे अपील राज्य माहिती आयुक्त, मुंबई व राज्य माहिती आयुक्त, नागपूर यांनी फेटाळलेले आहे. महाविद्यालयाची माहिती महाविद्यालयाकडून थेट न घेता ती विश्वविद्यालयाकडून घेण्याची प्रक्रिया संयुक्तिक वाटत नाही, असा खुलासा दाखल केला आहे. सदरच्या खुलाशावरुन अपीलकर्ता यांना माहिती

उपलब्ध करुन दिली आहे असे दिसून येत असल्यामुळे सदरची अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-२८.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १९२१/२००७**

**१) श्री पुंजाराम शिवराम जुनघरे**
**इंदिरा आवास वार्ड, घाटंजी, जि.यवतमाळ** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.)**
**विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती.**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद घाटंजी, जिल्हा यवतमाळ.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २९.८.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.२.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, घाटंजी यांचेकडे " जनार्धन नरसोबा साबापूरे (न.प.शिपाई) यांस व इतर लोकांना औद्योगिक न्यायालय, अमरावतीच्या आदेशाने नं.प. कर्मचारी म्हणून समावून घेण्यात आले. सदर न्यायालयाचे आदेश प्रत द्यावी. व सन १९८७ पासून घाटंजी नं.प.च्या सव्र कर्मचा-यांची सेवाजेष्ठता यादी दयावी. "सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे लेखी दिलेले दिसते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ९.५.२००७ रोजी देण्यात आला असून " अपीलार्थी यांनी अर्जात नमूद केलेली माहिती ही संबंधीतास पुरविण्यात आल्याने माहिती देण्यात आलेल्या विलंबाचे कारण लक्षात घेवून क्षमापित करण्यात येत असून अपीलार्थी यांचे अपील खारीज करण्यात येते." असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकउे द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा संबंधीत माहिती अधिकारी यांनी पत्राने कळविले असल्यामुळे त्याप्रमाणे निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी सुध्दा अतिशय बेजबाबदारपणे प्रथम अपीलाचा निर्णय देतात असे दिसून येते.

संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली असती तर त्याबाबतच्या जावक नोंदवहीची छायांकित प्रत आयोगाकडे सादर करावयास पाहिजे होती. परंतु ती सादर केली नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही असाच निष्कर्ष काढावा लागतो. व त्याकरीता संबंधीत तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २० (२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही करणे हे आवश्यक वाटते. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना रजिस्टर पोस्टाने त्यांच्या दिनांक १३.२.२००७ च्या अर्जाप्रमाणे मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२) संबंधीत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे अशा प्रकारचा पुरावा सादर न केल्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

३) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही प्रादेशिक संचालक, नगर प्रशासन तथा विभागीय आयुक्त, महसूल, अमरावती यांनी करावी.

४)) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-२९.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४०६/२००७**

**१) श्री संजय चरणदास बुंदेले, कनिष्ठ अभियंता**
**महा.औद्योगिक विकास महामंडळ कर्मचारी वसाहत**
**गाळा क्रं.२,बडनेरा, जुना बायपास रोड, अमरावती औद्योगिक क्षेत्र,**
**अमरावती.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता**
**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,**
**उच्च न्यायालयाजवळ, सिव्हील लाईन्स, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, विभाग क्रं.१,**
**प्लॅाट क्रं.एक्स-५०, एम.आय.डी.सी. हिंगणा रोड, नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २९.८.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.५.२००८रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.७.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे सदरच्या अपीलाच्या सुनावणीमुळे माझे भविष्याशी निगडित असून त्यामुळे माझे प्रमोशन थांबलेले आहे व मी खूप मानसिक यातना भोगत आहे. तरी कृपया निकड लक्षात घेवून सुनावणी लवकर लावण्यात यावी ही विनंती. अपीलकर्ता यांनी कोणत्याही अर्जावर किंवा आयोगाकडे दाखल केलेल्या अपीलावर, प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केलेल्या अपीलावर तारीख घातलेली दिसून येत नाही.

अपीलकर्ता यांनी दिनांक २.१.२००८ रोजी (अर्जावर तारीख घातलेली नाही) शासकिय माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**माहितीचा तपशिल** : " श्री एस.एस.गाडगे साहेब सद्य उपअभियंता बुटीबोरी उपविभाग क्रं.१ तत्कालीन उपअभियंता उपविभाग क्रं. २ अकोला हे दि. १७.६.२००५ ते ३१.३.२००६ या कालावधीत (अतिरिक्त कार्यभार उपविभाग क्रं. २ अकोला) येथे कार्यरत असतांना माझ्या कार्यालयीन कामाच्या शैलीबाबत खालील प्रतिकुल शेरे नोंदविले होते. (१) साधारण जमा :- तुम्हास अंदाजपत्रके, निविदेचे प्रारुप, पत्रव्यवहार, देखभाल यात सुधारणा करणे आवश्यक आहे. (२) वेग :- सुधारणा करणे आवश्यक आहे. (३) पुरेसे दौरे करणे :- अकोला बाहेर दौरे करणे आवश्यक आहे. (४) प्रोजेक्ट वर्क्स/संशोधन/डिझाईन्स या बाबत दक्षता सुधारणा आवश्यक आहे. (५) प्रकल्प अहवाल/संकल्पना/सर्व यांचे कडून काळजी पुर्वक व प्रभावी प्राप्त होता काय. या कामात आपली व्यवहार्यता सिध्द करतात काय. आणि योग्य निर्णय घेते काय. अंदाजपत्रक, प्रस्ताव, निविदेचे प्रारुप व इत्यादी तांत्रिक कामात दक्ष राहावे.

वर उल्लेखीत शेरे नांदवितांना तत्कालीन प्रतिवेदन अधिकारी व सद्य उपअभियंता साहेब, उपविभाग, बुटीबोरी श्री एस.एस. गाडगे साहेब यांनी कोणता आधार घेतला पुरावे व त्या पुराव्याचे कागदपत्रे देण्यात यावेत.

०२. मा.अधिक्षक अभियंता, मुंबई यांना दिनांक १५.५.२००७ रोजी प्रतिकुल शेरे खारीज करण्याबाबत मी निवेदन सादर केले होते. त्याच निवेदनातील सर्व खुलासे प्रतिवेदन अधिकारी श्री एस.एस. गाडगे साहेब यांचे संबंधात होते सबब ते निवेदन संदर्भासाठी व त्यातील खुलास्याच माहिती मिळण्यासाठी असे आहो. निवेदनातील पान क्रं. (१) परिच्छेद २ व ३, पान क्रं. २ परिच्छेद १,२,३ व ४, पान क्रं. (४) मधील परिच्छेद २,४,५ व ६ व पान क्रं.मधील परिच्छेद १,२,३ व ४ यात मी उपस्थित केलेल्या बाबींचा खुलाश्या बाबत स्पष्ट माहिती प्रतिवेदन अधिकारी व सद्य उपअभियंता श्री गाडगे साहेब उपअभियंता बुटीबोरी यांचे कडून मिळण्यात यावी. (संदर्भासाठी व खुलासा मिळण्यासाठी बाबी/मुद्दे रेखांकित केले.)

०३. शासन निर्णय क्रं.सि.एफ.आर.१२९५/प्र.क्रं.३०/९५ तेरा, मुंबई ४०००३२ दि. १ फेब्रुवारी १९९६ शासनाचे/अधिका-यांचे कर्मचा-यांचे गोपनिय अहवाल लिहीणे व जतन करणेबाबत परिशिष्ट अ पृष्ठ क्रं. ११ नियम ५५ अन्वये.

एखाद्या कर्मचा-याला ओळीने चांगले शेरे मिळाले किंवा जर या उलट घडले तर अशा प्रकरणी विभाग प्रमुखानी/प्रशासकिय विभागानी विशेष सावध राहावे असा अहवाल अंतिमरित्या स्विकारण्यापूर्वी प्रतिवेदन/पुनर्विलोकन अधिका-यांना त्यांच्या शे-यांसंबंधी कागदपत्रासह सदर शे-यांचे पुष्टीकरण करण्यास सांगावे.

सबब माझे सन २००३-०४ व २००४-२००५ या वर्षात ओळीने उत्कृष्ट शेरे आहेत. तसेच सन २००६-२००७ या वर्षात सुध्दा उत्कृष्ट शेरे आहेत परंतु प्रतिवेदन अधिकारी व सद्य उपअभियंता श्री एस.एस. गाडगे साहेब दि. १७.५.२००५ ते ३१.३.२००६ ( ८ महिने १४ दिवस ) यांचे कालावधीतच आकस्मिकपणे प्रतिकुल शेरे प्राप्त झाले सबब प्रतिवेदन अधिकारी यांनी या शे-यांचे पुष्टकरणास कोणती कागदपत्रे सादर केली आहेत यांची माहिती व त्यांचे प्रती मिळण्यात याव्या.

०१. शासन निर्णय क्रं.सि.एफ.आर.१२९५/प्र.क्रं.३०/९५ तेरा मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि. १ फेब्रुवारी-१९९६ शासनाने अधिका-यांचे कर्मचा-यांचे गोपनिय अहवाल लिहीणे व जतन करणेबाबत परिशिष्ट अ पृष्ठ क्रं. ५ नियम १२ अन्वये.

गोपनिय अहवाल लिहीतांना आपल्या हाताखालील कर्मचारी अधिकारी विशेषत: मागासवर्गीय अधिका-यांवर अन्याय होणार नाही याची काळजी प्रतिवेदन तसेच पुनर्विलोकन अधिका-यांनी घ्यावी. कर्मचा-यांचे/अधिका-यांचे विशेषत: मागासवर्गीयांचे गोपनिय अहवाल त्यांचे पदोन्नतीच्या सुमारास हेतुपुरस्परपणे नकारात्मकदृष्टया किंवा जाणून बुजून प्रतिकुल लिहिले जातात तसे न लिहिता ते अत्यंत वस्तुनिष्ठपणे लिहावेत या आदेशाचे उल्लंघन करणा-या अधिका-यां विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

मी अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील मागासवर्गीय कर्मचारी असून मला देण्यात आलेले प्रतिकुल शेरे नेमके माझ्या पदोन्नती कालावधी (समोर) लक्षात घेवून दि. १७.६.२००५ ते ३१.३.२००६ या कालावधीत माझे कार्यशैली बध्दल कोणतेही सूचना, मेमो, जाब, प्रतिवेदन अधिका-यांने दिले नाही व प्रतिकुल शे-याबाबतचे कोणते नियम पाठलेले नाहीत. यामुळे मला पदोन्नती पासून डावलण्यात आले असून माझे पुढील भविष्य अंधारमय व मी यामुळे कठोर मानसिक यातना भोगत आहो.

सबब प्रतिवेदन अधिकारी वस्तुनिष्ठ पुरावे सादर करु शकल्यास या अधिका-यांवर नियमानुसार काय कार्यवाही होणार किंवा झाली याची माहिती देण्यात यावी."

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २५.१.२००८ रोजी कार्यकारी अभियंता यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सोबत सहपत्रे सुध्दा दाखल केलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ४.२.२००८ रोजी शासकिय अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १३.२.२००८ रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना दिनांक २५.२.२००८ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने व्यथित होऊन अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांचे गोपनिय अहवाल ज्या अधिका-यांनी लिहिलेले आहे त्या अधिका-यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दिनांक १८.१.२००८ रोजी सविस्तर अशी माहिती पाठविलेली आहे. त्या उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमध्ये अपीलकर्ता यांचे गोपनिय अहवाल लिहिण्याच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची नोंद ठेवण्यात आलेली नाही तर ते निरीक्षणावरुन लिहीलेले आहे. असे नमूद केलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती संपुर्ण अशी उपलब्ध झालेली आहे असे दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, सदरचे गोपनिय अहवाल ज्या कागदपत्रांच्या आधारे लिहिलेले असतील ती कागदपत्रे त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु दिनांक १८.१.२००८ रोजी उपअभियंता श्री गाडगे यांनी वर नमूद केल्याप्रमाणे उपलब्ध करुन दिलेली माहिती ही स्वयंस्पष्ट आहे. त्यात त्यांनी "कागदपत्रे सादर केलेली नाहीत. व हा सर्वसाधारण निष्कर्ष आहे" अशा प्रकारे गोपनिय अहवालाच्या संदर्भामध्ये त्यांचे म्हणणे दिलेले आहे. व त्यावरुन कागदपत्रे उपलब्ध नाही असाच निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे कोणतीही माहिती ही देण्याची टाळाटाळ केलेली आहे असे म्हणता येत नाही. जी कागदपत्रे उपलब्ध नाही किंवा अपीलकर्त्यांच्या म्हणण्यानुसार तशा प्रकारची नोंद ठेवलेली नाही, ती उपलब्ध करुन देता येत

नाहीत. व त्यामुळे अपीलकर्ता यांना गोपनिय अहवालाच्या संदर्भामध्ये अन्याय झाला असे वाटत असेल तर त्याकरीता अर्थातच वरिष्ठ अधिका-यांकडे निवेदन (Representation) करण्याची तरतूद असते. त्याप्रमाणे वरिष्ठ अधिकारी हे संबंधीत अधिका-यांकडून माहिती मागवून त्याबाबतची चौकशी करुन निवेदनाच्या संदर्भामध्ये निर्णय देत असतात. व तशा प्रकारे अपीलकर्ता यांना न्याय मिळवून घेता येईल. व त्याबाबतची माहिती सुध्दा त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे.

प्रथम अपीलाच्या निर्णयात सुध्दा " तथापि, सुनावणी दरम्यान असे आढळून आले आहे की, श्री एस.सी. बुंदेले, कनिष्ठ अभियंता यांचे दिनांक १७.६.२००५ ते ३१.३.२००६ या कालावधीचा गोपनिय अहवाल सर्व साधारण निरिक्षणाच्या आधारे लिहिलेला दिसतो. सबब श्री एस.एस.गाडगे, उप अभियंता यांनी गोपनिय शेरे नोंदवितांना पुरावे व पुराव्याचे कागद यांचा आधार नसल्याने ते सादर करण्यास असमर्थता दर्शविली. सबब माहिती अधिकारी यांनी या व्यतिरिक्त अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीबाबत लेखी स्वरुपात आणखी कागदपत्रे उपलब्ध असल्यास अपीलार्थीला देण्यात यावी अथवा उपलब्ध नसल्यास तसे अपीलार्थी यांस आदेश प्राप्त झालेल्या दिनांकापासून १५ दिवसात कळविण्यात यावे. " असे आदेश दिलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २.१.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-२९.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १९२८/२००७**

**१) श्री दिनकर विठठलराव जाधव**
**मु. तपोवन, पो. त-हाळा, ता.मंगरुळपीर,**
**जिल्हा वाशिम. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)**
**जिल्हा परिषद, वाशिम.**

**३) जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, मंगरुळपीर, ता. मंगरुळपीर, जि.वाशिम. उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ३०.८.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.६.२००७ (अर्जावर तारीख नाही) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.९.२००६ व दिनांक १५.११.२००६ रोजी गट विकास अधिकारी यांचेकडे शासकिय माहिती अधिकारी म्हणून अनुक्रमे खालीलप्रमाणे माहिती मगितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन** : " पेडगांव पं.स. गांवातील बंडुभाऊ वैद्य पंचायत समिती सदस्य यांची निवउ झाली तेंव्हापासून आजपर्यंत त्यांच्या निधीतील वाटप केलेले कामे किती. पुर्ण झालेले कामे किती याची संपुर्ण यादी कामे करणा-या ठेकेदाराची नावाची यादी कामे चांगले झाले याची कबुली देण्यात यावी. (१) सिमेटपलग (२) पांदन रस्ते (३) सांस्कृतिक

सभागृह (४) अंगणवाडी दुरुस्ती (५) घरकुल वाटपाची यादी (६) या घरांवर मजूर म्हणून काम करणा-यांची नावे यादी व हजेरी पत्रकाची झेरॉक्स इत्यादि माहिती देण्यात यावी. व



संपूर्ण मंगरुळपीर तालुक्यातील (पेडगांव व गण सोडून) पं.स. अंतर्गत झालेल्या पांधण रस्ते व सिमेंट प्लगच्या गांवनिहाय माहिती. प्रत्येक सिमेंट व पांधण रस्त्याचे अंदाजपत्रक, काम कोणी केले त्यांचे नांव, देखरेख अधिका-यांचे नाव, पूर्ण व अपूर्ण कामाची माहिती, कामावर असणा-या मजूरांची यादी व त्यांचे गहू, तांदूळ उचलण्याबाबत माहिती, दररोजच्या हजेरीपटाची झेरॉक्स प्रत (सन २००१ ते २००६ पर्यंत)."

सदरची माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केलेले असून दारिद्रय रेषेचे कार्ड जोडलेले आहे असेही नमूद केले आहे. परंतु सदरच्या दोनही अर्जाप्रमाणे अपीलकर्ता यांना माहितीचे निरीक्षण करण्याकरीता दिनांक १३.९.२००६ रोजी व दिनांक ३१.१०.२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांनी कळविले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी दोनही अर्जाच्या संदर्भामध्ये दिनांक २२.३.२००७ रोजी एकच प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक ३०.३.२००७ रोजी उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी " आपण संबंधीतास मागितलेली माहिती त्वरीत द्यावी. आपण माहिती न दिल्यास व संबंधीतांनी आयोगाकडे अपील केल्यास होणा-या दंडात्मक कार्यवाहीस आपण जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी. सुलभ संदर्भाकरीता संबंधीतांनी या कार्यालयाकडे सादर केलेल्या अपील अर्जाची झेरॉक्स प्रत यासोबत पाठविली आहे. " व त्यानंतरही अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

(मागेपुढे)

जन माहिती अधिकारी यांनी खुलासा दाखल करताना "अर्जदारास आवश्यक ती माहिती करीता श्रम व वेळ जास्त लागत असल्याने व येणा-या साधन सामुग्रीचा खर्च जास्त होत असल्याने कार्यालयाचे पत्र क्रमांक ३१९०, दिनांक २.१२.२००६ अन्यये दस्तऐवज पाहाण्याकरीता कळविण्यात आलेले. तसेच दारिद्रय रेषेचे कार्ड जोडले नसल्याने ते सुध्दा कळविण्यात आले.

दस्तऐवज पाहाण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. पाहाणीची वेळ व तारीख कार्यालयास सादर करण्यास पुनश्च पत्र क्रमांक ७ दिनांक २.१.२००७ नुसार अर्जदारास संयुक्तरित्या कळविण्यात आले. " असा खुलासा दाखल केला आहे. मात्र अर्जदार हे



मागितलेल्या माहितीचे निरीक्षण करण्याकरीता आले नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. दिनांक ८.१२.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी " आपण पत्रात नमूद केले आहे की, मी मागितलेली माहिती देण्याकरीता वेळ व श्रम जास्त लागत आहे. ते तुमचे कर्तव्य असून ते मला सांगण्याची आवश्यकता नाही. आपण पत्रात असे कळविले आहे की, कलम ७ चे पोटकलम १ अन्वये आपण रेकार्ड पाहू शकता. परंतु माझा अर्ज वरील कलमांतर्गत नसल्याने हा मुद्या कळविण्याची मला आवश्यकता नाही. दारिद्रय रेषेचे कार्ड क्रमांक ६४ हे चुकीने टाकण्यात आले असून माझा कार्ड क्रमांक ६२ आहे. व त्याची सत्यप्रत या अर्जासोबत जोडली आहे. तरी विनंती की, अर्जानुसार मागितलेली माहिती मला मुदतीत मिळावी. " असे कळविलेले दिसून येते. व सोबत दारिद्रय रेषेखालील कार्ड क्रमांक ६२ ची छायांकित प्रत दाखल केलेली दिसून येते.

दिनांक ४.९.२००६( दिनांक ५.९.२००६) च्या अर्जाच्या संदर्भात सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल कला आहे.

" अर्जदाराने दारिद्रय रेषेचे कार्ड सोबत न लावल्याने पत्र क्रमांक २३०७/२००७, दिनांक १३.९.२००७ अन्वये कळविले आहे. अर्जदाराने दिनांक ५.१०.२००६ च्या अर्जान्वये अस्पस्ट कार्ड जोडले असल्याने पत्र क्रमांक २८४२, दिनांक ३१.१०.२००६ अन्वये मुळ कार्ड सादर करण्यास कळविले आहे. रजिस्टर पोस्टाने पत्र पाठविले आहे. पोच जोडली आहे. आवश्यक ती माहीती मोठया प्रमाणात असल्याने श्रम व वेळ जास्त व साधन सामुग्रीचा खर्च जास्त होत असल्याने कलम ७ नुसार पत्र क्रमांक ७ दिनांक २.१.२००७ नुसार दस्तऐवज पाहाण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात येणार आहे त्या दृष्टीने अर्जदाराचे वेळापत्रक कार्यालयास पाठविण्याचे दृष्टीने कळविण्यात आले. "

अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडील द्वितीय अपील हे त्यांनी दाखल केलेल्या दोनही वेगवेगळया तारखेच्या माहितीच्या अर्जाचे संदर्भात आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे कलम ६(१) प्रमाणे अर्ज दाखल करुन त्या अर्जाच्या संदर्भात कलम

१९ (१) प्रमाणे प्रथम अपील व त्या निर्णयाच्या विरुध्द कलम १९(३) द्वितीय अपील अशी तरतूद आहे. दोनही अर्जाच्या संदर्भामध्ये एक प्रथम अपील किंवा एक द्वितीय अपील दाखल करण्याची तरतूद नाही. प्रत्येक अर्जाची प्रक्रिया ही स्वतंत्र प्रक्रिया असते. कारण प्रथम अपील, द्वितीय



अपील दाखल करण्याकरीता मुदत दिलेली आहे. व त्या मुदतीच्या कारणाकरीता स्वतंत्रपणे प्रथम अपील व द्वितीय अपील हे दाखल केलेले असले पाहिजे. सकृत दर्शनी प्रथम अपील किंवा द्वितीय अपील हे मुदतीत दाखल केलेले नाही. असे असले तरी माहिती उपलब्ध करुन देणे हा मुख्य उददेश असल्यामुळे त्याबाबतचा तांत्रिकदृष्टया विचार केला नाही. मात्र, अपीलकर्ता यांनी त्यांच्या दोनही अर्जात जी माहिती मागितली आहे व जन माहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे त्यावरुन अवलोकन केले असता असे दिसून येते की, मागितलेली माहिती ही मोघम स्वरुपाची व अत्यंत व्यापक व विस्तृत स्वरुपाची आहे. सदरच्या माहिती निश्चितच उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास त्याकरीता सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा ही प्रमाणाबाहेर वळवावी लागत असून छायांकित प्रती सुध्दा हया प्रमाणाबाहेरच होतील असे दिसून येते. त्यातही मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये कोणतेही व्यापक जन हित दिसून येत नाही.माहिती मिळाल्यावर भ्रष्टाचाराचा शोघ घेणार आहे हे व्यापक जनहित होत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे योग्य आहे. मात्र अधिनियमाच्या योग्य त्या कलमाचा वापर केलेला दिसून येत नाही.

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलाच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचा विचार न करता प्रशासकिय पत्राप्रमाणे एक पत्र दिलेले दिसून येते. प्रथम अपीलाची तरतूद ही त्याच सार्वजनिक प्राधिकरणाचे वरिष्ठ अधिका-यांची नियुक्ती करण्याची आहे. कारण त्याच प्रकरणामध्ये त्याच स्तरावर ती माहिती उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित आहे. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलीय तरतुदीचे पालन केलेले नाही. कोणत्याही प्रकारची चौकशी न करता "माहिती उपलब्ध करुन द्यावी" असे ठोकळेबाज उत्तर दिलेले दिसून येते.

अपीलकर्ता यांना दिनांक १२.४.२००७ रोजी गट विकास अधिकारी यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या पत्राची छायांकित प्रत दाखल केलेली दूिसन येते. व त्याच

पत्राची प्रतिलीपी ही गजानन सखाराम सावके व दिनेश विठठलराव जाधव यांना एकत्रित दिलेली दिसून येते.

// ५ //

अपीलकर्त्यांच्या दिनांक ८.१२.२००६ च्या पत्रामध्ये दारिद्रय रेषेखालील कार्ड हे त्यांनी दाखल केले नव्हते, असे दिसून येते. व त्यामुळे त्यांच्या अर्जाच्या संदर्भात मुदतीचा विचार करता येत नाही. परंतु माहिती उपलब्ध करुन देणे हे आवश्यक असल्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरच्या माहितीचे जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्याप्रमाणे निरीक्षण किंवा पाहाणी करणे हे संयुक्तिक राहील. व त्यातून आवश्यक ते कागदपत्रांच्या छायांकित प्रती हया उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक ४.९.२००६ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता उपलब्ध असलेल्या कागदपत्राची पाहाणी/निरीक्षण करुन (माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २ (अं) प्रमाणे) आवश्यक असलेल्या माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्यात.

२) अपीलकर्ता यांनी कागदपत्रांची पाहाणी करण्याकरीता जन माहिती अधिकारी यांना कार्यालयीन वेळेतील तारीख व वेळ कळवावी. अपीलकर्ता यांनी तारीख व वेळ कळविल्यावर संबंधीत माहितीची कागदपत्रे त्यांना निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी व त्यावेळेस कार्यालयातील अधिकारी किंवा कर्मचारी यांनी उपस्थित राहावे. माहिती उपलब्ध झाल्याची पोच देण्यात यावी.

३) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-३०.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १६७/२००७**

**१) श्री सुरेश वि. इंगळे,**
**रा.२४, भाग्योदय कॅालनी, दस्तुरनगर,**
**अमरावती.** **तक्रारदार**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, नांदगांव खंडेश्वर, जि. अमरावती.** **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक ३०.८.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारकर्ता यांनी दिनांक २१.२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार विना अनुमती गैरहजर आहे. गैरतक्रारदार हजर आहे.

तक्रारदार यांनी दिनांक १४.८.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदगांव खंडेश्वर यांचेकडे" मार्च, २००५ ते जुलै, २००६ या १७ महिन्याचे वेतन बिलाची झेरॅाक्स तसेच माहे डिसेंबर, २००४ चे ९ दिवसांचे रजेचे वेतन काढणे. रुपये ४००/- प्र.मा.प्रमाणे कालबध्द पदोन्नतीचे विशेष वेतन काढणे. किरकोळ रजेचे नियमांची व मेडीकल रजेचे नियमांचे झेरॅाक्स प्रत. MCSR प्रमाणे." माहिती स्वहस्ते यथाशिघ्र घेणार असे नमूद केले आहे. परंतु सदरची माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

तत्कालीन गट विकास अधिकारी यांनी खुलासा दाखल केला आहे. सदरच्या खुलाशामध्ये "अर्जदाराने मागितलेल्या माहितीचा शोध कार्यालयात घेण्यात आला. त्यानंतर कार्यालयीन पत्र क्रमांक ६२२२, दिनांक १५.९.२००६ अन्वये अर्जदारास त्या माहिती पोटी

शासकिय शुल्क रुपये १२०/- चालनाद्वारे भरुन माहिती घेवून जाण्यास कळविले होते. दिनांक १७.९.२००६ रोजी सदर पत्र व्यक्तीशः त्यांच्या घरी पोहचविण्याचा प्रयत्न केला होता. घरी कोणीही नसल्यामुळे ते पत्र नंतर पोस्टाच्या डाकेने पाठविण्यात आले. त्यानंतर संबंधीत अर्जदाराने माहिती पोटी भरावयाचे शासकिय शुल्क भरलेले नाही किंवा माहिती घेवून जाण्यासाठी संपर्क केला नाही. कार्यालयात येवून माहिती घेवून जाण्यासाठी कळविले असतानाही माहिती न नेता परस्पर त्यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे तक्रार केली होती. त्यानुषंगाने वरील बाबी वरिष्ठांना कळविण्यात आल्या आहे. त्यानंतरही ते कार्यालयात माहिती नेण्यासाठी आले नाही व त्यांनी परस्पर आपणाकडेही तक्रार केली आहे. माहिती देण्यासाठी मी टाळाटाळ केली हा त्यांचा आरोप निराधार व खोटा असून सुड बुध्दीने केलेला आरोप आहे. संबंधीतांच्या मागणी नुसार कार्यालयाने त्यांना यापुर्वीही वेळोवेळी माहिती पुरविली आहे. तसेच आजही त्यांना हवी असलेली माहिती देण्यासाठी कार्यालय तयार आहे. त्यामुळे वरील बाबीचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन माझ्यावर कोठलीही कार्यवाही किंवा दंड लावण्यात येवू नये," अशी विनंती केली आहे. खुलाशा सोबत दिनांक १५.९.२००६ रोजी गट विकास अधिकारी यांनी श्री एस.व्ही. इंगळे, कृषि अधिकारी (निलंबित) यांना पाठविलेल्या पत्राची छायांकित प्रत सोबत जोडलेली आहे. दिनांक १८.९.२००६ रोजीचे पत्राप्रमाणे श्री एस.एन. मेश्राम, कनिष्ठ सहाय्यक यांनी तक्रारदार यांना त्यांच्या घरी पत्र पोहचविण्याच्या संबंधात अहवाल दिलेला आहे. त्यानंतर सदरचे पत्र हे पोस्टाने पाठविण्याचा पुरावा दाखल केला आहे. जिल्हा कृषि अधिकारी यांनी गट विकास अधिकारी यांना श्री एस.व्ही.इंगळे यांच्या तक्रारीच्या संदर्भात आदेश दिलेले दिसून येते. गट विकास अधिकारी यांनी जिल्हा कृषि अधिकारी यांना श्री एस.व्ही. इंगळे यांना रुपये १२०/- चा भरणा करण्यास कळविण्यात आलेले आहे, असे कळविलेले दिसून येते.

यावरुन तसेच श्री एस.व्ही. इंगळे यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये स्वहस्ते माहिती घेणार असे नमूद केले असल्यामुळे व कार्यालयात माहिती घेण्यास उपस्थित झालेले दिसून येत

नाही. तसेच त्यांनी त्याबध्दलचा पुरावा सुध्दा दिलेला नसल्यामुळे त्यांची तक्रार ही खारीज करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

२) तक्रारदार यांनी रुपये १२०/- हा माहितीच्या खर्चाकरीता भरणा केल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन दण्यात यावी.

३) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-३०.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १६८/२००७**

**१) श्री सुरेश वि. इंगळे,**
**रा.२४, भाग्योदय कॅालनी, दस्तुरनगर,**
**अमरावती. तक्रारदार**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त (विकास)(सा.प्र.वि.),**
**विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती. गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक ३०.८.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारकर्ता यांनी दिनांक २१.२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार विना अनुमती गैरहजर आहे. गैरतक्रारदार हजर आहे.

तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रारीमध्ये दिनांक १.३.२००६ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्रमोशनच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली होती. परंतु गोपनिय बाब आहे म्हणून देता येत नाही असे पत्राने कळविले. त्याबाबतचे कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे तक्रारदार यांनी तक्रारीसोबत दाखल केले नाही. तसेच दिनांक २४.७.२००६ रोजी आयुक्त, मुंबई यांचेकडे अपील केले होते, याबध्दलही कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे दाखल केले नाही.

असे असून सुध्दा सदरच्या तक्रारीच्या संदर्भात उपआयुक्त, विकास (आस्थापना) अमरावती विभाग यांचेकडून खुलासा मागविण्यात आला व तो खालीलप्रमाणे आहे.

" तक्रार अर्जाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे सविस्तर खुलासा कागदपत्रांच्या तारखेवार यादीसह, पोच पावतीसह सादर करण्यांत येत आहे.

१) माहिती अधिकारी यांचे पत्र क्रमांक विकास/क.अ./मा.अ./कावि-२२१/०६, दि. ७ मार्च, ०६ नुसार श्री एस.व्ही.इंगळे यांचा दि. १.३.०६ चा अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला. त्यानुसार या कार्यालयाचे पत्र क्रमांक:विकास/मविसे/कवि-६९३/०६, दि. १३ मार्च, ०६ अन्वये माहिती अधिका-यांस श्री इंगळे यांचे अर्जानुसार ३४ कर्मचा-यांच्या आदेशाची प्रत दोन प्रतीमध्ये देण्यात आली. त्यांनी मागणी केलेले इतर कागदपत्र गोपनिय अभिलेखामध्ये मोडत असल्यामुळे त्यांना

पुरविता येणार नाही असे कळविले. अर्जदार श्री इंगळे स्वत: दि. १४.३.२००६ रोजी प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित राहून त्यांनी माहिती स्वत: हस्तगत केली. त्याबाबतची पोच पुराव्यादाखल जोडली आहे.

२) दि. २५.८.२००६ च्या पत्रान्वये श्री इंगळे यांनी माहितीच्या अधिकाराखाली मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहिती मागितली होती. शासन पत्र क्रमांक मविसे-१०/२००६/प्र.क्र.-१९३/आस्था-३, दि. १६.९.०६ अन्वये श्री इंगळे यांना माहितीबाबत असे कळविण्यात आले की, त्यांनी मागितलेला मुद्या क्रमांक १ या संदर्भात विभागीय पदोन्नती समितीने महाराष्ट्र विकास सेवा गट-ब पदाबाबत पदोन्नतीसाठी गोपनीय अहवालाची प्रतवारी निकषापर्यंत (ब) येन नसल्यामुळे अपात्र ठरविण्यात आलेले आहे. त्यामुळे श्री इंगळे यांना पदोन्नती देण्यात आली नाही, असे कळविले. मुद्या क्रमांक २ बाबत शासनाने श्री इंगळे यांनी दिलेल्या निवेदराचे अनुषंगाने दि. ४ ऑगष्ट, ०६ च्या पत्रान्वये उत्तर दिलेले आहे. मुद्या क्रमांक ६ इ.मा.व. प्रवर्गासाठी महाराष्ट्र विकास सेवा गट-ब च्या पदोन्नतीसाठी आरक्षणाची तरतुद नाही. मुद्या क्रमांक ३ ते ५ व ७ हे मुद्ये या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे त्यांच्या निवेदनाची प्रत या कार्यालयास पाठवून आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत शासनाने कळविले. तदनुसार अर्जदार यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक:विकास/मविसे/कावि-२२५६/०६, दि.५.१०.०६ अन्वये यापूर्वी श्री इंगळे यांना १३ मार्च, ०६ चे पत्रानुसार काही माहिती देण्यात आल्याबाबतचे कळवून मुद्या क्रमांक ५ नुसार अवलोकनार्थ फाईल दाखविण्यात येईल असे सुध्दा कळविण्यात आले. परंतु फाईल पाहण्यासाठी ते या कार्यालयात उपस्थित झाले नाही.

३) माहिती अधिकारी यांचे पत्र क्रमांक:विकास/मा.अ./कावि-८०३/२००७, दि. ३.९.०७ अन्वये श्री इंगळे यांनी दि. १४.८.०७ (प्राप्त दि.३१.०८.०७) अन्वये सादर केलेल्या अर्जानुसार पुन्हा माहिती मागितली होती. त्यानुसार या कार्यालयाचे पत्र क्रमांक:विकास/मविसे/कावि-१२९१/०७, दि. २७.९.०७ नुसार माहिती शोधण्यास वेळ लागणार असल्याचे कळवून माहिती शोधून यथाशिघ्र देण्याबाबत कळविण्यात आले होते.

४) त्यानुसार या कार्यालयाचे पत्र क्रमांक:विकास/मविसे/कावि-१४४५/०७, दि.२०.१०.०७ अन्वये माहिती अधिकारी तथा उप आयुक्त (विकास) यांना श्री सुरेश विश्वनाथ इंगळे, कृषि

अधिकारी यांनी माहितीच्या अधिकाराखाली मागणी केलेली व या शाखेस उपलब्ध असलेली माहितीची प्रत पाठविण्यात आली. त्यानुसार माहिती अधिकारी यांनी सदर माहितीची प्रत दि. १५.११.०७ रोजी अर्जदार श्री इंगळे यांना प्रत्यक्ष माहिती पूरवून त्याबाबतची पोच घेण्यात आली. पुराव्याकरीता पोच सोबत जोडलेली आहे.

वरील मुद्यांनुसार पुराव्याकरीता आवश्यक पत्रव्यवहाराच्या प्रती सोबत जोडण्यात आलेल्या आहेत.

तथापि, आपले दि. १३.६.०८ चे पत्रातील मुद्या क्रमांक ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे अर्जदार यांनी कोणतेही प्रथम अपील या कार्यालयास दाखल केलेले नाही.

श्री व्ही.एस. इंगळे यांचे संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडून दि. ८.४.०८ अन्वये प्राप्त झालेल्या पत्रव्यवहारानुसार श्री इंगळे यांची प्रशासनामध्ये सर्वच बाबतीत वर्तणुक असमाधानकारक असल्यामुळे, तसेच नियमित विना अर्जाने कार्यालयात गैरहजर राहात असल्यामुळे, अधिका-यांसोबत वागणुक असभ्यतेची असल्यामुळे त्यांचेविरुध्द दोन वेळा खाते चौकशा लावून त्यांना निलंबित करण्यात आलेले होते. दोन्ही खाते चौकशीचे अनुषंगाने प्रत्येक प्रकरणात प्रत्येकी एक वेतन वाढ कायम स्वरुपी बंद करुन निलंबन काळ हा निलंबन काळ ठेवण्याबाबतची शिक्षा देण्यात आलेली आहे. तरीही श्री इंगळे यांचया वर्तणुकीमध्ये कोणताही बदल झाला नाही. त्यांचे मागील सात आठ वर्षाचे गोपनीय अहवाल बघितले असता साधारण पेक्षा कमी (ब-) असल्यामुळे जेष्ठता यादीमध्ये ज्ेष्ठ असतांना सुध्दा त्यांना मागिल तीन पदोन्नतीच्या प्रस्तावामध्ये पदोननती निवड समितीने त्यांना महाराष्ट्र विकास सेवा वर्ग-२ च्या पदोन्नतीसाठी अपात्र ठरविले. याबाबत शासनाने त्यांना कळवूनसुध्दा पुन्हा पुन्हा पदोन्नतीचाच विषय घेवून त्यांनी शासनाला व आयुक्तांना अनेक वेळा अनावश्यक पत्र व्यवहार केल्यामुळे सदर पत्रांची दखल घेतली जाणार नाही असे सुध्दा शासन पत्रान्वये त्यांना कळविले आहे. शासन पत्राची व मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अमरावती यांचे पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

त्यांची वर्तणुक व त्यांच्या गोपनिय अहवालातील शेरे बघता लोकहिताचे दृष्टीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी त्यांचे नोटीस क्रमांक जिप/कृषि/आस्था-

१/९६४/२००८, दि. २३.३.०८ नुसार श्री एस.व्ही. इंगळे, कृषि अधिकारी यांना मुदतपूर्व सेवानिवृत्त करण्यासाठी तीन महिन्या एवढया मुदतीची नोटीस देवून दि.२५.६.२००८ ला (माध्यान्हानंतर) किंवा नोटीस बजाविल्याच्या तारखेपासून सुरु होणार तीन महितीन्याचा कालावधी संपण्याच्या लगतनंतरचा दिनांक यापैकी जो नंतरचा असेल त्या दिनांकाला शासकिय सेवेतून सेवानिवृत्त झाले असे ठरेल अशी नोटीस निर्गमित केलेली आहे. त्यामुळे ते आता मुदतपूर्व सेवानिवृत्त झाले. पत्राची प्रत सोब जोडलेली आहे."

खुलाशासोबत श्री एस.व्ही. इंगळे यांचे संदर्भात झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती सुध्दा दाखल केलेल्या आहेत.

खुलाशावरुन असे दिसून येते की, तक्रारदार यांना दिलेले उत्तर हे योग्य होते व त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे. .

**दिनांक :-३०.८.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**